बाप
द ग्रेट हिरो
डॉ. मनोहर सुरवाडे

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

बाप : ग्रेट हिरो

(कादंबरी)

डॉ. मनोहर झगडू सुरवाडे

बाप : ग्रेट हिरो (कादंबरी)

डॉ. मनोहर झगडू सुरवाडे

पत्ता : धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर

फोन : 8793918134

ईमेल: msurwade09@gmail.com

ISBN - 978-93-345-1374-5

मुखपृष्ठ आणि आतील चित्रे: डॉ. मनोहर झगडू सुरवाडे (AIसहाय्य)

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते (दंड व तुरुंगवास).

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक :- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com
esahity@gmail.com
Whatsapp- 9987737237
(विनामूल्य ईपुस्तकांसाठी फ़क्त नाव गाव कळवा)
प्रकाशन : १८ सप्टेंबर २०२६

छापिल प्रत खासगी वितरणासाठी उपलब्ध
देणगी मूल्य- रु. ४५०/- फक्त
(१००% रक्कम लेखकाकडे छपाईचा खर्च म्हणून जाईल.)
(संपर्क- डॉ. मनोहर झगडू सुरवाडे – 8793918134

©esahity Pratishthan®2026

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

लेखक परिचय

डॉ. मनोहर झगडू सुरवाडे

२. व्यवसाय (नोकरी) :
प्राध्यापक,विभागप्रमुख व उपप्राचार्य
३. पत्ता :
धनाजी नाना महाविद्यालय,फैजपूर
जि. जळगाव,४२५५०३
वैशाली नगर,फैजपूर जि. जळगाव,
४. मोबाइल : 8793918134
५. ई-मेल : msurwade09@gmail.com

➢ सामाजिक व शैक्षणिक कार्य

१. पीएचडी : मराठवाड्यातील कथाकारांचे प्रादेशिक वेगळेपण, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, २००३

२. संशोधन प्रकल्प

२.१ - समकालीन दलित कथेतील सामाजिक जाणिवा, यु. जी. सी. पुणे विभाग,२००४

२.२ - भटक्या विमुक्ततांच्या मराठी साहित्याचा समाजशास्त्रीय अभ्यास, यु. जी. सी., नवी दिल्ली,२०१४

३. शोधनिबंध

३.१ - समकालीन दलित कथेतील आंबेडकरी विचार : अक्षरवैदर्भी, ऑक्टो-नोंव्हे २०१०

३.२ - दलितेतर लेखकांच्या कथांमधील दलित जीवनदर्श, अस्मितादर्श, एमेजू, २०१०

३.३ - मराठवाड्याच्या कथांतील आशयसूत्रे :अनुबंध, एप्रिल,२०११

३.४ – आदिवाशी काव्यातील सामाजिक आणि वाङ्मयीन जाणिवा : अक्षरवैदर्भी, मे, २०११

३.५ - मराठवाड्याच्या कथांतील दुष्काळविषयक आशयसूत्रे : आत्मप्रत्यय, ऑक्टो – डिसे २०११

३.६- संतसाहित्यातील दुष्काळाचे संदर्भ : पंचधारा, ऑक्टो–डिसे, २०११

३.७- आदिवासी काव्यातील आंबेडकरी विचारदर्शन: अस्मितादर्श, २०१२

३.८- स्त्रियांचे सक्षमीकरण व त्यांचे अधिकार:प्लाटीनम, एप्रिल२०१२

३.९-दलित चळवळ आणि आत्मकथन: एक अनुबंध: आधार, सप्टे२०१२

३.१० - साहित्यातील गांधीविचार : अक्षरवैदर्भी, नोव्हें २०१२

३.११- उन्नती चौधरी लिखित 'स्त्रीत्त्वाची सूत्रे' : स्त्रीस्वातंत्र्याच्या जाहीरनाम्याचा शोध घेणारा नाविन्यपूर्ण काव्याविष्कार, अक्षरवैदर्भी दिवाळी विशेषांक, २०२४

३.१२- नव्वदोत्तर ग्रामीण साहित्य: चिंतन आणि चर्चा : दारापूर, २०११

३.१३ डिजिटल तंत्रज्ञान : भारतीय ज्ञान प्रणालीच्या परंपरेतील उत्तर-आधुनिक स्रोत, धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर व उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव, राज्यस्तरीय चर्चा सत्र, भारतीय ज्ञानप्रणाली, जानेवारी २०२६

३.१४ नकला : पारंपरिक लोककलाप्रकार व समाजप्रबोधनाचे सशक्त माध्यम,

३.१५ पुरुष वाद संकल्पना आणि स्वरूप, आर डी नारायणराव बोरावके कॉलेज श्रीरामपूर एकदिवसीय आंतरराष्ट्रीय कॉन्फरन्स,१६ जानेवारी २०२६

३.१६ सर्जनशीलता आणि कृत्रिम बुद्धिमत्ता, विज्ञान कला आणि वाणिज्य महाविद्यालय कोपरगाव, एक दिवशीय आंतरराष्ट्रीय ई कॉन्फरन्स,१८ फेब्रुवारी २०२६

३.१७ कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सर्जनशील साहित्या निर्मिती, समाजभूषण गणपतराव काळभोर कॉलेज लोणी भोकर, ७. मार्च २०२६

३.१८ साहित्य अकादमी पुरस्कृत मराठी लेखिकांचे साहित्यातील योगदान,समाज श्री प्रशांत दादा हिरे कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, नामपुर जिल्हा नाशिक दोन दिवसीय राष्ट्रीय सेमिनार,१३-१४, मार्च २०२६

३.१९ साहित्य अकादमी पुरस्कृत निवडक कादंबऱ्यांमधील मानवी मूल्ये, एन. डी. महाविद्यालय, मलकापूर-पेरीड,ह्यूमन व्हॅल्यू अँड लिटरेचर,२८, फेब्रुवारी, २०२६

४. राष्ट्रीय – आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये शोधनिबंध सादर : २१

५. संपादित पुस्तकातील लेख

५.१ - राघववेळ आणि तणकट या कादंबऱ्यातील ग्रामीणता : ग्रंथवेद,-२०१२

५.२ - स्वातंत्र्यपूर्वकालीन मराठी कादंबरीतील मानवतावादी दृष्टिकोन : मराठी साहित्यातील मानवतावाद, अथर्व प्रकाशन,जळगाव २०१२

५.३ - समकालीन दलित कथेतील आंबेडकरी विचार : १९८० नंतरचे मराठी साहित्य, ----२०१२

५.४ - गावरंग माणदेशी माणसांची बदलती जीवनशैली : कृष्णाक्षर,२०१५

५.५- लोकमान्य टिळक यांच्या लेखनातील दुष्काळविषयक संदर्भ आणि दृष्टिकोन : मराठी साहित्य आणि आंतरविद्याक्षेत्रीय संशोधन, २०१६

५.६ १९७५ नंतरच्या मराठी नाटकातील आशय आणि पात्रचित्रणास पूरक ठरलेल्या भौतिक घटकांचे अन्वयार्थ : १९७५ नंतरचे मराठी नाटक आशय आणि रचना, --- २०१७

६ - प्रकाशित पुस्तके कवितासंग्रह

१- षटकार : प्राइम प्रकाशन,जळगाव,२०२५

२- पुरुषनामा : ई-साहित्य प्रतिष्ठान ठाणे,२०२५

३- तो-ती-ते : प्राइम प्रकाशन,जळगाव,२०२५

४-पुरुषाच्या व्यथा : प्राइम प्रकाशन,जळगाव,२०२५

५.बाप : नाण्याच्या दोन बाजू, : ई-साहित्य प्रतिष्ठान,२०२६

- **कथासंग्रह**

१. खूळ : ई-साहित्य प्रतिष्ठान ठाणे,२०२५

२. शापित : ई-साहित्य प्रतिष्ठान ठाणे,२०२५

- **कादंबरी**

१. जन्मपत्र : ई-साहित्य प्रतिष्ठान ठाणे,२०२६

२. बाप : द ग्रेट हिरो, ई-साहित्य प्रतिष्ठान ठाणे,२०२६

- **गद्य**

१. डिजिटल युगातील माणूस : ई-साहित्य प्रतिष्ठान ठाणे,२०२६

- **संपादन**

१. नकलाकर दिलीप अलोणे गौरवग्रंथ : आगामी,२०२५

- **साहित्य : समीक्षा व संशोधनपर ग्रंथ**

१ - समकालीन दलित कथा : हार्मिस प्रकाशन, पुणे , २००८

२ - १९८० नंतरची ग्रामीण कथा : बळीवंश प्रकाशन, नांदेड, २०१०

३ - साठोत्तरी साहित्य प्रवाह: विविधता आणि वेगळेपण : सुगम प्रकाशन,अमरावती, २०१२

४ - स्वातंत्र्यपूर्व मराठी साहित्यातील सामाजिक संदर्भ : सुगम प्रकाशन, अमरावती, २०१२

५- ग्रामीण समाज आणि कथा साहित्य: सुगमप्रकाशन,अमरावती,२०१२

६ - आदिवासी साहित्य प्रवाह : सुगम प्रकाशन, अमरावती, २०१२

७ - दलित आत्मकथा आणि कथा : सुगम प्रकाशन, अमरावती, २०१२

८ - ग्रामीण साहित्यप्रकार : स्वरूप आणि चिकित्सा, सुगम प्रकाशन, अमरावती, २०१२

९- मराठी ग्रामीण कथा–लेखिकांचे योगदान:स्वरूपप्रकाशन,औरंगाबाद१३

१०- उन्नती चौधरी लिखित-'साहित्य आणि समाजशास्त्रीय संशोधन' (सहलेखक) : प्रशांत पब्लिकेशन, जळगाव २०२३

७. पीएच.डी. मार्गदर्शक : कवयित्री बहिणाबाई चौधरी, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

८. संशोधन विद्यार्थी : १३ विद्यार्थ्यांना Ph.D. प्राप्त

९. विविध विद्यापीठांमध्ये पीएच.डी. प्रबंधांचे बहिस्थ परीक्षक

१०. सामाजिक प्रबोधनपर व शैक्षणिक व्याख्याने

११. जळगाव विद्यापीठस्तरीय विविध समित्यांवर शैक्षणिक कार्य

१२. पुरस्कार -

१- महाकवी वामनदादा कर्डक राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार

२- भीमरत्न पुरस्कार,सम्राट फाउंडेशन,सावदा,जळगाव

३- १९८० नंतरची ग्रामीण कथा या शोधग्रंथास तीन राज्यस्तरीय पुरस्कार

४- आदर्श शिक्षक पुरस्कार, युनियन बँक ऑफ इंडिया

५. लोकमत एक्सलंट टिचर अवॉर्ड, जळगाव,2025

६. विद्याभूषण, वार्ता फाउंडेशन वार्ताहर संघ,फैजपूर, २०२६

अनेकांच्या आयुष्यात प्रथमपासून शेवटपर्यंत,

बाप कसाही असो, चांगला की वाईट ---

निःशब्दपणे मुलांच्या पाठीशी उभा असतो.

त्याचं प्रेम कधी शब्दांत व्यक्त होत नाही,

पण प्रत्येक त्यागातून ते आयुष्यभर जाणवत राहतं.

अशा निःशब्द, अव्यक्त प्रेमाचे मूर्तरूप असलेल्या

प्रत्येक वडिलांना...

कृतज्ञतापूर्वक, ही कादंबरी सादर समर्पित.

मनोगत

'बाप : द ग्रेट हिरो' ही कादंबरी सन २००२लाच सुचली होती. काही पानंही लिहिली होती; परंतु पूर्ण करणे राहून गेली होती. त्यावेळी दोन कथासंग्रह लिहिले होते; पण कादंबरी लिहिता आली नव्हती. तसेच साहित्य संशोधन, शोधप्रकल्प व समीक्षा यामुळे कादंबरी लेखनासाठी चिंतन करायला वेळ नव्हता. आता चोवीस वर्षांनी ती कल्पना साकार झाली झाली आहे. ही केवळ एका वडिलांची कथा नाही; ती प्रत्येक बापाची कहाणी आहे, जो स्वतःच्या आयुष्याचा हिशोब कधी मांडत नाही; पण मुलांच्या भविष्याचा प्रत्येक वेळी विचार करतो आणि त्यांच्या करिअरच्या स्वप्नांना आकार देण्यासाठी धडपडतो.

आजच्या वेगाने बदलणाऱ्या जगात नात्यांचे अर्थ बदलत आहेत. शिक्षण, करिअर, स्वातंत्र्य, प्रेम, विवाह आणि वैयक्तिक निवडी, यामुळे प्रत्येक पिढीसमोर नवे प्रश्न उभे राहिले आहेत. या बदलांमध्ये अनेकदा आई-वडील आणि मुलांच्या विचारांमध्ये अंतर निर्माण होते. मात्र त्या अंतरावर पूल बांधण्याचं काम प्रेम, विश्वास आणि समजूतदारपणा यां भावना करू शकतात.

या कादंबरीतील सखाराम हा एक सर्वसामान्य बाप आहे. त्याच्याकडे अफाट संपत्ती नाही, मोठेपणा नाही; पण माणुसकी, प्रामाणिकपणा आणि मुलांविषयीची निःस्वार्थ आस्था आहे.

आयुष्यभर संकटांना सामोरं जात असतानाही तो कटु होत नाही. मुलांना दोष देण्याऐवजी त्यांना समजून घेण्याचा प्रयत्न करतो. त्याच्या जगण्याला अर्थ देणारी त्याची मैत्री, त्याचे संस्कार आणि त्याची मूल्यं हीच या कादंबरीची खरी ताकद आहे.

या कथेत बदलत्या समाजाचं वास्तव आहे. प्रेमविवाह आहे, वैवाहिक संघर्ष आहे, करिअरची धडपड आहे, दोन पिढ्यांमधील विचारांचा संघर्ष आहे आणि त्याचबरोबर संकटाच्या क्षणी माणसाला आधार देणारी खरी मैत्रीही आहे. यातून प्रत्येक पात्रांची प्रतिमा तिच्या गुणदोषांसह उभी राहते. त्यामुळे ही कथा कोणाचा न्यायनिवाडा करत नाही. ती फक्त माणसांना समजून घेण्याचा प्रयत्न करते.

प्रत्येक वाचकाने आपल्या अनुभवांनुसार, आपल्या नात्यांच्या संदर्भात या कथेकडे पाहावं, एवढीच अपेक्षा आहे. एखाद्या वाचकाला यात स्वतःचा बाप दिसेल, कोणाला स्वतःची मुलगी, कोणाला मित्र, तर कोणाला स्वतःचं प्रतिबिंब. कारण तो माणसांचा शोध आहे. आपल्या आजूबाजूला जगणाऱ्या साध्यासुध्या माणसांमध्ये असामान्य माणुसकी दडलेली असते. त्या माणुसकीला शब्दरूप देण्याचा हा एक छोटासा प्रयत्न आहे. कारण कोणी कितीही काही म्हटले तरी सगळेच काही वाईट नसतात. मानवी मूल्ये आणि माणसांबद्दल जिव्हाळा व प्रेम जपणारी काही माणसेही आपल्या अवतीभोवती असतात. त्यांची ओळख होणं हा ज्याच्या-त्याच्या दृष्टीचा भाग असतो.

केवळ घेण्या-देण्यानेच माणुसकी उजागर होते, असे नाही, तर या कादंबरीतील सखाराम आणि शिरोळे यांच्याकडे पाहिले की, याची प्रचीती येते आणि अशी माणसे आज संख्येने अधिक नसली, तरी कोणी तरी, कधी तरी आपल्याला कळतात किंवा दिसतात. त्यामुळे अजूनही माणूस माणसावर विश्वास आणि श्रद्धा ठेवून आहे, हे जाणवत. मात्र त्यातून काही उपदेश करावा, हा या कादंबरी लेखनाचा हेतू नाही.

'बाप' ही प्रतिमा तशी फार काही चांगली मानली जात नाही. त्याच्याबद्दल मुलांना भीती असते. मात्र त्याच्या आंतरहृदयात माया व प्रेमाचे पाझर झिरपत असतात. ते दिसत नसतात. त्याच्या कृतीतून ते ओळखायचे असते. हेही या कादंबरीतून दिसून येईल. त्याकडे वाचक डोळसपणे पाहतील, अशी अपेक्षा करतो आणि प्रत्येक वेळी श्री सुनील नीळ आणि ई-साहित्य प्रतिष्ठान माझ्या लेखनाला चोखंदळपणे प्रतिसाद देतात, वाचक मित्र चांगले अभिप्राय देतात, त्यांचे आभार मानतो..

डॉ. मनोहर सुरवाडे

बाप : ग्रेट हिरो

ही कहाणी आहे
त्या प्रत्येक अनामिक
बापाची...
जो स्वत: जळत
आपल्या कुटुंबाला
प्रकाश देतो.
संघर्ष, त्याग, प्रेम आणि
जबाबदारीचा प्रेरणादायी
प्रवास!
डॉ. मनोहर सुरवाडे

जुलै महिन्यात दिवसभर पाऊस कोसळून सगळीकडे गारा-चिखल झालेला होता. जून महिन्याचा उकाडा संपला होता; पण मनातील उकाडा काही जात नव्हता. विचार मात्र घामाच्या धारांसारखे डोक्यातून झिरपत होते. ओल्या मातीचा वास अजूनही हवेत दरवळत होता; पण नाकाला जाणवत नव्हता. रात्रीचे अकरा वाजले होते. झोपायचं तर झोप लागेल की नाही, याचीच भीती वाटत होती. रात्र काही जागून काढता येत नव्हती. शेवटी सखाराम जाधव उठले आणि गेट बंद आहे की नाही, हे पाहण्यासाठी हॉलमधून बाहेर पडले. त्यांनी समोर पाहिले आणि जाग्यावरच थांबले.

घरासमोर रस्त्यावर पावसाचे डबके साचलेले होते. ते गढूळ असल्याने चंद्रप्रकाशात अंधुकसे चमकत होते. त्याकडे पाहण्याची त्यांची इच्छा नव्हती. तरीही क्षणभर डबक्याकडे पाहिलं आणि मनात विचार आला, 'विचारांना येण्यासाठी-जाण्यासाठी भाडं मोजावं लागलं असतं तर...?' पाठोपाठ दुसरा विचार आला, ‘अलीकडे माणसाचं जगणंच डबक्यासारखं झालं आहे.’ त्यात जीव द्यायचा की त्यातल्या किड्यांचा जीव घ्यायचा?... पण नको.’ मनाशीच संवाद साधत ते पुन्हा हॉलमध्ये आले.

मुलगा टीव्हीवर रील पाहत होता. आता तो बरोबरीचा झाला म्हटल्यावर इच्छा असूनही ते काहीच बोलले नव्हते. बेडरूममध्ये जाऊन दार लावून घेतलं. पंख्याचा तेवढा आवाज येत होता. त्यांची पत्नी सरूचं त्यांच्याकडे लक्ष नव्हतं. ती आणि मुलगी दोघी मोबाईल चाळत होत्या. नंतर सरू उठून किचनमधील आवरसावर करीत होती. घड्याळ भिंतीवर टकटक करत त्याचं काम करीत होतं. त्यांनी अंथरूण टाकलं आणि ते झोपून गेले. सरू केव्हा आली आणि झोपली, काहीच कळलं नव्हतं. कळणार तरी कसं, त्या दिवशी त्याने एक पेग जास्तीच मारला होता ना म्हणून.....

पडल्या-पडल्याच झोप तर लागली होती; पण ती काही चांगली, स्वस्थ-मस्त झोप नव्हती. रात्री केव्हा तरी दारू उतरली आणि त्यांना जाग आली. रूममध्ये जीरो बल्बचा प्रकाश असल्याने भिंतीवरील घड्याळातील कोणतेच काटे दिसत नव्हते. "जगणंच तिथे अंधुक झालं, तिथे कुठलं काय दिसणार?" असा विचार करून उशाशी ठेवलेल्या मोबाईलमधील घड्याळात पाहिलं तर तीन वाजले होते. मग इतक्या लवकर उठून काय करणार? हा प्रश्न होताच. पुन्हा झोपून राहायचं तर पोट खाली, डोकं आणि डोळे जड झालेले होते. त्यामुळे झोप लागत नव्हती. नुसतं पडून राहायचं म्हटलं तर वांझोटे विचार अतृप्त आत्म्यांसारखे डोक्यात घुसत असल्याने पुन्हा त्रास होत होता; म्हणून ते उठले, फ्रेश होऊन किचनमध्ये गेले.

सखारामला शुगर असल्याने चहा बंद आणि ग्रीन टी सुरू, असं काही तंत्र त्यांनी पाळलेलं होतं. त्यामुळे त्यांनी गॅसवर एक ग्लास पाणी गरम करायला ठेवलं. पातेल्यातील पाणी गरम होऊन उकळी येत होती. तशी आधल्या दिवसाच्या गोष्टीबाबतच्या विचारांची उकळी येऊन डोकं गरम होत होतं. सरूच्या शब्दांनी ते अधिक गरम केलं होतं. “सुमेध म्हटला होता, पप्पा कर्णाची औलाद आहे की, हरिश्चंद्राची ---?” तिने झोपण्याच्या आधीच त्यांना सांगितलं होतं. तोच विचार घेऊन ते झोपले आणि त्याच विचाराबरोबर उठले. ग्रीन टी घेतानाही तो विचार मनात घोळत होता.

‘माणूस जगतो म्हणजे नेमकं काय करतो?’ या प्रश्नाचं उत्तर त्यांच्याकडे नव्हतं. माणसाला माणुसकी दाखवणं आणि माणुसकीनं वागणं, हीच मोठी चूक त्यांना वाटत होती. त्याच वेळी किचनमध्ये देवघराच्या बाजूला ठेवलेल्या आई-वडिलांच्या फोटोकडे पाहिलं. बापाच्या आठवणींचा पट डोळ्यासमोर उभा राहिला.

तुळशिराम जाधव हे त्यांचे वडील. स्वभावाने फार भित्रे आणि हळवे, म्हणून त्यांना भावनिक मर्यादा राखताच आलेल्या नव्हत्या. एक शांत, मितभाषी व सुस्वभावी माणूस म्हणून गावातील लोक त्यांना आदराने नाना म्हणायचे. मग घरातही सखाराम व त्यांची भावंडे वडिलांना ‘नाना’ म्हणूनच बोलायचे. असे हे नाना. अडीअडचणीच्या वेळी कोणाकडे काही मदत मागणं नानांना काही जमलं नव्हतं; पण कोणाला काही हवं असलं तर, ‘नाही’ म्हणणं कठीण जायचं. त्यामुळे अनेकदा इतरांचं काम करण्यात आणि इतरांच्या मताला मान देण्यात धन्यता मानायचे. वाद नाही, तर भांडण टाळायचं आणि दोन हात दूर राहायचं. कोणाला दुखवायचं नाही, या भीतीने मनातील गोष्टी मनातच मारून टाकायचे. गर्दी आणि लोकांपासून शक्य तितके दूर राहणंच पसंत असायचं. मात्र स्वतःपेक्षा इतरांच्या सोयीचा जास्त विचार करायचे. कोणी टीका करो की नकार देवो, मनाला लावून घ्यायचे आणि विसरूनही जायचे. आत्मविश्वास आणि

निर्णयाचा अभाव ही त्यांची फार मोठी कमजोरी होती. ते रक्तगुण बरेचशे सखारामपर्यंत येऊन ठेपले होते.

सखारामवर त्याच्या बापावरच गेला होता. मात्र एका पिढीचं अंतर असल्याने सखारामला नवी पिढी हरामखोर वाटत होती. त्याच्या स्वभावाचा गैरफायदा घेऊन विसरून जाणारी, गोड बोलून फसवणारी बेईमान पिढी म्हणून तो मनातल्या मनात शिव्या देत असे. 'उगीच, आपण बापाच्या वळणावर गेलो आणि लबाड दुनियेत फसत राहिलो. तळ्याच्या चिखलात ढोर फसतं, तशी आपली अवस्था झाली,' म्हणून तो बापालाच दोष देत होता.

'बाप साधा-भोळा असण्यापेक्षा लबाड-धूर्त असता तर, आपणही तसेच असतो आणि स्वार्थी दुनियेच्या गटारीत जाऊन पडलो नसतो,' असा विचार त्याच्या मनात येऊन गेला खरा; पण 'त्या बापामुळेच आपण आज चांगल्या नोकरीला लागलो,' याचं समाधान आणि कृतज्ञताही त्यांच्या ठिकाणी होती. त्यामुळे तो त्याच्या मुलांकडे जबाबदारीने पाहायचा.

खेड्यातील एका अल्पभूधारक शेतकऱ्याचा मुलगा म्हणून जन्माला येणं, हा काही सखारामचा दोष नव्हता. त्यांच्या लहानपणी घरची परिस्थिती फार काही चांगली नव्हती. वडील दिवसभर बेभरोशाच्या शेतीत राबायचे. इतर वेळी दुसऱ्याकडे काम करायचे आणि कुटुंब सांभाळायचे. मोठा मुलगा शिक्षणापासून दूर गेला आणि शेतमजूर बनला होता. लहानाही

तसा होऊ नये; म्हणून वडिलांनी सखारामच्या शिक्षणासाठी अनेक कष्ट करण्याची तयारी केली होती. वडिलांची धडपड आणि हालअपेष्टा त्याने पाहिलेल्या होत्या. कसे तरी पदवीपर्यंत शिक्षण पूर्ण होईपर्यंत वडिलांनी त्यांना धीर देत पुढे ढकलत नेलं होतं. त्या वेळच्या जिल्हा निवड मंडळाच्या महसूल खात्यातील जागा निघाल्या तेव्हा त्यांनी सरपंचाला सोबत घेऊन एका सदस्याकडे वशिला लावला होता. त्यामुळे सखारामला नोकरी लागली होती.

हे सर्व आठवलं आणि त्यांना वाटलं, 'आपण प्रत्येकाला मदत केली. नेहमी होकार देत गेलो. सर्वांना खुश ठेवण्याचा प्रयत्न केला. बापापेक्षा दोन पावलं पुढे गेलो. वेळ-काळ पाहून स्वतःच्या गरजांचा विचार केला नाही. योग्य व्यक्तीसाठी, योग्य वेळी समजूतदारपणे वागलो नाही. स्वतःची किंमत कमी करत गेलो.' बापापेक्षा दोन हात दूर राहता आले असते तर? तेही जमलं नाही. मग बापाच्या स्वभावाला दोष देऊन काय फायदा? त्याचं तरी काय चुकलं? शहाणी माणसं डुकराच्या नादी लागत नाहीत. दोन हात दूर राहतात. बापाला ते शहाण नव्हतं. आपणही मूर्ख. स्वतःला चांगले ठरविण्यासाठी याला-त्याला खुश करत गेलो.' अशा विचारांनी पाट्यावर चटणी वाटावी, तसं सकाळी-सकाळी त्यांचं डोकं वाटलं गेलं. त्यात त्याच्या बापाचा काही दोष नव्हता. लोकांशी वाईट वागले पाहिजे, हे काही त्याला बापाने शिकवलं नव्हतं. त्याला मात्र चांगुलपणाची फार मोठी हौस होती. ती बऱ्याचदा अडचणीची ठरली होती.

“मुलाच्या भविष्यापेक्षा मोठी कोणतीही गोष्ट नाही. एक पुरुष म्हणून चारचौघांत हरला तरी चालेल; पण बाप म्हणून हरायचं नाही.” हेच त्याच्या वडिलांनी ठरवलं होतं; म्हणून त्यांनी स्वतःच्या हौस-मौजेपेक्षा आपल्या शिक्षणासाठी वाट्टेल ते केलं होतं. त्यामुळे ‘आपल्या आयुष्याला चांगलं वळण मिळालं’, याची जाणीव सखारामला झाली होती. वडिलांविषयी एक कृतज्ञभाव त्याच्या मनात होता.

ग्रीन टी घेऊन झाला होता. थोडी तरतरी आली होती. पाच वाजले होते. घरातील सगळेच डाराडूर झोपले होते. झोपलेल्या माणसाला उठवायचं नाही, असं म्हणून त्याने पुन्हा पाणी गरम केलं आणि मॉर्निंग वॉक करून यायलाच पाहिजे, असं मनाला बजावून दाढी केल्यानंतर सहा वाजता फिरायला गेला.

पूर्व दिशेला उगवणाऱ्या सूर्याची कोवळी किरणे सभोवतीचा परिसर उजळून टाकत होती. हलकासा पाऊस पडून गेला होता. हिरव्यागार झाडांवर पडलेले दवबिंदू मोत्यांसारखे होते. शुद्ध हवा आणि त्यातील गारवा मनाला ताजेतवाने करत होता. पक्षी गोड आवाजात किलबिल करत होते आणि रस्त्यावर त्यांचं अन्न मिळवत होते. अनेक प्रकारचे अनेक पक्षी. कोणी कोणाला फसवत नव्हतं, कोणी कोणाच्या समोरचं, तोंडातलं, जवळचं घेत नव्हतं. त्यामुळे कोणी कोणाशी भांडत नव्हतं. त्यांचे

सर्व व्यवहार सुरळीत चालले होते. ते पाहून सखारामच्या डोक्यात विचार आला,

"माणसांपेक्षा कुठल्यातरी पक्ष्याच्या जन्मात गेलो असतो तर? ते तरी सुखी, समाधानी असतील का?" झपझप चालताना विचार येत होते आणि जात होते. "तसे असते तर प्रत्येक जीवाला भीती का असती मग? म्हणजे जीव कोणताही असो, सुरक्षित नाही की सुखी नाही. जगण्यासाठी संघर्ष करीत राहणं आणि जीव वाचवत शेवटपर्यंत टिकणं, हेच सगळ्यांचं टार्गेट असतं." हे त्याच्या सुज्ञ मनाला जाणवलं आणि तो अर्धा तास पूर्ण करण्यासाठी पुन्हा पावले उचलू लागला. रंगीबेरंगी फुले मंद वाऱ्याबरोबर डोलताना दिसत होती. रस्त्याच्या कडेला असलेली हिरवीगार झाडे आणि गवत पाहून मन आनंदी होत होतं.

आजूबाजूचं वातावरण अतिशय सुंदर आणि प्रसन्न दिसत होतं. मात्र डोक्यात वेगळ्याच टेन्शनचे वारे वाहत होते. सकाळी तयारी करून त्यांना संकेत पाटीलकडे जायचं होतं. निसर्गाचं हे सुंदर रूप पाहून दिवसभर काम करण्यासाठी नवीन ऊर्जा आणि उत्साह मिळायला हवा होता; पण अनेकांनी त्यांची हवा काढून टाकली होती. त्यामुळे सकाळी फिरणं आरोग्यासाठी तसेच मनाच्या आनंदासाठीही खूप फायदेशीर असलं, तरी त्यांच्या मनावरील ताणामुळे त्यांना काही फायदा नव्हता. झोपेनं आखडलेलं शरीर मोकळं झालं, एवढंच एक ठीक होतं त्यांच्यासाठी.

फिरून आल्यानंतर न उचललेल्या अंथरुणावर शवासनात पडून राहिले. लहानपणापासून त्यांना काही ती सवय नव्हती. मेडिटेशन तर त्यांच्या गावीही नव्हतं; पण सेवानिवृत्तीला चार वर्षे बाकी असताना आरोग्याची काळजी घेण्याचं स्वप्नच जणू त्यांना पडलं आणि त्यांनी फिरणं व योगा करणं हा नित्यक्रम ठरविला होता. तोपर्यंत डोक्यावरून पाणी गेलं होतं. तरीही 'देर सही, दुरुस्त सही' असं म्हणून झालेल्या चुका जाळून टाकायच्या आणि त्या राखेतून सोनं काढायचा विचार त्यांनी केला. कोणी जल्लाद म्हटलं तरी चालेल; पण माणुसकीला फाशी देऊन मुलांकडे लक्ष देण्याचा निश्चय त्यांनी केला.

सखारामने पाणी गरम केलं. कोमट होईपर्यंत दाढी करीत बसले. नंतर सरू आली. तिने तिच्यासाठी टी बनविला आणि

त्यांच्या शेजारी येऊन बसली. कोणीच कोणाशी बोलत नव्हतं. मग सरूच म्हणाली,

"काय करता मग? सुमेध म्हणतो, 'नाही नोकरी तर काही उद्योग तरी करतो.' त्यासाठी त्याला काय लागतं ते पाहता का?"

"काय उद्योग करणार! कोणतीच गोष्ट सोपी राहिली नाही आता. बरं, ते काही दोन-चार लाखांचं काम नाही. काही उद्योग करायचा म्हणजे भांडवलासाठी खूप पैसे लागतील."

"आणा मग कुठूनही."

"कसे आणणार? माणूस रिटायरमेंटला आला की मरतुकड्या घोड्यासारखा असतो. त्याला कोणी रतीब देत नाही."

"कर्ज काढलं असतं कुठून तरी."

"तेच सांगतो आहे. रिपेमेंटचा कालावधी कमी असल्याने बँक कर्जाचं नाही म्हणते."

"पहिलेच कशाले त्या भाऊ-दादाले कर्ज काढून दिलं. आता त्याच्याकडून घेऊन या. तेच पैसे सुमेधसाठी कामात येतील."

"तोच विचार करतो आहे मी. दुपारी संकेत पाटीलला फोन करण्यापेक्षा जाऊन येतो त्याच्याकडे आणि शेवटचं विचारून येतो."

“आपलेच पैसे असून का देत नाही तो? त्याले काही लाजमिज वाटत नाही का? असे कसे मित्र जोडले तुम्ही? जेबी आले ते चाटूनपुसून गेले. खरकटं साफ नाही केलं.”

“असं काय माहीत. आपण माणसांचा लोभ बाळगला. त्यांनी त्याचा फायदा घेतला.”

“इतकं साधं राहून चालत नाही. सांगत होती त ऐकलं नाही. आता फिरा त्याच्यामागे.”

“एक लिमिट असते गं कोणत्याही माणसाची. लबाडी जास्त काळ टिकत नाही. इथेच त्याची शिक्षा भोगावी लागते.”

“पण आपल्यासारख्याचे हाल होतात, त्याचं काय?” सरूच्या प्रश्नाने सखाराम शांत बसला. माणुसकीच्या दाव्यामध्ये तोच अपराधी ठरत होता; म्हणून तो काहीच बोलला नाही.

सकाळचे साडेनऊ वाजले होते. पाऊस थांबलेला होता. टू-व्हीलर चालवताना हवेतील गारवा बरा वाटत होता. मात्र संकेतच्या विचाराने, त्याच्यासारख्या लबाडांच्या विचाराने डोकं गरम झालं होतं. त्याच्यामागून येणाऱ्या गाडीने जोरात कर्णकर्कश हॉर्न वाजविला. एक बुलेट फटाके फोडत त्याच्यापुढे निघून गेली. त्याला फार राग आला. वाटलं, “या मूर्खांना अडवावं आणि सपासप त्यांच्या कानाखाली तसाच आवाज काढावा.”; पण वाटलं तसं डोक्यातून निघून गेलं. त्याला ऑफिसला पोहोचायचं होतं न. आणि त्याच्या हाती कोणाला काही बोलण्याचं

अधिकारपत्रही नव्हतं. केवळ पाहण्याशिवाय तो काही करूही शकत नव्हता. त्यामुळे मुकाट्याने रस्ता मागे टाकत होता.

सखाराम जाधव महसूल विभागात क्लार्क होते, तेव्हाचं तारुण्य झकास चाललं होतं. नंतर सिनियर क्लार्क म्हणून त्यांचं प्रमोशन झालं. या ना त्या मार्गाने पैसा येत गेला. मुलं मोठी होत गेली. त्यांच्या गरजा वाढत गेल्या. सगळं काही व्यवस्थित चाललं होतं. त्यांच्या डोक्यातील मानवतेचं भूत बऱ्याचदा जागं व्हायचं आणि त्याच्या इच्छा पूर्ण करण्यासाठी त्यांना झपाटून टाकायचं. त्यावेळी त्यांना कुटुंबाचा विसर पडायचा. संकेत नावाचं असंच भूत त्यांना बिलगलं होतं.

सखाराम बी.ए.ला असताना मराठीच्या तासाला शिकविणाऱ्या सरांचे बोल आठवले, "साहित्य हे मानवी मूल्यांचे उदात्तीकरण करतं. ती मूल्ये आपण समजून घेतली की, समाज व संस्कृतीचा विकास होतो." त्यावेळी हळव्या मनाच्या सखारामने जणू मानवी मूल्ये जोपासण्याचा विडाच उचलला होता. भेटेल त्याला खुश करण्याचं खूळ त्याच्या डोक्यात घुसलं होतं. त्यात त्याचाही एक हेतू असायचा.

"आपण लोकांसाठी शक्य होईल तेवढं करायचं. उद्या आपल्यावर वाईट वेळ आली, तर ते सगळे आपल्या पाठीशी उभे राहतील." असं त्यांना वाटायचं. त्यामुळेही त्यांना एक भावनिक दुबळेपण आलं होतं. प्रत्येकाशी चांगलं वागणं आणि जमेल ती

मदत करणं, या विचाराने कोणाची नाराजी त्यांना नको वाटायची. 'हो' म्हणतच पुढे चालत राहिले होते. मात्र पत्ते उलटे पडून डाव हातून निसटला होता.

एकदा दुपारी शिपायाने त्यांच्या नावे आलेलं टपाल टेबलवर ठेवलं आणि जरा हसून म्हटलं, "हे घ्या साहेब, बँकेचं पत्र. बघा, डी.डी. आहे की चेक आहे. संध्याकाळी पार्टी झालीच समजा आपली."

कार्यालयातील शेजारचे सहकारी कुत्र्यासारखे कान टवकारून त्या दोघांकडे उत्सुकतेने पाहू लागले होते. भोळे क्लार्क म्हणाला,

“काय हाये साहेब? लॉटरी लागली की काय? मग तर झालीच समजा पार्टी.”

“अहो भोळे भाऊसाहेब, तुम्ही माणसं करणार पार्टी ढाब्यावर जाऊन; पण आम्ही बाईमाणसं कसं येणार तुमच्या सोबत? इथेच मागवा काय मागवायचं ते.” पवारबाई बोलल्या.

“अहो मॅडम, आम्ही तुम्हाला येऊ नका असं थोडी म्हणतो. आल्याच तर आणखी मजा येईल पार्टीची.” भोळे म्हणाले.

“नको, तुम्हीच जाऊन या आणि करा मजा. जाधव साहेब तर केव्हाही पार्टी द्यायला तयार असतात; पण आमच्या नशिबात नसते ती.” बाईंनी नशिबाला दोष दिला.

“तसं नाही मॅडम, नशीब घडवायचं असतं. तुम्ही बायका लोकांचा विचार करता, घाबरता; म्हणून तुमची संधी हुकते.” ज्ञानोबा शिपाई म्हणाला.

“काय करता ज्ञानोबा, बाईच्या जातीला सगळ्या बाजूंनी विचार करावा लागतो.” बाईच्या बोलण्याने ज्ञानोबा थांबला आणि सखारामकडे पाहून म्हणाला,

“साहेब, पाकीट फोडलं नाही अजून? पहा तर खरी काय हाये त मधी.”

“काय असणार ज्ञानोबा. बँकेचं लव्ह लेटर आहे ते. घराचे हप्ते थकले आहेत ना; म्हणून पाठवून दिलं.” त्यांचे शब्द ऐकून

सर्वांनी फाइलमध्ये माना घातल्या. त्यांची वाचा गेली. ज्ञानोबाने टेबलवरची फाइल उचलून इकडची तिकडे केली.

बँकेची नोटीस आली, हे सर्वांना माहीत झालं. त्यांनी बघ्याची भूमिका घेत त्याची मजा घेतली. काहीतरी बोलायचं म्हणून भोळे म्हणाला,

"होतं साहेब, कधी कधी असं. चुकतं गणित. मागे नाही का माझंही असंच झालं होतं; पण केलं होतं बरोबर." काही न बोलता सखारामने पाकीट बॅगमध्ये ठेवलं.

एक हप्ता थकल्यानंतर बँकेचा एसएमएस आला होता. घर बांधल्यापासून आणि स्वतःच्या नावावर कर्ज काढून संकेतला उसने पैसे दिल्यापासून सखाराम अडचणीत असायचा. दुसरा हप्ता थकल्यानंतर मॅनेजरने स्वतः फोन करून थकीत हप्ता भरण्याची आठवण करून दिली होती. त्यावेळी ते म्हणाले होते,

"जाधव साहेब, तुमचे दोन हप्ते ड्यू झालेले आहेत. भरून टाका. नाहीतर विलंब शुल्क किंवा अतिरिक्त व्याज लागेल."

"हो साहेब, करतो व्यवस्था दोन-चार दिवसांत. दोन्ही हप्ते भरतो आणि एक ॲडव्हान्समध्येही ठेवतो."

"ते अधिक चांगलं होईल. नाहीतर असंच चाललं तर तुमच्या क्रेडिट स्कोअरवर त्याचा परिणाम होईल. पुढे कोणतंच कर्ज मिळणार नाही. जास्त काळ हप्ता थकीत राहिल्यास तुमचं कर्ज खाते एनपीएमध्ये जाईल. त्यानंतर बँक थकबाकी

भरण्यासाठी लेखी नोटीस पाठवेल. नोटीसनंतरही पैसे न भरल्यास बँक गहाण ठेवलेल्या घराचा ताबा घेण्याची आणि पुढे लिलाव करून कर्जाची रक्कम वसूल करण्याची प्रक्रिया सुरू करेल." मॅनेजरने एक प्रकारे धमकीच दिली होती. जप्तीचा धाक दाखवून कान टोचले होते.

ऑफिस बंद होण्याची वेळ झाल्यानंतर पवारबाई म्हणाल्या,

"बरं साहेब, येते मी."

"हो, या... बरं मॅडम, एक काम कराल का?"

"हो, सांगा न सर. शक्य झालं तर करीन."

"तुमच्या नावावर आपल्या पतपेढीचं कर्ज काढून देता का? माझे हप्ते तरी भरता येतील."

"त्यांना विचारून सांगते साहेब मी.", असं म्हणून बाईंनी काढता पाय घेतला.

"ठीक आहे. तुमच्या फोनची वाट पाहतो." सखाराम पुढे फार काही बोलू शकला नाही. विचार करत बसून राहिला आणि मनातल्या मनात पैशांची जुळवा-जुळव करीत राहिला.

ऑफिस बंद करायचं म्हणून ज्ञानोबा आला आणि हसून म्हणाला,

"साहेब, घरी जायचं नही का? की मुक्काम करता आज?"

“काय ज्ञानोबा, घराशिवाय काही पर्याय असतो का माणसाला; पण घराला घरपण असावं लागतं, घराची वाट लवकर धरण्यासाठी.”

“साहेब, काही ताण घ्यायचा नाही. होईल सगळं ठीक. वेळ काय कोणासाठी थांबते का?”

“तसं नाही हो. वेळेवर सगळं काही ठीक झालं तर मनाला बरं वाटतं. नाही तर मन जळत राहतं. नंतर कितीही ठीक झालं तरी त्याचा काय उपयोग?”

ज्ञानोबा पुढे काही बोलला नाही. दोघेही ऑफिसमधून बाहेर पडले. त्याने कुलूप लावलं. तोपर्यंत सखाराम थांबलेला होता. काय बोलावं त्याला काही कळत नव्हतं.

“काय साहेब, काय विचार आहे?”

“ज्ञानोबा, तुमची सायकल राहू द्या इथेच. चला, माझ्या सोबत.” तो काय समजायचं ते समजला आणि सखारामने गाडी सुरू केल्यानंतर त्याच्या पाठीमागे बसला.

दोघांनी वाईन शॉपवरून त्यांचा ब्रँड घेतला आणि एका ढाब्यावर जाऊन बसले. बोलता-बोलता एकेक पेग होऊन गेला होता. अजून कोणालाच तरतरी आलेली नव्हती. दुसरा पेग एका दमात रिकामा करून सखाराम म्हणाला,

“साला तो भोळे! त्याला प्लॉट घेण्यासाठी माझं कर्ज काढून पैसे दिले होते. मागच्या महिन्यात त्याला पन्नास हजार

रुपये मागितले तर दिले नाही साल्यानं. ती पवारबाईही तशीच साली. गोडगोड बोलून खर्चासाठी पैसे घेत गेली. एकदा तिला एक लाख रुपये कर्ज काढून दिलं होतं. ते भरलं, पण नऊ हजार रुपये व्याज बाकीच आहेत. ते दिलंच नाही. आता तिला उसने पैसे मागितले तर म्हणे, 'नवऱ्याला विचारते.' जेव्हा तिला माझं कर्ज हवं होतं, तेव्हा का नाही विचारलं होतं तिच्या नवऱ्याला?"

"साहेब, दुनिया अशीच आहे. ती तिच्या पद्धतीने चालते. तुमच्यासारखी माणसं फार कमी आहेत. जी दुसऱ्याच्या मनाने नाही तर मताने चालतात. माझं शिक्षण जास्त नसलं तरी मला लय अनुभव आहे. एका ताटात जेवणारी माणसं नंतर ओळखेनाशी होतात, हे मी पाहिलं आहे. आता काय, रिटायर व्हायला एक महिनाच बाकी आहे."

"चला, कसं का असेना ज्ञानोबा. तुमचं आयुष्य तर निघून गेलं. मुलंही मार्गाला लागली. नशीबवान हाये तुम्ही."

"कसलं नशीब साहेब. तुम्ही वेळीच मदत केली नसती, तर माझा मुलगा आज इंजिनिअर झाला नसता."

"माणसानं माणसासाठीच करायचं असतं, ज्ञानोबा."

"तेही खरं आहे साहेब; पण आजकाल माणसं माणसात नही राहिली. माझी तेवढी ऐपत असती, तर तुमचे उपकार नक्कीच फेडले असते; पण नाईलाज असतो काही गोष्टींना."

"असू द्या ज्ञानोबा, जे होतं ते ठीक होतं."

“अपोआप काही ठीक होत नाही साहेब. त्यासाठी जिव्हाळ्याची, माणुसकीबाज माणसं असावी लागतात.”

बराच वेळ झाला होता. दोघांनाही चढली होती. त्यांची बडबड थांबली आणि ते आपापल्या घरी परतले, तेव्हा रात्रीचे नऊ वाजले होते. सखारामची बायको-मुलं जेवायची थांबली होती. जेवताना कोणीच कोणाशी बोलत नव्हतं. मुकाट्याने जेवण करून सखाराम त्याच्या बेडरूममध्ये गेले. बोलून काही फायदा नव्हता. जो काय मार्ग काढायचा, तो त्यांनाच काढावा लागणार होता. त्यांनी अंथरूण टाकून झोपायची तयारी केली. डोकं गुंगलेलं आणि डोळे जड झाले होते; पण झोप लागत नव्हती. बेडरूममध्ये सरूचा पत्ताच नव्हता. ‘त्यांचं नेहमीचंच,’ म्हणून ती काही मनावर घ्यायची नाही. ‘का पिऊन येतात?’ म्हणून विचारायचीही नाही. मोलकरीणसारखी घरात कामं करत राहायची.

ज्यांच्यासाठी त्यांनी कित्येकदा स्वतःची कामं बाजूला ठेवली होती. ज्यांना रात्री-बेरात्री मदत हवी असली, तरी स्वतःची गाडी घेऊन धावत गेले होते. ज्यांना पैशांची गरज पडली, तेव्हा त्यांनी स्वतःच्या गरजा बाजूला ठेवून गरजूंना पैसे दिले होते. ते सारेच रात्रीच्या अंधारात गडप झालेले त्यांना दिसत होते. त्या रात्री त्यांच्या फोनवर एकही कॉल नव्हता.

“आज अडचणीत आहे; म्हणून कोणी विचारायला तयार नाही. नाहीतर इतर वेळी अनेकजण गुळाभोवती माशा भणभण करतात, तसे गोळा व्हायचे. कमजोर आणि जगण्याच्या खेळात हरलेल्या खेळाडूकडे कोणाचं लक्ष नसतं. आपणही त्यातलेच एक आहोत. ज्ञानोबा अनुभवातून बोलला, तेच बरोबर आहे.’

‘आपली उपयोगिता संपली की, लोकांचा इंटरेस्ट कमी होतो.’ हे लक्षात आलं. कोणाच्या मेसेजला उत्तर द्यावंसं वाटत नव्हतं. स्वतःहून कोणाशी बोलावंसं वाटत नव्हतं. ज्या गप्पा पूर्वी सहज व्हायच्या, त्याच नंतर थकवणाऱ्या वाटत होत्या. गोतावळ्यात असूनही मनातून एकटेपण आणि रिकामेपण वाटत होतं. असं का होतं, काहीच कळत नव्हतं. आपण आता पूर्वीसारखे राहिलो नाही; म्हणून लोक दूर होत गेले, हे जाणवत होतं. त्यामुळे सखाराम स्वतःला ‘ आपला काही दोष आहे का?’ विचारत होता.

सगळ्यांशी प्रेमाने वागूनही काही समाधान नव्हतं. त्यामुळे दुःख, निराशा आणि न बोललेल्या भावना हळूहळू मनात साचत होत्या. अनेकदा मानसिक आणि भावनिक थकवा येत होता. कारण लोकांसारखं व्हायचं म्हटलं तर तसंच होतं. ‘इतरांचे दुःख समजून घेतले, त्यांच्यासाठी वाट्टेल ते केलं; पण त्यात मानसिक ऊर्जा हळूहळू कमी होत गेली. कारण त्यांची मनापासून काळजी करत त्यांना वेळ, प्रेम आणि भावना खर्च करत गेलो. मात्र त्यांच्या स्वार्थामुळे काही काळानंतर मन थकलं. कारण ते नातं एकतर्फी

होतं. नेहमी इतरांचं ऐकत गेलो; पण मला समजून घेणारं कोणी भेटलंच नाही. बरेच लोक फक्त त्यांना गरज असतानाच माझी आठवण काढायचे. हे ठेच लागल्यावर लक्षात आलं. तेव्हा अशा लोकांपासून मी नकळत दूर गेलो; म्हणून सांगतो साहेब, तुम्हीपण लोकांचा नाद सोडा. इथे सारे आपल्याला थकवणारे असतात. ऊर्जा देणारे नसतात. त्यांच्या मतलबीपणाने आपलं मन थकतं. तेव्हा त्या मनाला विश्रांतीची गरज असते. आता तुमची अवस्था तशीच झालेली आहे. मी तुम्हाला पहिल्यापासून पाहतो आहे.

साहेब, तुम्ही सर्वांना जवळ केलं. फार जीव लावला. आता तुम्हाला सर्वांत जास्त आधाराची गरज आहे. तेव्हा तेच लोक तुम्हाला एकटं सोडून गेले. तुम्ही समजून घेण्याचा प्रयत्न करत त्यांच्या चुका माफ केल्या; पण वारंवार दुखावल्यानंतरही तुम्ही सावध झाले नही. फार साधे हाये साहेब तुम्ही. मीही तुमच्यासारखाच होतो. नंतर लोकांची चाल ओळखून त्यांच्यावर विश्वास ठेवणं कमी केलं. त्यांच्या खूप जवळ जाण्यापूर्वी विचार केला आणि स्वतःभोवती एक अदृश्य भिंत उभी केली. आता तुम्हीही तसंच करा. मी मुलांचा विचार केला. तेव्हा कुठे त्यांच्यासाठी काहीतरी राखून ठेवू शकलो. नंतर त्यांनी आपल्याकडे पाठ फिरवली, तरी काही वाईट वाटणार नाही. कारण तूप सांडलं तर पानावर सांडलं, हे एक समाधान वाटतं.

इथे लोकांचं काय, ते फक्त पिकलेलं फळ तोडण्याच्या विचारात असतात.” ज्ञानोबानं त्याची कहाणी पुढे सुरु ठेवली.

“साहेब, याचा अर्थ असा नाही की, लोक वाईट आहेत. फक्त तुमचे मार्ग वेगळे करा आणि सरळ मार्ग सोडा. त्याशिवाय तुमचे प्रश्न कमी होणार नाहीत. काही लोक आपल्या जीवनात येतात व एखादा धडा शिकवून जातात. नंतर आपल्या आयुष्यातून निघून जातात. तेव्हा आपल्याला वाईट वाटतं की, प्रत्येक व्यक्ती आपल्याला समजू शकत नाही. हा आपला दोष असतो. उगीच आपण नको त्याच्यामध्ये गुंतून पडतो; म्हणून स्वतःला योग्य सिद्ध करण्याचा प्रयत्न सोडा. आपली ऊर्जा कुठे आणि कोणावर खर्च करायची, याबद्दल तुम्ही अधिक सावध राहा. कारण स्पष्ट बोलतो, ‘तुम्ही काही महात्मे पुरुष नही की, लोकांसाठी घरावर तुळशीपत्र ठेवत हाये. लोकांच्या अपेक्षा आणि गरजा आपण पूर्ण करू शकत नाही. त्या वाढत जातात आणि आपणच कमी पडतो. तेव्हा लोक आपल्याला नावं ठेवतात की, ‘हा पहिल्यासारखा नही राहिला.’ त्यापेक्षा पहिल्यापासून कोणी वाईट म्हटलं तर चालतं. तेव्हा मनाला तरी काही वाटत नाही.”

कुटुंब आपल्याला योग्य मानत नाही, असं आपल्याला वाटतं; पण शेवटी तेच आपल्या पाठीशी असतं. ज्यांच्याकडून आपण आपल्या चांगलेपणाचं सर्टिफिकेट मिळवू पाहतो, ते फक्त कामापुरती शाबासकी देणारे असतात; म्हणून सांगतो साहेब, हळूहळू एकटे राहा. स्वतःसोबत वेळ घालवून शांतता

मिळवा. 'छोटा मुँह, बडी बात', असं समजा; पण हे माझ्या अनुभवातून आलेलं शहाणपण तुम्हाला सांगितलं हाये."

झोपताना सखारामला ज्ञानोबाची सारी बडबड आठवत गेली.

"ज्ञानोबा मनाने चांगला, तितकाच प्रामाणिक माणूस आहे. आता थोड्याच दिवसांत रिटायर होणार. आयुष्यभर ठेचा खाऊन आलेलं शहाणपण त्याने सांगितलं होतं. म्हणजे काही माणसांना जगाच्या जगरीतीने कोल्ह्यासारखं चतुर, सावध आणि परिस्थितीनुसार वागता येत नाही. समज येते तेव्हा वेळ निघून गेलेली असते. ज्ञानोबाचं, तसं आपलंही झालं."

विचार करता-करता सखारामला केव्हा झोप लागली, त्याचं त्यालाच कळलं नव्हतं.

*** *** ***

सुमेधला एम.कॉम. होऊन एक वर्ष झालं होतं. त्या वर्षात त्याने स्पर्धा परीक्षेचे क्लास लावलेले होते.पहिल्या आठवड्यात त्याला मित्रांचे फोन येत होते.

"भाऊ, काळजी करू नकोस. आम्ही आहोत ना!"

"काही लागलं तर सांग."

"तू एकटा नाहीस."

मित्रांच्या अशा काही शब्दांनी त्याला धीर दिला होता, पण दुसऱ्या आठवड्यात फोन कमी झाले.

तिसऱ्या आठवड्यात संदेशांची उत्तरं उशिरा येऊ लागली आणि काही दिवसांनी तेच मित्र रस्त्यात भेटले, तर नजरा चुकवू लागले. तो बराच वेळ शांत बसायचा. त्याच्या मनात एकच प्रश्न पडायचा की, 'मी माणसं ओळखण्यात इतकी मोठी चूक केली का?' पुन्हा एक प्रश्न पत्रिकाच त्याला समोर दिसली. 'ते लोक वाईट होते का? कदाचित नव्हते. मग ते बदलले का? की परिस्थिती बदलली आणि त्यांच्या नात्याचा खरा आधार दिसू लागला का ?' या उत्तरांच्या शोधत त्याला पाचशे वर्षांपूर्वी निकोलो मॅकियावेली नावाच्या एका विचारवंत माणसाची भेट झाली.

निकोलो मॅकियावेली यांनी मानवी स्वभावाकडे अशाच कठोर नजरेने पाहिलं होतं. लोकांनी त्याला निर्दयी म्हटलं. काहींनी त्याच्या विचारांना अमानवी म्हटलं; पण राजकारणी, सत्ताधीश, उद्योगपती आणि रणनीतीकार त्याचे विचार वर्षानुवर्षं वाचत राहिले. कारण मॅकियावेली जग कसं असायला हवं याबद्दल बोलत नव्हता. तो जग प्रत्यक्षात कसं चालतं, हे समजून घेण्याचा प्रयत्न करत होता. त्याच्या विचारांचा एक कठोर अर्थ असा होता,

"माणूस नेहमी व्यक्तीशी निष्ठावान असेलच असं नाही. अनेकदा तो स्वतःच्या गरजांशी, फायद्यांशी आणि परिस्थितीशी निष्ठावान असतो. जोपर्यंत एखाद्या नात्यात त्याला आधार, आनंद, प्रतिष्ठा किंवा फायदा मिळतो, तोपर्यंत ते नातं मजबूत

वाटतं, पण परिस्थिती बदलली की, काही नातीही बदलतात. हे सत्य स्वीकारणं कठीण होतं. कारण विश्वास तुटताना फक्त एक व्यक्ती दूर जात नाही. आपण त्या व्यक्तीबद्दल मनात तयार केलेली प्रतिमाही तुटते. त्यमुळे विश्वासघात फार वेदनादायक असतो.” या विचारांची आणि वडिलांच्या जगण्याची रीत आणि वास्तव याचा मेळ सुमेध तपासून पाहात होता.

सखाराम भलताच इमोशनल माणूस. मनात कुठले किंतु-परंतु न ठेवता दिलखुलास जगणारा आणि मनाने उदार असा होता. या उलट संकेत होता. जसं रस्त्यावरचं गोड बोरीचं झाड. कोणीही यावं आणि बोरं वेचून आस्वाद घेऊन जावं.' असा तो वागायचा.

*** *** ***

संकेत सखारामच्या कॉलनीत राहायचा. एम.आय.डी.सी.मध्ये त्याने इरिगेशनचा प्लांट टाकलेला होता. तो एक नंबर चालबाज आणि धोकेबाज व्यक्तीचा नमुना होता. इतका गोड बोलायचा की, त्याच्या मनातला हेतू कोणाला कळूही द्यायचा नाही. त्याच्या ऑफिसमध्ये बऱ्याचदा संध्याकाळी सखारामला बोलावून पार्टी करायचा. मात्र काम असेल तेव्हाच बोलवायचा. कोणाचे काही देणं असलं की टाळायचा. माणसाचं खूप कौतुक करून जवळीक साधण्यात पटाईत होता. गोड बोलून काम काढून घ्यायचा आणि काम झाल्यावर बदलून जायचा. खोटं बोलण्यात आणि खऱ्या गोष्टी बदलण्यात फारच चतुर होता. त्यामुळे सखाराम त्याच्या जाळ्यात अडकला होता.

एकदा असंच झालं होतं. संकेतने एम.आय.डी.सी.मध्ये दहा हजार स्क्वेअर फूट जागा घेऊन कमी भांडवलात ड्रिप आणि स्प्रिंकलर विक्री व डीलरशिप व्यवसाय सुरू केला होता. या

छोट्या विक्री व्यवसायातून त्याला नंतर लहान ड्रिप इरिगेशन पाइप प्लांट सुरू करायचा होता. त्यासाठी बराच खर्च येणार असल्याने एक दिवस सखारामला बोलावून पार्टी दिली.

"साहेब, एक कराल का? नाही, कराच..."

संकेतनं आधीच असा आग्रह केला.

"बोला न, काय म्हणता?"

"एक मोठा प्लांट सुरू करायचा आहे. तुम्ही मला काही मदत करा."

"माझी तेवढी ऐपत कुठे आहे. आमच्या पगारात जेमतेम आमचं पोट भरतं. बाकी सारं कर्जाचे हप्ते आणि इन्कम टॅक्स, इतर काही कापाकुपीतच आमचा पगार जातो."

"अहो साहेब, मी काही कॅश मागत नाही. तुमच्या नावावर कर्ज काढून द्या. हप्ते मी भरेन. तुम्हाला काही अडचण येणार नाही."

"...पण ते कसं शक्य होईल? कर्ज मिळणं कठीण आहे."

"काय साहेब, मित्र म्हणून तुम्हाला माझी काळजी असती, तर तुम्ही एवढं काम केलं असतं."

सखारामने 'नाही' म्हटल्यानंतरही त्याने प्रेमळ मैत्रीचं नाटक करून आग्रह केला होता. पार्टी रंगली होती. शेवटी बरंच काही सांगून त्याने सखारामला राजी केलं. त्यांच्या नावावर तीस लाख रुपयांचं पर्सनल लोन घेतलं होतं. हप्ते तर सखारामच्या

पगारातून कापले जायचे. संकेत कधी ते हप्ते परत करायचा, तर बऱ्याचदा पैसे द्यायला उशीर व्हायचा. त्यामुळे सखारामला अडचणी निर्माण व्हायच्या.

संध्याकाळी ऑफिस बंद झाल्यानंतर सखाराम सरळ संकेतच्या फॅक्टरीत गेला. त्याला पाहून तो जरा संकोचला होता. थोडा वेळ त्याने नजर खाली घालून काहीतरी बोलायचं म्हणून हसत म्हणाला,

"या साहेब, फोन केला असता तर आधीच घेऊन आलो असतो आपलं पार्सल."

"नको. काय करता सांगा. तुम्ही म्हटले होते, 'एक महिन्यात कर्ज निल करतो.' आता वर्ष होऊन गेलं, तरी काहीच हालचाल केली नही."

"लवकरच निल करू. काही टेन्शन घेऊ नका. थोड्याच दिवसांत नव्या प्लांटवर कर्ज काढलं की तुमचे पैसे देऊन टाकतो. तुम्ही बसा, मी आलोच."

सखारामच्या उत्तराची वाट न पाहता संकेत बाहेर पडला. वाईन शॉपवर जाऊन दोघांसाठी नेहमीचा ब्रँड घेऊन आला.

दोघेही पित बसले होते. 'काय बोलावं, कसं सांगावं?' ते सखारामला कळत नव्हतं. पैशांचा विषय निघाला की संकेत दुसरीच गोष्ट काढून टाळत होता. शेवटी सखाराम म्हणाला,

“हे पाहा पाटील, तुम्ही काय मार्ग काढायचे ते काढा आणि माझे पैसे देऊन टाका. सध्या लय अडचणी आहेत.”

“नक्कीच देतो. एक कर्जप्रकरण टाकलं आहे. ते पास झालं की पहिले तुमचं कर्ज निल करतो.”

नेहमीप्रमाणे संकेतने आश्वासन देऊन सखारामची निराशा केली. दारूच्या एका बाटलीवर खुश करून परत पाठवलं. लोकांच्या तोंडाला पानं पुसण्यात तो पटाईत असल्याचं सखारामच्या उशिरा लक्षात आलं होतं. स्वतःचं काम होईपर्यंत गोड बोलून फार जवळीक दाखवायचा. बायकोला सोबत घेऊन लोकांकडून पैसे मागायचा. त्याची पत्नीही व्यवहारात भाग घेऊन पैसे परत करायची हमी द्यायची. त्यामुळे त्याच्या मित्रांना फारसा नकार देता येत नव्हता.

काम झाल्यानंतर संकेतची बायको कधीच दिसायची नाही. मात्र तो अडचणीत सापडला की ती झिलकऱ्यासारखी त्याच्या सोबत उभी राहायची. त्यामुळे सुरुवातीला त्याच्या मित्रांना तिचं वागणं आवडायचं. हळूहळू ते संकेतच्या जाळ्यात अडकायचे. त्याचा हेतू साध्य झाला की मात्र त्याला त्या मित्रांची आठवणही राहायची नाही. फोन केला, तर तो उचलायचा नाही; भेटायलाही टाळाटाळ करायचा. त्याच्या बायकोला विचारलं, तरी तीही उडवाउडवीची उत्तरं द्यायची. अशी नमुनेदार जोडी सखाराम काही वर्षांपासून पाहत आला होता.



प्रत्येक वेळी संकेत नवं कारण, नवा बहाणा पुढे करायचा. त्याला त्याच्याच आश्वासनाची आठवण करून दिली, की तो लगेच पलटी मारायचा. "मी असं कधी म्हटलंच नव्हतं," असं ठामपणे सांगून समोरच्यालाच खोटं ठरवायचा. 'उद्या', 'नंतर', 'बघू' अशा शब्दांनी वेळ मारून न्यायची आणि तोपर्यंत स्वतःचा फायदा करून घ्यायचा. स्वतःची चूक कधी मान्य करायची नाही; उलट दोष दुसऱ्याच्याच माथी मारायचा. एका माणसाला एक, तर दुसऱ्याला दुसरंच सांगायचा. त्यामुळे लोक त्याला नावं ठेवायचे; पण तोही नवे मित्र जोडून आपली गरज भागवत राहायचा.

सखारामशीही त्याने गोड बोलून, आपुलकी दाखवून अनेक कामं करून घेतली होती भावनेच्या भरात वाहून गेलेला सखाराम . त्याच्या गोड बोलण्याला भुलला आणि नकळत त्याच्याच जाळ्यात त्या .अडकला होताजाळ्यातून बाहेर पडणं त्याला दिवसेंदिवस कठीण होत गेलं सखाराम अनेकदा आर्थिक अडचणीत असल्याचं . संकेतला माहीत असूनही त्याचे पैसे परत करण्याची त्याची तयारी कधीच दिसली नव्हतीउलट नवे बहाणे ., नवी आश्वासनं देत तो वेळ मारून नेत होता.

सुमेधला एम.कॉम. होऊन एक वर्ष झालं होतं. तीन वर्षांपासून तो जळगावला राहून स्पर्धा परीक्षेची तयारी करीत होता. त्यासाठी त्याने क्लासही लावले होते. बरेच अर्ज करूनही कुठे काही नोकरीची संधी मिळत नव्हती. नेहमीप्रमाणे 'उडान स्पर्धा परीक्षा कोचिंग क्लास'चे संचालक विरेंद्र खेडकर यांनी एका कॉर्पोरेट कंपनीशी संपर्क करून विद्यार्थ्यांसाठी प्लेसमेंट कॅम्प आयोजित केला होता. त्यासाठी एच.आर. विभागातील गणेश शिरोळे आणि त्यांची समिती एच.आर. रिक्रूटर म्हणून मुलाखती घेण्यासाठी आले होते. उमेदवारांचे रिझ्युमे तपासून पात्र उमेदवारांची उमेदवारांची शॉर्टलिस्ट करत होते.

बऱ्याच वेळानंतर सुमेधचा नंबर आला होता. समोर तीन कंपनीचे तीन जण आणि संचालक खेडकर बसलेले होते. सुमेध जाऊन त्यांच्या समोरील खुर्चीत बसला. शिरोळे साहेब म्हणाले,

"Tell me about yourself — स्वतःबद्दल सांगा."

"माझं नाव सुमेध सखाराम जाधव. I completed M.Com from Savitribai Phule Pune University with specialization in Advanced Accounting."

"तुम्ही M.Com का केलं?"

"Accounting, Finance, Taxation आणि Businessचं सखोल ज्ञान मिळवण्यासाठी M.Com केलं आहे."

"तुमची Strength काय आहे?"

“नवीन गोष्टी शिकतो. आकडेवारी आणि आर्थिक माहिती व्यवस्थित हाताळू शकतो.”

“तुमची Weakness काय आहे?”

“कधी कधी एखादं काम अचूक करण्यासाठी मी त्यातील तपशील तपासण्यात जास्त वेळ घेतो. आता मी कामाचं प्राधान्य ठरवून वेळेत आणि अचूक काम पूर्ण करण्याचा प्रयत्न करतो.”

“तुम्हाला आमच्या कंपनीत काम का करायचं आहे?”

“कंपनीच्या Finance/Accounts क्षेत्रात अनुभव मिळवायचा आहे आणि स्वतःची कौशल्यं वाढवायची आहेत.”

“Accountingचे Golden Rules कोणते?”

“Personal Account: Receiver ला Debit, Giver ला Credit. Real Account: जे येते ते Debit, जे जाते ते Credit.”

“Profit and Loss Account म्हणजे काय?”

“ठरावीक कालावधीतील उत्पन्न, खर्च आणि नफा किंवा तोटा दाखवणारं स्टेटमेंट.”

“तुम्ही Fresher आहात; अनुभव नसताना काम कसं कराल?”

“माझ्याकडे शैक्षणिक ज्ञान आहे. मी नवीन प्रक्रिया शिकण्यास तयार आहे.”

"तुमची पगाराची अपेक्षा किती आहे?"

"कंपनीच्या Fresher Policy आणि पदाच्या जबाबदारीनुसार योग्य पगार अपेक्षित आहे."

असे बरेच काही प्रश्नोत्तरे झाली. सुमेध परत जाताना शिरोळे साहेब म्हणाले,

"मुलाखती झाल्यानंतर येऊन भेटा."

"हो सर..."

सुमेधने मान हलवली; पण *'मुलाखतीनंतर त्यांनी मला का बोलावलं असेल?'* हा प्रश्न त्याच्या मनात घर करून बसला होता तो . प्लेसमेंट समितीच्या .थेट विचारण्याचं धाडस त्याला झालं नाही संपल्यावर त्यांना भेटायचं, एवढंच त्याने मनाशी ठरवलं.

संध्याकाळी पाच वाजता मुलाखती संपल्या. ठरल्याप्रमाणे सुमेध उत्साहाने शिरोळे साहेबांना भेटायला गेला. 'सिलेक्शन झालं असावं,' असं त्याला वाटलं होतं; पण इतरांना तर तसं काही सांगितलं नव्हतं. त्यामुळे मनात शंकाही येत होत्या. काही प्रश्नही पडत होते. तशात तो जाऊन भेटला.

शिरोळे साहेबांनी परत जाण्यासाठी कार काढली. त्याला समोरच्या सीटवर बसायला सांगितलं. 'ही काय भानगड आहे?' म्हणून तो आणखी गोंधळला. साहेब काही सांगत नव्हते आणि

त्याला काही उलगडा होत नव्हता. तो शांत बसून काचेतून बाहेर पाहत होता.

काही अंतरावर गेल्यानंतर साहेबांनी एका रेस्टॉरंटसमोर गाडी पार्क केली आणि खाली उतरून सुमेधला सांगितलं,

"ये चल, काही घेऊ आपण थंड-गरम."

सुमेधला गोंधळल्यासारखं झालं. 'काय प्रकार चालला हा?' मनातल्या मनात तो तर्क-वितर्क करत होता. स्पष्ट विचारावं तर, 'कसं आणि काय विचारावं?' हेही त्याला सुचत नव्हतं. साहेब, त्यांचा क्लार्क आणि सुमेध तिघेही एका टेबलावर बसले. साहेबांनी तीन चहाची ऑर्डर दिली आणि "नाश्ता करायचा का?" म्हणून विचारलं. त्याने 'नाही' सांगितलं. मग साहेबांनी पुन्हा विचारलं,

"ओळखलं का?"

साहेबांनी पुन्हा त्याची उत्सुकता ताणली.

"नाही." तो म्हणाला; पण काहीतरी विशेष आहे, असा विचार करून त्याला बरं वाटलं.

"ओळखणार तरी कसा? फार लहान होता, तेव्हा एकदा आलो होतो तुझ्या घरी."

"हो का?" तो एवढंच बोलला. आता जवळची व्यक्ती असल्याचं त्याच्या लक्षात आलं आणि बऱ्याच वेळानंतर त्याच्या डोक्यातला गोंधळ पाचोळ्यासारखा वाऱ्यासोबत उडून गेला. साहेबांनी सांगितलं,

"तुझे वडील आणि मी बारावीपर्यंत सोबत होतो. ते आर्ट्सला गेले आणि मी कॉमर्सला होतो. फार जिवलग मित्र होतो

आम्ही. तसे आताही आहोतच; कामाच्या व्यापामुळे फारशा भेटीगाठी होत नाहीत."

"हो का? मला एवढं माहीत नव्हतं..."

काहीतरी बोलावं म्हणून सुमेध बोलला.

"कसे आहेत ते? तब्येतपाणी...?"

"छान आहेत. कधी कधी तुमचा विषय काढतात ते. खूप मोठ्या पदावर आहात, म्हणून सांगतात. त्यांनीच मला तुमचं उदाहरण देऊन अकरावीपासून कॉमर्स घ्यायला सांगितलं होतं."

"हो का? अरे वा! छान! पण अलीकडे फार सॅच्युरेशन झालं आहे बऱ्याच फॅकल्टीमध्ये. आमच्या वेळेला एवढी काही स्पर्धा नव्हती आणि कंपन्याही फारशा नव्हत्या."

"त्यामुळेच अंकल, आम्हाला नोकरी मिळणं फार कठीण जातं. वरतून पप्पा सांगतात, 'काहीतरी कर.' करतो आहे. स्पर्धा परीक्षेची तयारी."

"तुझे वडील आणि मी सोबतच ग्रॅज्युएट झालो होतो; पण तुझ्या आजोबांचा स्वभाव चांगला असल्यामुळे वशिला लागला आणि तुझ्या वडिलांना नोकरी मिळाली. माझं एक वर्ष असंच वाया गेलं होतं."

"हो का? मग काय केलं तुम्ही?" सुमेधने विचारलं.

“मी बी.कॉम. झालो, त्यावेळी ‘Human Resource Management’ अर्थात ‘HRM’ची फार चर्चा होती. तो कोर्स केला की चांगली नोकरी मिळते, असं बोललं जायचं.”

“आता आम्हाला तो विषयच होता अभ्यासक्रमाला.”

“तुझ्या वडिलांचं नोकरीचं पहिलं वर्ष होतं आणि लग्नही झालं नव्हतं. मी असा तुझ्यासारखा बेकार पाहून ते मला काहीतरी करण्यासाठी पुश करायचे. एकदा मी त्यांना सांगितलं होतं, ‘यार, एम.बी.ए.बाबत कोणाला काही फार माहीत नाही. मला तो कोर्स करायचा आहे; पण पैशांच्या प्रॉब्लेममुळे मी थांबलो.” सुमेधने मध्येच त्यांचं बोलणं तोडत विचारलं,

“मग काय झालं? तो कोर्स केला की नाही?”

“तेच सांगतो. तुझे वडील खूप रागावले. शिव्याही दिल्या आणि म्हणाले, ‘जा. तो कोर्स पूर्ण कर. किती पैसे लागतात ते सांगत जा.’ खरं तर त्यांच्यामुळेच मी इथपर्यंत येऊ शकलो. त्यांचे फार उपकार आहेत माझ्यावर.” हे ऐकून सुमेध फारच मोकळा झाला.

कंपनीचे मोठे अधिकारी आपल्या जवळचे आहेत; म्हणून त्याला फार दिलासा मिळाला. तो म्हणाला,

“काका, त्यांचा स्वभावच आहे तसा. अजूनही ते घरच्याइतकीच लोकांची काळजी घेतात. मदत करतात; तुमचा

काळ वेगळा होता. लोकं काम काढून घेतात आणि बेईमान होतात. आम्ही लय सांगतो त्यांना; पण ते काही ऐकत नाही."

"सुमेध, अरे स्वभाव असतो काही माणसांचा. अशा माणसांना लोकांनी कितीही फसवलं तरी त्यांचं काही बिघडत नाही. त्यांची तरक्कीच होत राहते."

"पण काका, घरात चिडचिड होते. बाहेरचे ताण घरात येतात आणि सगळी शांतता बिघडते."

"अरे वा! फार छान बोलतोस तू. आजपासून चिंता सोड. एच.आर.मध्ये एम.बी.ए. कर. बाकी मी सांभाळून घेईल. तुझ्या वडिलांना सांग, 'या निमित्ताने आपली भेट झाली म्हणून.' तुझा तो कोर्स पूर्ण झाला की, मला येऊन भेट. चिंता करू नको. आणि त्यांनाही सांग."

"हो काका---"

तितक्या वेळात एक फॅमिली वातावरण तयार झालं होतं. सखारामने केलेल्या उपकारांची फेड करण्याची संधी म्हणून शिरोळे साहेबांनी सुमेधकडे पाहिलं होतं. मात्र मनातील गोष्टी सांगितल्या नव्हत्या.

संकेत पाटीलने याच्या-त्याच्याकडून पैसे घेऊन ड्रिप प्लांट सुरू केला होता. तो काही स्वतः पाइप तयार करत नव्हता. वेगवेगळ्या कंपन्यांकडून ड्रिपचे पाइप व पार्ट खरेदी करत होता. शेताच्या मापानुसार पूर्ण किट तयार करून विकत होता.

असा त्याचा पूर्ण ड्रिप किट बनविण्याचा असेंबलचा उद्योग चाललेला होता. त्यासाठी तर आगाऊ पैसे मोजावे लागत होते. तिथे काही उधारीचा मामला नव्हता. तसे पाहिले तर उत्पादन प्लांटपेक्षा गुंतवणूक कमीच होती; पण व्यवसाय आणि व्यवहाराचा खेळ आणि मेळ त्याला जमत नव्हता. 'चार

आण्याची कोंबडी आणि बारा आण्याचा मसाला', अशी त्याच्या कुटुंबाची लाईफस्टाईल होती.

संकेतने सुरू केलेला उद्योग असेंबलचा असला, तरी इतका सोपा वाटत नव्हता. शेताची पाहणी करणं, क्षेत्र व पिकाची माहिती घेणं, ड्रिप डिझाइन करणं, लागणाऱ्या कच्च्या मालाची यादी करून पार्ट खरेदी करणं, नंतर किट पॅकिंग करून शेतकऱ्याला पुरवठा करणं, शिवाय फिटिंग आणि सर्व्हिस देणं, अशी कामाची साखळी करावी लागत होती. त्यासाठी दहा-अकरा कामगार त्याने कामाला ठेवले होते. त्यांचे पगार आणि इतर मेंटेनन्स यासाठी ऐंशी-नव्वद हजार रुपये महिन्याकाठी लागत होते. "तेवढ्या पगाराची नोकरी केली असती तर बरं झालं असतं," असेही कधी-कधी त्याच्या मनात यायचे.

शेतीसाठी लागणारे ड्रिपचे पाइप, पार्ट, किट, फिटिंग, सर्व्हिस आणि दुरुस्ती यातून त्याला इन्कम येत होतं. खर्च वजा जाता एका किटमागे आठ-दहा हजार रुपये सुटायचे; परंतु शेतकऱ्यांकडून हातोहात रोख पैसा येणं फार कठीण होतं. सर्वांत मोठी जोखीम उधारीची असायची. जास्त दिवस पैसे अडकले तर नफा हा तोट्यात जायचा. व्यवसायातील स्पर्धेलाही तोंड द्यावं लागत होतं. त्यामुळे 'सोपं असं काही नसतं. पैसे काही सहज हाती येत नाहीत.' असेही त्याला वाटायचं. त्याच्या चालबाज स्वभावामुळे बऱ्याच गोष्टी तो सोप्या करून टाकायचा. इकडून-तिकडून पैसे घेऊन उद्योग सुरु ठेवायचा.

परिसरातील शेतकऱ्यांशी संपर्क करायचा. स्वतःची विक्री व फिटिंग टीम होती. कमी उधारी ठेवायचा. त्याचा स्टॉक वेगाने फिरण्याची क्षमता त्याच्यात होती. शेतकऱ्याकडून आगाऊ रक्कम घ्यायचा. त्यामुळे उधारीचा ताण ठेवायचा नाही. फिटिंग पूर्ण झाल्यावर उरलेले पैसे घेऊन मोकळा व्हायचा आणि जास्त दिवसांची खुली उधारी टाळायचा. किती पैसे प्रत्यक्ष वसूल झाले आणि स्टॉक किती दिवसांत फिरला, यावर लक्ष ठेवून असायचा. असं सारं व्यवस्थित चाललेलं असूनही व्यवहाराच्या बाबतीत मात्र फार लबाडी करायचा.

एका शेतकऱ्याला पाच एकर केळी पिकासाठी ड्रिप किट बसवायची होती. त्यासाठी तो संकेतकडे आला होता. काम फक्त पाइप व पार्ट देण्याचं नव्हतं. आधी शेताची पाहणी करून पाणी तपासायचं होतं. त्यावरून किटचं डिझाइन, साहित्याचा अंदाज घेऊन किट तयार करून फिटिंग करायची होती. त्यासाठी शेतात जावं लागणार होतं. त्याने शेतकऱ्याला सांगितलं,

"साधारणतः चार ते साडेचार लाख रुपये खर्च येईल. शेत पाहिल्यानंतर निश्चित खर्च तुम्हाला सांगेल."

शेतकरी अनुभवी असल्याने 'हो'कार दिला. संकेत पुढे म्हणाला,

"आधी अर्धी रक्कम द्यावी लागेल. मग साहित्य मागविलं जाईल. ड्रिप किट तयार करताना उरलेल्या रकमेतील अर्धी

रक्कम द्यावी. बाकी उरलेले पैसे फिटिंग व चाचणी पूर्ण झाल्यावर द्या."

शेतकरी विचारात पडला आणि संकेतला विचारलं,

"मी तुम्हाला तीन लाख रुपये देईल. बाकी जे राहतील ते एक-दोन महिन्यांत नील करून देईल. माझे काही पैसे व्यापाऱ्याकडे अडकले आहेत. ते आले की लगेच देऊन टाकीन."

"त्याचं काय आहे काका, आम्हाला फार मर्जिन नसतं या धंद्यात. कंपनीला आधीच पैसे पाठवावे लागतात. शिवाय कामगारांचे पगार वेळेवर द्यावे लागतात."

त्याचं ऐकून शेतकरी अबोल झाला. 'हा', 'नाही' करता-करता त्यांचे व्यवहार ठरले. दुपारी चार-पाच वाजता शेतातही जायचं ठरलं. सगळं बोलणं झाल्यानंतर शेतकरी निघून गेला.

संकेतच्या डोक्यात जुळवाजुळव चालली होती. त्याने पत्नी संगीताला फोन करून सांगितले,

"एक काम करशील, तू स्कुटी घेऊन दोन वाजता फॅक्टरीत येशील."

"का बरं? काय काम आहे?" तिने विचारलं.

"इतकं काही अर्जंट नाही; पण येऊन जा. घरीही रिकामीच बसशील न?"

"बरं, ठीक आहे." ती म्हणाली. नंतर त्याने फोन कट केला.

संकेत बराच वेळ विचार करत बसला. सेकंड सॅटरडे असल्याने त्याला सखारामची आठवण झाली. टेबलावरील मोबाईल घेऊन फोन लावला,

“साहेब नमस्कार. काय करता आहे? सुटी असेल ना आज?”

“बोला, काय म्हणता? कशी काय आठवण झाली? काही काम आहे का?”

“तसं नाही हो साहेब. काम असतं तेव्हाच थोडी आठवण करायची असते आपल्या माणसाची.”

“मग काय विशेष आहे, सांगा.”

“विशेष असं काही नाही. संध्याकाळी पार्टी आहे. या चार वाजता. आणि सोबत भोळे भाऊसाहेबांनाही घेऊन या. मागच्या वेळेस आले होते ते तुमच्यासोबत.”

“चालेल, ठीक आहे.” म्हणून सखारामने फोन कट केला.

घड्याळाचे काटे काही थांबत नव्हते. वेळ पुढे-पुढे सरकत होती. तो जसा वाघूर लावून बसलेला होता. एकेक डाव रचत होता. पुन्हा मोबाईल घेऊन त्या शेतकऱ्याला लावला आणि विचारलं.

“हं काका, तुम्ही आहात ना शेतात?”

“हो---”

“मग आम्ही येतो चार वाजता नक्की.”

“हो या---”

"---आणि एक काम करूया. माझे दोन मित्रही आहेत सोबत. मी माझे दोन मजूरही पाठवतो आधी तुमच्याकडे. तुमच्या मळ्यात पार्टी करू. ते करतील सगळी तयारी. तुम्हीही थांबा जेवायला."

"बरं, ठीक हाये. द्या त्यांना पाठवून---"

सगळ्यांशी बोलून झाल्यावर संकेतला हायसं वाटलं. चिंतेचं ओझं काहीसं कमी वाटू लागलं होतं. दुपार टळून गेली होती. ठरल्याप्रमाणे संगीता आली. संकेतच्या केबिनमध्ये रिकामी बसून राहिली. तो काही सांगेना आणि ती काही विचारेना. काही वेळाने न राहवून ती म्हणाली,

"तुम्हाला का भीती वाटत होती का, मला सोबतीला बोलावलं त ? काही सांगितलंच नही का बरं बोलावलं?"

"तसं नाही गं, एक ड्रिप किटची ऑर्डर आली आहे. माल मागवायचा, तर पैसे नाहीत."

"उधारी जमा करा न मग."

"उधारी तेवढी काही नाही. दोनेक लाख रुपये लागतील आपल्याला---"

"मग काय करता---?"

"बघू न, काय करता येईल ते."

दोघेही पैशांची तजवीज करण्याच्या विचारात पडले होते. काही वेळाने सखाराम आणि भोळे दोघेही आले. सोफ्यावर बसले. समोर संकेत आणि बाजूला संगीता बसली होती.

“अरे, काय मिटिंग आयोजित केली आहे की काय---?” सखारामने गमतीने विचारले.

“तुम्ही बसा. मी आणि भोळे साहेब जाऊन येतो जरा.”

असं म्हणून संकेत खुर्चीतून उठला. कुठे जायचं? का जायचं? काही न सांगता संकेतने भोळेला सोबत घेतलं आणि त्याला गाडीत बसवून फॅक्टरीच्या बाहेर पडला.

कॅबिनमध्ये थोडा वेळ शांतता पसरली. पंख्याची घरघर कानात घुमत होती. सखाराम विचारात पडला होता. त्याला काही सुचत नव्हतं. मग संगीता मधाळ आवाजात बोलली,

“काय म्हणता साहेब, काय चाललं तुमचं? हे फार नाव काढतात तुमचं?”

ती दिसायला आकर्षक होती. तिच्या शब्दांतून मध टपकावं, असा गोडवा होता. तिच्याकडे पाहत सखाराम म्हणाला,

“कुठे गेले पाटील साहेब? काही सांगितलं नही.”

“त्यांचं असंच असतं. टेन्शनमध्ये आले की, असेच करता ते. त्यांचं चित्त आणि पाय काही ठिकाणावर राहत नही.”

“का बरं, काय झालं आता?” सखारामने विचारले.

“काय होणार साहेब, त्यांना एक ऑर्डर आली कामाची मोठी. तर गेले गडबडून.”

“असं, मग एवढा काय ताण घ्यायचा. काम केलं की पैसे मिळतात.”

“तेही आहे म्हणा. तुम्ही सांगा, कसे आहेत तुमचे मुलंबाळं? या ना घरी ताईला घेऊन. मुलं काय करतात तुमची?”

“मुलगा एम.कॉम. झाला आणि मुलगी इंजिनिअरिंगच्या शेवटच्या वर्षाला आहे.”

“बाप रे! एवढी मोठी आहेत मुलं?” तिने आश्चर्याने विचारले.

“हो, का बरं? काय वाटलं तुम्हाला?”

“तुम्ही तर एकदम तरुण वाटता. दिसताही छान. तुमच्याकडे पाहून वाटत नाही की, मुलं तरुण असतील.”

“हो का? थँक्यू---” सखाराम बाईनं स्तुती केल्यावर खुश झाला होता.

बाईने स्तुती केली म्हणून सखाराम फुलासारखा फुलला. त्याच्या मनात गुदगुल्या झाल्या. तिच्याकडे बारीक नजरेने पाहू लागला. ती मोकळी होत त्याच्याशी गप्पा मारण्यात रंगून गेली. दोघेही फार जवळीक असल्यासारखे बोलू लागले होते.

“नाही तर हे आमचे बघा. तुमच्यापेक्षा लहान असून मोठे वाटतात. विनाकारण ताण घेतात. अडचणीत असले की माझ्यामागे भणभण करतात. आता तुम्हीच सांगा साहेब, माणसांच्या व्यवहारात बाईची जात काय करील बरं?”

“तसं पाहिलं तर माणसांच्या व्यवहारात बाईनं पडूही नये. त्याचे व्यवहार त्याने त्याच्या पातळीवर करावे.”

“हाव न; पण ते ऐकतच नही. विनाकारण मला बोलावून घेतलं आणि बसले टेन्शनचे वारे उपणत.”

“काही टेन्शन घ्यायचं नही हो. वेळेवर ठीक होतात काही गोष्टी. ते आपल्या हातात असतं.”

“तुमच्यासारखे प्रेमळ मित्र म्हटल्यावर जरा बरं वाटतं साहेब. म्हटले होते ते, ‘जाधव साहेब असल्याने काही काळजी वाटत नाही’ म्हणून---”

बाईने बुवाला थोडं रुळावर घेत अप्रत्यक्ष मदतीची अपेक्षा केली होती. विषय पूर्ण होण्याच्या आधी संकेत आणि भोळे दोघेही आले. संकेतने तिला घरी जायला सांगितले. ती गेल्यावर तिघांनी दोन-दोन पेग मारले आणि गाडी काढून त्या शेतकऱ्याच्या शेतात गेले. आधी

जाऊन पोहोचलेल्या मजुरांनी पार्टीचा संच लावलेला होता. मटणाला फोडणी दिलेली होती. मसाल्याचा घमघमाट येत होता आणि तोंडाला पाणी सुटत होतं. सोबत आणलेले बंपर आणि चकणा शेजारी पडलेला होता.

सूर्य बुडत गेला आणि अंधार पडू लागला, तोपर्यंत संकेतने शेताची पाहणी केली होती. नंतर सगळेजण मळ्यात बांधलेल्या एका खोलीच्या पुढील ओट्यावर चटई टाकून बसले होते. एलईडी बल्ब लावला होता. त्या प्रकाशात सहाजण गोल वर्तुळ करून बसले. मध्यभागी संकेतने आणलेले दोन बंपर, शेव, फुटाणे आणि शेंगदाणे ठेवले. शेतकऱ्याने काचेचे ग्लास धुऊन समोर ठेवले. पेग भरले गेले. एका मजुराने सांगितल्याप्रमाणे प्लेट भरून मटणाचे पीस आणले. पार्टी सुरू झाली. जगाच्या जगरहाटीच्या गोष्टीही चघळल्या गेल्या.

सखारामच्या मनात आणि संकेतच्या पोटात काही वेगळंच होतं. संगीताने केलेलं कौतुक आणि तिचं रसाळ बोलणं सखारामच्या मनातून जात नव्हतं आणि संकेतच्या पोटातील पैशांचा गोळा काही बाहेर पडत नव्हता. तो विषय कसा काढावा, या विचाराने त्याला पार्टीचा रंग चढत नव्हता. शेवटी संकेतने विषय काढावा; म्हणून शेतकऱ्याला विचारले,

“बरं का काका, उद्यापासून तुमचं काम लावून टाकू. तुम्हाला किती दिवसांत किट बसवायची ते सांगा?”

“बसवा, एक चार-पाच दिवसांत.” शेतकऱ्याने सांगितले.

“चालेल, काही प्रॉब्लेम नाही---”

संकेतच्या बोलण्याने सखाराम त्याच्याकडे आश्चर्याने पाहू लागला. ‘बाई म्हणते, ‘टेन्शन आहे’ आणि गडी म्हणतो, ‘प्रॉब्लेम नाही.’ त्यामुळे संकेतचा चालूपणा सखारामच्या लक्षात आला. काय समजायचं ते तो समजला. ‘ आता त्याच्या जाळ्यात अडकायचं नाही’ त्याने मनाशी ठरवून टाकलं.

“काका, उद्या तुम्ही तीन लाख रुपये द्या. म्हणजे दोन दिवसांत सामान येऊन जाईल.”, असं म्हणत संकेतने भरलेला ग्लास तोंडाला लावला आणि एका दमात रिकामा करून सखारामलाही त्याचा पेग संपवायला सांगितलं. त्याला पैसे मागायचे की नाही? मनात उलटसुलट विचार केले.

सर्वांनी पुन्हा पेग भरले. पेगवर पेग सुरू झाले, तसे प्रत्येकाचं मन मोकळं होत गेलं. कोणाचं काय, तर कोणाचं कायच बोलणं चाललं होतं आणि संकेतच्या तोंडून मात्र पैशांचाच विषय येत होता.

“पाटील साहेब, तुम्ही काम सुरू करा. दोन-चार दिवसांत पैसे आणून देतो.” शेतकऱ्याने सांगितलं; पण संकेत त्याला पुन्हा समजावून सांगू लागला,

“अहो, काकाsss! कंपनीला आधी पैसे पाठवावे लागतात. तेव्हा ते सामान पाठवतात. आम्ही काही ड्रिप किटचा माल साठवून ठेवत नाही ना; म्हणून तुमच्याकडून पैसे घेऊन तो मागवावा लागतो.”

“तुम्ही करा काही तरी सोय, मी नक्की देतो दोनेक दिवसांत.” शेतकरी म्हणाला.

बाकीचे त्या दोघांचं बोलणं ऐकत, काही स्वतःचीच बडबड करत होते. संकेत उठून थोडा दूर जाऊन थांबला आणि त्याने संगीताला फोन केला.

“बोलली का तू काही जाधवला?”

“काय---?”

“तेच न, पैशाच्या बाबतीत.”

“नही---?”

“येडपट! कशाले गेलतो मग मी बाहेर, त्या भोळ्याला घेऊन?”

“मग तसं आधी सांगितलं असतं, तर मी सरळ विषय काढला असता. तसं त्याला सांगितलं मी इनडायरेक्ट गोड बोलून.”

“डायरेक्ट विचारलं असतं मग.”

“कसं विचारायचं, फार काही रिलेशन नसताना? पण त्याने मदत करावी म्हणून मस्त गोड बोलली, त्याचं कौतुक केलं. मस्त खुश होत होता भाऊ.”

“ठीक आहे.” असं म्हणून त्याने फोन कट केला आणि पार्टीत येऊन बसला. दुसरे बंपर अर्धे बाकी होते. शेवटचा एकेक पेग मारून जेवायचा बेत होता. ते पेग संपण्याआधीच

संकेत ठळक आवाजात हक्काने बोलला,

“जाधव साहेब, तुम्ही द्या दोनेक दिवसापुरते तीन लाख. या काकांनी आणून दिले की तुम्ही परत घेऊन जा.”

त्याने दगड मारून पाहिला; पण सखारामने लागू दिला नाही. संकेतकडून आलेल्या वाईट अनुभवातून त्याने स्वतःला सावरलं होतं. पुन्हा बळी पडायचं नाही. त्याच्याकडे आहेत ते पैसे गोड बोलून काढून घ्यायचं त्याने ठरवलं होतं; म्हणून तो म्हणाला,

“काय सांगू पाटील साहेब, वर्ष-दीड वर्ष झालं, तुम्ही माझ्या नावावर घेतलेलं कर्ज तर नील केलं नही. हप्तेही रेग्युलर भरले नही. त्यामुळे मी अडचणीत आलो.”

“काय साहेब, तुम्हाला काय कमी आहे. पगार बँकेतून आणि बाकी इन्कम टेबलखालून येतं. हो की नाही भोळे भाऊसाहेब?” संकेत म्हणाला.

“अहो पाटील, आमचे साहेब म्हणजे साधू-संत. एकदम निरमोही. समाजसेवक आहेत.” भोळे कुत्सितपणे बोलला.

“मला जमलंच नाही हो त्या गोष्टी. लोकांची कीव करत गेलो त मह्याच जीव गेला.”

“बघा न साहेब, या काकाचं काम मार्गी लावतो. त्यांनी पैसे दिले की, लगेच तुम्हाला परत करतो.”

“तसं नाही पाटील, असते तर दिले असते. मागे हप्ते थकले म्हणून बँकेची नोटीस आली होती. मॅनेजरने फोनही केला होता आणि पैसे भरायला सांगितले होते. तेव्हा बायकोचे दागिने गहाण ठेवले होते.”

“काय साहेब तुम्ही. अहो, मला सांगितलं असतं तर मी दिले असते.” भोळे बोलला.

“भोळे--! विसर भोळे आहे का तू? तुझ्यासमोर त्या मतलबी पवारबाईला तिच्या नावावर कर्ज काढून मागितलं होतं. तेव्हा तर काही बोलला नव्हता. चहा-भज्याची वाट पाहत होता.”

सखारामच्या स्पष्ट बोलण्याने भोळे उघडा पडून खजील झाला होता. मात्र संकेतने तो धागा पकडला आणि सरळ भोळेला गळ घातली. ‘संगीताच्या गोड बोलण्याने सखाराम मदतीला तयार होईल आणि आपल्याला त्याच्यापुढे गळ घालावी लागणार नाही,’ अशी संकेतची अपेक्षा होती; पण सखाराम सावध झालेला होता. संकेत भोळेकडे वळला.

“असं करा ना भाऊसाहेब, तुम्ही जाधव साहेबांना मदत करणार होते, तशी मला करा; पण मी असं सहज म्हणत नही. तीन टक्केप्रमाणे आधी नऊ हजार रुपये काढून घ्या. बाकी पैसे मला द्या. या काकांनी दिले की तुम्हाला परत करतो.”

संकेतच्या बोलण्याचा भोळेने थोडा विचार केला आणि ‘नऊ हजारांच्या लालसेपायी तीन लाख अडकून पडले तर?’ हा प्रश्न पडल्याने तो काहीच बोलला नाही. प्लेटमधले मटणाचे पीस शोधत राहिला. सखाराम त्याचा चेहरा बदलत असलेचे पाहात

होता. ताच्या मनातील पैशाच्या लालसेचं गणित वाचत होता; ‘पण काही न बोललेलं बरं’ विचार करून जेवण करत होता. संकेत असो

की त्याची बायको असो, सखारामला त्यांचे गोड बोलणे, मासे पकडण्याच्या 'गळ'सारखे वाटत होते. 'संकेतनं कितीही विनवण्या केल्या तरी त्याच्या हाती लागायचं नही. पैसे घेतांना लय गोड बोलतो. काम झालं की, विसरून जातो. नंतर त्याला आपली आठवण येत नही. काम पडलं की सुईच्या भोकात मावत नही.'विचार करून सखाराम एकदम गप्प बसला होता. संकेतनं त्याच्याकडून अपेक्षा करणं सोडून दिलं होतं.

पार्टी करून जो तो ज्याच्या-त्याच्या घरी गेला. खाऊन-पिऊन मजा झाली. संकेतचे मनसुबे फसले होते. 'एवढा डाव रचूनही त्याच्या कामाची गोष्ट पुढे सरकली नव्हती.' त्याचा चेहरा पडला होता. घरी गेल्यानंतर संगीताशी काही न बोलता झोपून गेला होता.

रात्री कोसळलेल्या मुसळधार पावसानंतर आभाळ रिकामं झालं खरं; पण सकाळ मात्र एक अनामिक हुरहूर आणि गहिरी धुंदी घेऊन आली होती. सूर्य ढगांआड दडला होता आणि सभोवताली एक मखमली, अंधुक प्रकाश पसरला होता. बाहेर अगदी मंद, हलका पाऊस पडत होता. सुट्टीचा दिवस असल्याने दुपारी छान मसालेदार, चविष्ट जेवण करून सखाराम आणि सरू ओट्यावर, पोर्चच्या आडोशाला निवांत बसले होते. रिमझिम सरी कोसळत होत्या. सोबत लाजरी-बुजरी थंड झुळूक येत होती. ती जेव्हा जेव्हा अंगाला स्पर्श करून जात होती, तेव्हा शरीरात एक वेगळाच शहारा उठून जात होता.

दोघांच्या निवांतपणात एक वेगळीच ऊब निर्माण होऊ लागली होती. सुरुवातीला शब्दांत सुरू असलेल्या त्यांच्या गप्पा हवेतील गारव्यामुळे हळूहळू मौनात बदलू लागल्या. वाऱ्याच्या एका जोरदार झुळुकीने सरूच्या अंगावर सरसरून काटा आला. सुट्टीचा तो निवांत दिवस हळूहळू रोमँटिक आणि उत्कट क्षणाकडे वळत होता.

“आज वातावरण किती छान आहे न!” सरू बोलली.

“एकदम मस्त रोमँटिक हाये. आता दोन वाजले. छानपैकी अंगावर घेऊन झोपलं पाहिजे.”

सखारामच्या मनात गार वाऱ्याची झुळूक गुदगुल्या करत होती. सरूच्या ‘छान’ असं बोलण्याने त्याचं मन उबदार होत होतं. तो पुन्हा म्हणाला,

“चाल मग, झोपू जरा मस्त अंगावर घेऊन. संध्याकाळी उठल्यावर भजे-गुलगुले करू.”

“तुम्ही झोपा, भांडी पडली आहेत, ती कोण आवरीन?”

तिच्या बोलण्याने त्याचा रसभंग झाला. भर पावसात त्या भांड्यांना आग लावण्याचे विचार त्याच्या मनात आले. तो हिरमुसला आणि शांत बसला. तिने त्याचा उतरलेला चेहरा पाहिला; पण त्याची काही जाणीव ठेवली नाही. उलट जसे काही संसाराच्या रखरखत्या उन्हात उभं करून त्याला कामाला जुंपण्याच्या विचारात होती. त्यामुळे ती म्हणाली,

“मी काय म्हणते, असे किती दिवस वाट पाहणार?”

तो फक्त तिच्याकडे पाहत होता. त्याच्या डोळ्यांत काहीसा राग उतरलेला होता. तिच्या लक्षात येऊनही तिने सांगितले,

“या वर्षी रुचीचं इंजिनिअरिंग संपेल. तिचं लग्नाचं पाहा. सुमेधचंही बघा काही. अजून तो शिकतोच आहे.”

“तुले काय वाटतं, मले समजत नही? मुलांची काही काळजी नही?”

“मी काही तसं म्हणत नही. थोडं लक्ष घाला. सगळंच मुलांच्या मनासारखं करसान त कसं होईल? ते त त्यांच्या तालात राहता.”

जशी तिने प्रश्नांची शेकोटीच त्याच्यासमोर ठेवली. तो आतून तापला होता.

“बघू काय करायचं ते-----”

एवढं बोलून तो उठला आणि बेडरूममध्ये जाऊन झोपला. ती थोड्या वेळाने किचनमध्ये गेली आणि तिच्या कामाला लागली. भांड्यांचा आवाज आल्यानंतर ‘ही बायको कमी आणि मोलकरीण जास्त आहे.’ त्याच्या मनात आलं होतं. झोप लागत नव्हती. एका डोळ्यात सुमेध आणि दुसऱ्या डोळ्यात सुरुची होती. दमट वातावरण आणि जडावलेलं शरीर, तरी त्याची झोप उडाली होती. मुलांना मार्गाला लावायचं म्हणजे पैसा हवा. नुसतं बोलण्याने भागत नाही. मग तो मनाने सगळीकडे फिरून आला, थकला आणि शांत पडून राहिला. मुलांसाठी काही हाताच्याला राखून ठेवलं नसल्याचा पश्चताप करत होता.

संध्याकाळी पाच वाजता उठला. भजे आणि गुलगुले विसरून गेला. सरू हॉलमध्ये विनोदी मालिका पाहत होती. तो मात्र वाढते खर्च, घरातील जबाबदाऱ्या आणि मुलांच्या अपेक्षा यांचा विचार करून अस्वस्थ झाला होता. त्याला पत्नीशी मनमोकळेपणाने बोलायचं होतं; पण 'बोलून काही उपयोग नाही', असं वाटून गप्प राहिला. मुकाट्याने एक कप चहा केला आणि चहा घेऊन थोड्या वेळाने बाहेर गेला.

पत्नी सतत घरकामात व्यस्त असल्याचं पाहून तिच्याविषयी आणखी राग आला. ती सावलीसारखी जवळ राहत नसल्याने तिच्याबद्दलचं प्रेम आणि आपुलकी तो शब्दांत व्यक्त करू शकत नव्हता. त्याला बायकोच्या सहवासाची ओढ अधिक आहे, याचं भानही ती राखायची नाही. त्यामुळे तो नाराजही असायचा. अति झालं की बाहेर फिरून यायचा. त्या दिवशी बाहेर गेल्यानंतर त्याने ज्ञानोबाला फोन करून नेहमीच्या ढाब्यावर बोलाविलं होतं.

बाहेर पावसाची फुरफुर सुरू होती. अंधारून आलं होतं. ढाब्यावर जातानाच वाईन शॉपमधून त्यांचं पार्सल घेतलं होतं. दोघेही एकेक ग्लास खाली करत गप्पांत रंगले होते.

" साहेब, बरेच दिवस झाले आपण बसलो नव्हतो. आज कशी काय आठवण झाली गरिबाची?" ज्ञानोबानं विचारलं.

"त्याचं काय हे, ज्ञानोबा... माणूस अडचणीत आला की मार्ग शोधत राहतो, नाहीतर एका जागी बसून रडत बसतो."

"मला माहीत हाये साहेब, तुम्ही काही रडणाऱ्यामधले नही."

“दुनिया भलती बेकार हाये हो....”

“दुनिया नालायक नही साहेब. तुमचा चांगलेपणा तुम्हाला त्रासदायक आहे. इथे इमानदारीला लोकं पुरस्कार देत नही. प्रभाव टाकणाऱ्याला मान मिळतो. हे मी अनुभवाने सांगतो साहेब.”

“मग काय, माणसाने माणुसकी सोडून द्यायची ज्ञानोबा? काही नीती-नियम असतात की नही?”

“हाव साहेब, असता न. पण बऱ्याचदा आपल्या जगण्याच्या खेळाचे नियम बदलावे लागता. मीही तेच केलं, तेव्हा कुठे ठिकाणावर आलो.”

“असं काय केलं?”

“तुमच्यासारखा सरळमार्गी होतो. सगळ्यांचं ऐकायचो. कोणी मागितलं की दिलं. सांगितलं की केलं. तसा डेरिंगबाजही होतो. स्पष्ट आणि फटकन बोलून मोकळा व्हायचो. लोकं मला शेर म्हणायचे; पण कधी शिकार करता आली नाही. त्याचा काही फायदा व्हायचा नाही.”

“म्हणजे मी इथे बदलून येण्याच्या आधी तुमचं हे रूप होतं का ज्ञानोबा? मग एवढा बदल कसा काय?” सखारामनं ज्ञानोबाच्या वागण्यातील बदल लक्षात आणून दिल्यानंतर तो पुन्हा त्याला आयुष्यातील चांगल्यापेक्षा वाईट गोष्टी सांगायला लागला होता.

“मी त काही तुमच्या इतका शिकला नही साहेब; पण आयुष्य संपण्यात आलं की, जगण्यातले अनुभव खूप मोठी पदवी देऊन जातात साहेब, माणसाला....?”

राज ढाबा
WINE SHOP
₹ 1,25,000/-
राज ढाबा

“अरे वा, ज्ञानोबा! एकदम विचारवंत वाटता तुम्ही...?”

“तसं काही नही साहेब. शेर होण्यापेक्षा लोमडी होणंच जास्त चांगलं वाटलं होतं साहेब; म्हणून हे सगळं असं....”

“पण एवढं कुठून शिकले तुम्ही....?”

“हा मोबाईल आणि यातले व्हिडिओ.....”

ज्ञानोबाने टेबलावरचा मोबाईल डाव्या हातात घेऊन सखारामला दाखवला आणि म्हणाला,

“हे बघा साहेब, या व्हिडिओचं टायटल ‘चालाक बनो, दुनिया दया नही करती. तुम्हे निचोड़ जाती है....’ यात काय शिकता येईल, हेही तो सांगतो. ऐका, ‘क्यों बहुत ज़्यादा अच्छा होना सबसे बड़ी कमजोरी बन जाता है, कैसे लोग तुम्हारी चुप्पी, नरमी और सहनशीलता का इस्तेमाल करते हैं, खुद को पहले रखना ग़लत क्यों नहीं, ज़रूरी क्यों है, कैसे मानसिक रूप से मज़बूत बना जाता है, बिना शोर किए, और क्यों जो आदमी अपनी सीमाएँ नहीं बनाता, वह हमेशा दबा रहता है.’, ज्ञानोबानं मोबाईल पुन्हा खाली ठेवला. सखाराम काही न बोलता विचाराच्या खोल-खोल पाण्यावर तरंगला.....

“– पण ज्ञानोबा, सगळ्यांनीच असं वागायचं म्हटलं तर जग कसं चालेल? जीवनाची सगळी मूल्येच बिघडून जाणार नही का?”

“तसं नही म्हणत साहेब मी. पहिले आपलं स्वतःचं पाहायचं. माणुसकीलाही काही मर्यादा आहे. हे शिकलो; पण लय उशीर झाला

होता, पण काही बिघडलं नही. मुलं मार्गाला लागले. खाऊन-पिऊन सुखी हाये... हेही आपण माणुसकीने वागलो, त्याचं फळ समजा...."

"काय ज्ञानोबा...! असं म्हणता, तसंही म्हणता. नेमकं काय, काही कळत नही.... ते जाऊ द्या... आता तुम्ही काही म्हणा; पण एक काम करा...."

"बोला न साहेब. तुमच्यासारख्या माणसांसाठी नही त कोणासाठी करायचं मग? सर्वांशीच चालाखी केली तर माणुसकीचा खून होणार नाही का?"

"बरं... तुम्ही म्हणता तेही ठीक हाये, ज्ञानोबा.... मुलीचं इंजिनिअरिंगचं शेवटचं वर्ष हाये. फी भरायची; पण पैसेच नाहीत. बघा, तुमच्याकडे जमतील का एक-दीड लाख...?"

"काही टेन्शन घ्यायचं नही साहेब...."

"तुमच्या कृपेने चांगलं चाल्लं हाये सध्या. आता तुमची सेवा करण्याची संधी मिळते. हे माझं भाग्य हाये साहेब. तुम्ही मला ऑफिसमध्ये सांभाळून घेतलं नसतं तर...?" तो पुढे काही बोलला नाही. त्याने 'हो'कार दिल्याने सखारामला हायसं वाटलं होतं.

*** *** ***

सखारामचे सिनियर क्लार्क म्हणून प्रमोशन झाले, तेव्हा त्याची बदली आडगाव तालुक्याला झाली होती. ज्ञानोबा तेथे शिपाई होता. मनाने मोकळा, हजरजबाबी आणि चांगलं काम करणारा होता; पण

सकाळीही ऑफिसला दारू पिऊन यायचा. त्यावेळी सखारामला त्याची स्थिती काही चांगली वाटली नव्हती.

काही दिवस असेच निघून गेले होते. एक भला माणूस असा वाया जाऊ नये; म्हणून सखारामला त्याची कीव येत होती. मग एक दिवस ऑफिस बंद केल्यानंतर त्याने ज्ञानोबाला सोबत घेतले आणि गाडीवर बसायला सांगितले. 'साहेब काही सांगत नाही की बोलत नाही,' म्हणून तो विचारात पडला. 'बसा म्हटलं, बसला.' सखाराम थेट एका बारजवळ थांबला. ओळखीचं हॉटेल म्हणून पुन्हा ज्ञानोबाला प्रश्न पडला; पण विचारले नाही. साहेबाच्या मागे-मागे जाऊन ते बसले होते. त्या टेबलावर तो त्यांच्या समोर बसला होता. पहिलीच बैठक असल्याने तो चोराला पकडून आणल्यासारखा काही न बोलता डोळे बारीक किलकिले करून पाहात होता. वेटरने ऑर्डर दिल्याप्रमाणे सेवा पुरवली होती.

सखाराम स्वतः दोघांचे ग्लास भरत असताना ज्ञानोबा म्हणाला, "साहेब, अहो मी देशप्रेमी माणूस. हे इंग्लिस दारू चढत नाही."

"आजपासून देशी बंद आणि व्हिस्की घ्यायची, ज्ञानोबा."

"तेवढे पैसे कुठी आस्ता साहेब आमच्याकडे. एखाद्याकडून घेतो पाच-पंचवीस साहेबाच्या नावाखाली. तेवढ्यात सोय होऊन जाते."

"तुम्हाला लागले त माझ्याकडून घ्यायचे; पण हलकी दारू प्यायची नही. पण एक सांगतो, दारू हलकी असो की भारी, ती घातकच आस्ते."

“ते त कळतं साहेब; पण सवय जात नही न.....”

“तसं आपल्याला वाटतं, ते ठीक आहे; पण डे-नाईट नको ज्ञानोबा. अशी माणसं सहजा वाचत नस्ता.”

“जगून बी काय करणार साहेब? सगळं आभाय फाटल्यासारखं वाटतं....”

“इतकं निराश नका होऊ हो. सिस्टीममध्ये तुमच्यासारखी माणसं हवी असतात ज्ञानोबा....”

“आमच्यासारखे बेवडे काय कामाचे साहेब...?”

“ तसं नही ज्ञानोबा, पिणं हे तुमचं खाजगी हाये. ऑफिसमध्ये काम त चांगलं करता.

दोघांचे बोलणे सुरूच होते. ज्ञानोबा वयस्क माणूस म्हणून सखाराम रिस्पेक्टने बोलत होता. ‘ हा नवीन साहेब जरा वेगळाच म्हणून तोही त्यांच्या बोलण्याकडे लक्ष देत होता. महसूल विभागात नवीन संगणकीय प्रणाली व इतर ऑनलाइन प्रणाली वापरण्यात आल्याने त्याचे प्रशिक्षण घेण्यासाठी तहशीलदारने सखारामला पुण्याला पाठविले होते. प्रशिक्षणाबरोबर त्यांचा एक तास कौन्सलिंगचा घेतला होता. त्या पद्धतीने त्याने ज्ञानोबाला ज्ञान पाजळले होते. त्याने मात्र साहेबाचे ऐकले आणि स्वतःमध्ये हळूहळू बदल करून घेतला होता. मग सखारामही त्याला अधून-मधून मदत करत होता. त्याची जाणीव त्याने ठेवली होती. सखारामची अडचण त्याने दूर केली होती.

ज्ञानोबाने त्याच्या मुलाला फोन करून सखारामच्या खात्यात दीड लाख रुपये टाकायला सांगितले. त्याच्या मुलाने लगेच पैसे सेंड केले. सखारामला क्रेडीटचा मेसेस आला. तो पाहून त्याने ज्ञानोबाचे आभार मानले.

“ काय साहेब, आभार कशाले मानता. ही तुमच्या उपकाराची फेड आहे. चला, आता माझ्याकडून एक नायंटी घेऊ मग जाऊ ---” ज्ञानोबाने उत्तराची वाट न पाहता वेटरला सांगितले.

दोघांनी शेवटचा एकेक ग्लास रिकामा केला आणि ते घरी गेले.

सरू वाटच पाहात होती. तिने काहीही न बोलता आणि विचारता. वाढून दिले. त्यानेही बैलाने दान खावे, तसे जेवण केले. थोडा वेळ हॉलमध्ये बसला. त्याला आता हलकं वाटत होतं. नंतर बेडरूम मध्ये गेला आणि आपली गोधडी टाकून झोपून राहिला-

*** *** ***

दुपारचे चार वाजले होते भोळे भाऊसाहेब एका नागरिकाच्या उत्पन्नाचा दाखला तयार करत होता. अर्ज आणि आवश्यक कागदपत्रे तपासून झाल्यावर सरकारी पोर्टलवर अर्ज क्रमांक तयार करून अर्जदाराचे तपशील नोंदवत होता. त्यावेळी त्याने एक मोठी जांभई दिली. तसं पवारबाईचं त्याच्याकडे लक्ष गेलं.

" काय भोळे भाऊ, चहाची आठवण झाली वाटतं....? "

" हो मॅडम, मागवता का मग? होऊन जाऊ द्या तुमच्याकडून आज स्पेशल "

" आपले जाधव साहेब असल्यावर कशाले टेन्शन घेता. हो न साहेब? " पवारबाईने सखारामकडे पाहून म्हटले, पण तो फक्त गालात हसला आणि फाईल तपासत राहिला.

दारात खुर्ची टाकून बसलेला ज्ञानोबा इकडेतिकडे डोळे फिरवत होता.

"चहाची ऑर्डर कोणीच देणार नाही. हे त्याला माहीत होतं. साहेब तरी किती वेळा देतील. ते काही पहिल्यासारखं लगेच 'हो' म्हणत नही." मनाशीच बोलला.

" बाई मोठी चलाख आहे. गोड बोलून पाहिजे ते माणसाकडून इच्छा पूर्ण करून घेते. आपण काही मागितलं की बेमालूम नकार देते. त्यामुळे पुढे काही बोलताही येत नही." असं ओठावर आलं होतं, पण काही सखाराम बोलला नव्हता. पुन्हा त्याला आठवलं,

"प्लॉट घ्यायला पैसे पाहिजे होते, तेव्हा फार लाडीगोडी लावायची. पैसे घेतल्याशिवाय राहिली नही. लगेच देते म्हणे आणि दीड - दोन वर्ष लावले.... "

'बाईच्या लक्षात आणून द्यावं का?' सखारामच्या डोक्यात आलं, त्याच वेळी बाई पुन्हा म्हणाली, " साहेब सध्या फार कामात दिसता? चहा घ्या, म्हणजे तरतरी यीन.... " सखारामने न

ऐकल्यासारखं करून फाईलमध्ये लक्ष घातलं, पण डोक्यात तिचेच विचार होते.

" अधूनमधून खर्चालाही पैसे घेत राहते आणि साधा चहा पाजत नही. आपण म्हणावं त रिकामी पर्स दाखवते. आपणही रिकामे खिसे दाखवायला का पैसे लागता ---" पण सखारामने बोलणं टाळलं.

'बाईच्या जातीला बोलायचं नसतं. दूर राहून मजून घ्यायचं असतं,' असं मनाशीच बोलून सखाराम पुन्हा फाईल चेक करत होता.

भोळे कागदपत्रे स्कॅन करून पोर्टलवर अपलोड करणं थांबवून वाटच पाहत होता. जागेवरून उठून बाहेर जाऊन आला. ज्ञानोबा मनातल्या मनात हसत होता.

भोळे अर्ध्या तासाने परत आला आणि सखारामच्या समोरच्या खुर्चीत जाऊन बसला.

"काय म्हणता भोळे? बाहेरून चहा पिऊन आले वाटतं एकटेच?"

"नही हो साहेब, हलका होऊन आलो."

" काय म्हणता सांगा."

"अहो, आपण त्या दिवशी संकेत पाटीलसोबत मळ्यात पार्टी केली होती न....?"

"हो, मग...?"

"मग काय, अहो, त्याने दुसऱ्या दिवशी सकाळीच फोन केला होता. गयावया करून तीन लाख रुपये घेतले. उद्या-परवा देतो म्हणे. आज महिना झाला, तरी अजून पैसे द्यायचा पत्ता नही."

"काय भोळे, एक शब्द तरी विचारला असता. अरे, तो लय चालू माणूस हाये. हजाराने व्याज द्यायचं आणि लाखो रुपये घ्यायचे, अशी चालबाजी करतो तो. नंतर पैसे परत करायचं नावच घेत नही."

"हाव न साहेब. मही गतही तशीच झाली."

"माझे त दोन वर्ष झाले, तरी आजून तो पैसे देत नही."

"मग आता काय करायचं...?"

"वाट पाहा... त्याच्या मागे लागा."

"काय त सालं... नऊ हजार व्याजाच्या मोहापायी तीन लाख रुपये अडकून बसलो."

भोळे पश्चात्ताप करत उठला आणि त्याच्या जागेवर जाऊन बसला; पण त्याच्या डोक्यात कामापेक्षा तीन लाख रुपये फिरत होते.

भोळे त्याच्या टेबलावर परत आला; पण संगणकाच्या स्क्रीनवर उघडलेला अर्ज त्याच्या नजरेतही भरला नाही. डोक्यात फक्त तीन लाख रुपयांचाच आकडा फिरत होता. संध्याकाळी कार्यालय सुटले, पोर्टल लॉगआउट झाले आणि उत्पन्नाचा दाखला अपूर्णच राहिला. आजचं काम पुन्हा उद्यावर ढकललं गेलं होतं.

सुमेध संध्याकाळी सहा वाजता घरी आला होता. सरू एकटीच होती. सखाराम अजून आलेला नव्हता. सुमेधने हॉलमधील

सोफ्यावर बॅग ठेवली आणि किचनमध्ये पाणी प्यायला गेला. मेथीची भाजी खुडता-खुडता सरूनं विचारलं,

" काय बनवू जेवायला?"

"काही बी बनव."

"चहा ठेवू?"

"नको.... आलोच मी."

"आत्ताच आला न. कुठं चाल्ला? टेन्शनमध्ये दिसतो."

"आई, टेन्शन असलं तरी सांगून काय उपयोग? पप्पा हे असे, पैशाचं म्हणलं की, पैसेच नाही म्हणता..."

सरू काही बोलण्याच्या आधीच तो तडकन मागे फिरला आणि घराबाहेर पडला. ती त्याच्याकडे पाहतच राहिली आणि स्वयंपाकाला लागली.

अंधार पडला. लाईट लागले. तरी सखारामचा पत्ता नव्हता. महसूल वसुलीचा ताळमेळ बसविण्यात दिवस निघून गेला होता. आकडे जुळेपर्यंत भोळे आणि सखाराम थांबले होते. बाजारातून भाजीपाला घेऊन घरी स्वयंपाक करायचा असल्याने पवारबाई विचारून घरी निघून गेली होती. 'केव्हा काम संपतं आणि आपणही जाऊ', म्हणून ज्ञानोबाचीही चुळबुळ सुरू होती.

सखाराम सर्व काम पूर्ण करून आठ वाजता घरी आला होता. सोफ्यावर पडलेली बॅग पाहून सुमेध आल्याचं त्याच्या लक्षात आलं. बाथरूममध्ये जाऊन हातपाय धुतले. किचनमध्ये गेला आणि एक ग्लास पाणी पिऊन परत सोफ्यावर येऊन बसला.

"जेवण नही करता?" सरूनं विचारलं.

"मग. जेवल्याशिवाय झोप कशी काय लागीन...."

"सुमेध आला हाये..." तिनं सांगितलं.

"हो, कुठे गेला तो? फोन कर. बोलव त्याले. सोबत जेऊ...."

*** *** ***

थोड्या वेळाने तिघेही जेवायला बसले होते. सखारामचा विचारमग्न चेहरापाहून सरू काहीच बोलत नव्हती. वडिलांशी काय बोलावं? कसं बोलावं? काय सांगावं? हे सुमेधलाही सुचत नव्हतं.

"पोळी देऊ?" ताटातील पोळी संपलेली पाहून सरूने सखारामला विचारले.

"नको.... बस्स..."

"पप्पा..."

"हं....."

न बोलता सखारामने हुंकार भरला.

"मी एम.बी.ए.ला प्रवेश घ्यायचं म्हणतो."

"आता काय करशील एम.बी.ए. करून? स्पर्धा परीक्षेचे क्लास लावले हाये, त त्याची तयारी कर. छोटी-मोठी नोकरी पहा."

"मले वाटतं, नोकरी नाही मिळाली, तर कंपनीत तरी जॉब करता येईल." सुमेध कसा तरी बोलला.

"शिकणं, परीक्षा देणं, बस कर आता. काहीतरी उद्योगपाणी पाहा, जर नोकरी मिळत नसीन तं...."

"तुमचे मित्र शिरोळे साहेब आले होते आमच्या अकॅडमीला. त्यांनीच सांगितलं, 'एमबीए कर म्हणून."

"बरं मग? असं सहज कसं मिळेल ॲडमिशन? त्यासाठी तुला सीईटी द्यावी लागेल न?"

"हो, ती परीक्षा दिली मी. गुणही चांगले मिळाले. पहिल्या राउंडमध्ये नंबर लागून जाईल कदाचित."

"म्हणजे तू परस्परच तयारी करून घेतली आणि सांगितलंही नही?"

"नापास झालो असतो तर आणखी बोलले असते, म्हणून म्हणलं, निकाल लागल्यावरच सांगू."

"अरे, पण ॲडमिशन काय सहज होईल का? पैसे नको का जुळवायला?"

"त्यासाठीच तर आलो. पुढच्या आठवड्यात CAP रजिस्ट्रेशन सुरू होईल. दोन-तीन लाख रुपये लागतील."

"ठीक आहे. करतो काही तरी.... शिरोळे काकांचा नंबर देशील."

रात्री झोपायचं म्हटलं तरी सखारामला झोप लागत नव्हती. सरूचं घोरणं त्याला अस्वस्थ करत होतं. सुमेध टीव्ही पाहत होता. त्याचा काहीसा आवाज त्याच्या विचारांना ब्रेक करत होता. बऱ्याच वेळाने तो आवाज बंद झाला. सखारामचे विचार सुरूच होते. सगळीकडे शांतता होती. विचार करून तो थकला. नंतर केव्हा तरी त्याला झोप लागली.

दुसऱ्या दिवशी सखाराम ऑफिसला गेला होता; पण कामात लक्ष लागत नव्हतं. जिल्हाधिकाऱ्यांच्या व्हिडिओ कॉन्फरन्ससाठी तहसीलदारांनी सर्व विभागांचे प्रलंबित अहवाल तयार करून ई-मेलने

पाठवण्याचे आदेश आधल्या दिवशीच दिले होते. रात्रीच सर्व अहवाल तयार केल्याने त्याने भोळेला ई-मेल करायला सांगितले. उगीच एक फाईल चाळत होता; पण त्याकडे लक्ष नव्हतं. समोर दरवाजात ज्ञानोबा खुर्ची टाकून बसलेला होता. अधून-मधून त्याच्याकडे सखारामचं लक्ष जायचं; पण “तो साधारण शिपाई. त्याच्याकडे तरी किती वेळा मदत मागणार? चूक आपलीच. स्वतःचं घर सोडून दुसऱ्याच्या घराची आग विझवत राहिलो. शेजारी पवारबाईचा टेबल, त्याच्या शेजारी भोळे; परंतु सखारामला वाटले, नुसते मातीचे गोळे. सगळेच कसे युजलेस. हा भोळे, ही बाई, तो संकेत, त्याची बायको, काहीच नको सालं माणसाला---”

बाईला डबल पगार; पण हातचा पैसा सोडत नाही. भोळे नागरिकांकडून पैसे घेतल्याशिवाय काम करत नाही. त्याच्याकडे बँकेत बॅलन्स आहे; पण नेहमी रडत असतो. मदत करत नाही. ते सगळेच त्यांच्या ठिकाणी बरोबर आहेत. आपणच चुकीचे. आपल्याला व्यवहाराचं गणित जमलंच नाही. भावना आणि व्यवहार यात गल्लत झाली." असे विचार करून तो उठला.

"काही तरी केले पाहिजे. मुलगा करतो, ते काही चुकीचं नाही. त्याला शिरोळेनं सांगितलं; म्हणून तो करतो हाये. तेही बरोबर हाये." स्वतःच्या मनाला पटवून देत सखाराम लंच टाईममध्ये थेट संकेतच्या फॅक्टरीत गेला. त्याला पैसे सोडायचे नाही. या विचाराने तो रागात गेला होता.

"या साहेब, अचानकच? फोन करायचा असता." संकेत त्याला पाहून बोलला.

"पाटील साहेब, तुम्ही उद्या पाच लाख रुपये द्या." सखाराम स्पष्ट बोलला. संकेत हसून म्हणाला,

"काही टेन्शन घेऊ नका. मी कर्जप्रकरण टाकलं हाये. शुक्रवारी डिस्बर्स झालं की पहिले तुम्हाला देतो."

त्याने असे म्हटल्यावर सखारामला पुढे काही बोलताच आले नाही. शेवटी तो म्हणाला,

"ठीक आहे. शुक्रवारी येतो मी अकरा वाजता."

"अहो साहेब, कुठे जाता हाये एवढ्या लवकर? थांबा थोडं..."

"नाही, कामं पडले हाये. ऑफिसले जातो."

"राहू द्या हो. कोण विचारतं तुम्हाला? कुठे गेले? आले की नाही? आता आलेच आहे तर संध्याकाळी थोडी मारून जा. पैसे त देणारच हाये मी तुमचे. बसा जरा."

"नको, अजून लय वेळ हाये. जातो मी. काही फायली पूर्ण करायच्या हाये."

सखाराम उठला आणि संकेतच्या कॅबिनमधून बाहेर पडला. 'संकेत पैसे देणार नाही,' हे त्याच्या लक्षात आले होते. ऑफिसला येताना त्याने गणेश शिरोळे यांना फोन केला.

"क्या बडे साब, बिझी हाये का?" सखारामचा आवाज ओळखून शिरोळे बोलले,

"अबे सक्या, मी कसला साहेब? साहेब तू हाये. कुठी गेलता इतके दिवस? आज कसा काय फोन केला?"

"गण्या, अरे तू पुण्याला गेल्यापासून तुझा काही आतापत्ताच नव्हता. किती वर्ष झाले रे, भेटलाच नही."

"मी आलो होतो रे जळगावला. तुझा मुलगा भेटला होता तेव्हा..."

"मग फोन का बरं नही केला होता?"

"घाईत होतो जरा..."

"बरं... आणि हे काय खूळ घातलं तू सुमेधच्या डोक्यात?"

"का? काय झालं?" शिरोळेनं विचारले.

"पोराने सांगितलं मले सगळं. त्याले तू एम.बी.ए. करायला सांगितलं. आता तेच खूळ डोक्यात घेऊन बसला तो."

"करू दे ना मग.... चांगला कोर्स आहे तो."

"ते ठीक हाये रे; पण किती शिकवशील? परत वेळ अन् पैसे खर्च व्हता." सखाराम बोलला.

"तू काहीच टेन्शन घेऊ नको. मी करतो सगळं. पोरगं हुशार आहे."

"ते ठीक हाये; पण इकडे सगळी ताणाताण हाये."

"तुला सांगितलं ना, काहीच टेन्शन घेऊ नको म्हणून. मी आहे ना."

"बरं, कधी येशील गावाकडे? आला की भेट. असा परस्पर जाऊ नको." सखारामने सांगितले.

"तूच ये पुण्याला कधी तरी. "

"बघू..."

सखारामने फोन कट केला होता. त्याचं कशातच लक्ष लागत नव्हतं. तो तसाच ऑफिसला आला होता. तहसील कचेरीच्या आवारात दिसणाऱ्या सगळ्या लोकांचा त्याला राग येत होता. तसाच तो त्याच्या टेबलवर जाऊन बसला; पण काही कामं करण्याची इच्छा होत नव्हती. बाकी काय करावं, तेही कळत नव्हतं.

*** *** ***

सुरूची बारावी सायन्सनंतर नाशिकला कॉम्प्युटर इंजिनिअरिंगचा कोर्स करीत होती. तिचे ते चौथे, शेवटचे वर्ष होते. तिची आई तिच्या लग्नासाठी स्थळ पाहावं म्हणून दोन वर्षांपासून सखारामच्या मागे लागली होती; पण मुलीच्या इच्छेप्रमाणे घ्यावं; म्हणून तो काही मनावर घ्यायचा नाही.

दिवाळीच्या सुटीत सुमेध आणि सुरूची दोघेही घरी आले होते. त्याच्या एम.बी.ए.च्या पहिल्या सत्राची परीक्षा आणि तिच्या सातव्या सत्राची परीक्षा दिवाळीनंतर होती. त्या दिवशी दुपारचे जेवण आटोपल्यावर चौघेही हॉलमध्ये अँड्रॉइड टीव्हीवर यूट्यूबवरील एका विनोदी मालिकेचे भाग पाहत बसले होते. मालिका सुरू होती आणि त्याचबरोबर गप्पाही रंगल्या होत्या. सखाराम म्हणाला,

"सुमेध, काय करतो आहे सध्या? नेट-सेट तरी पास हो. लागून जाशील कुठे तरी."

"सी.एच.बी.वर काम करण्यापेक्षा चांगल्या कंपनीत जॉब मिळाला तर चांगले पॅकेज मिळेल."

"पण, साध्या एम.कॉम.वर ते कसं शक्य हाये?" सखारामने विचारले.

"साध्या नाही पप्पा, एम.बी.ए. एच.आर.ला ॲडमिशन घेतलं आहे." त्याने सांगितल्यानंतर सगळे त्याच्याकडे पाहायला लागले. सखारामने विचारले,

"आंsss! कसं काय? काही सांगितलं नही?"

"पप्पा, त्यात आश्चर्य करण्यासारखं काही नाही. सगळेच नाही; पण कोणी तरी आपल्या माणुसकीची नोंद घेतच असतं. तुमच्या मित्रानं म्हणजे शिरोळे काकांनी तुमची नोंद घेतलीच की नाही."

"अरे, तो काय परका थोडी आहे."

"पप्पा, खरं सांगायचं तर तुम्हाला आधीच सांगावंसं वाटत होतं; पण शिरोळे काकांनीच थांबवलं. 'तुझे वडील उगाच काळजी करतील,' असं ते म्हणाले. म्हणून मी गप्प राहिलो."

"म्हणजे...?" सखारामने विचारले.

"सीईटीचा निकाल लागल्यापासून मी शिरोळे काकांच्या संपर्कात होतो."

"पण मला कधी सांगितलं नही तू."

"ते काकाच म्हणाले होते, तुझ्या वडिलांना टेन्शन देऊ नको म्हणून..."

"अरे, पण ॲडमिशन फी, बाकीचा खर्च याचा काही विचार केला की नही? त्या काकांना सांगायला काय पैसे लागतात का?"

"हो, त्यांनी काही फुकट सल्ला दिला नव्हता."

“आमचे कॅप राऊंड सुरू झाले, त्यावेळी आम्ही चांगल्या कॉलेजला प्रवेश मिळण्यासाठी प्रयत्न करत होतो.”

“मग----?”

“मला नामांकित कॉलेजला प्रवेश मिळाला. त्याच आठवड्यात शिरोळे काकांचे ह्युमन रिसोर्स विभागात असिस्टंट जनरल मॅनेजर म्हणून प्रमोशन झाले. तेव्हा त्यांनी घरी बोलावून घेतले होते.”

“फार छान झालं. नाहीतर ‘उघड्यापाशी उघडं गेलं, सारी रात हिवानं मेलं’, असं होतं.”

“पप्पा, त्याच वेळी त्यांनी सांगितलं होतं, ‘नोकरी लागल्यानंतरच ह्या गोष्टी सांगशील’, म्हणून.”

“अरे, पण पैशाची व्यवस्था?” सखारामने विचारले.

“ते करणार आहेत सगळं.”

“त्यांना कशाला टेन्शन द्यायचं आपण?”

“त्यात काही टेन्शन नाही पप्पा. नोकरी लागली की ‘मी पैसे परत करेल’, असं त्यांना सांगितलं. शिवाय त्यांचा मुलगा नोकरीला असल्याने त्यांच्यावर फार जबाबदाऱ्याही नाहीत.”

“चला, नशीब आपलं. त्या काकांना तेवढी जाणीव तरी झाली; पण त्यांनी तुझ्यासाठी केलेला सर्व खर्च परत करायचा हंsss---” सखारामने सांगितले.

“हो, बोलणं झालं आहे आमचं तसं.”

“बरं झालं. देव पावला. आता रुचीले बी प्रसन्न होवो देवबाप्पा अन् तिचं लग्न लवकर जुळो. तिचंही लग्न उरकून टाका म्हणजे तेवढाच भार हलका होईल.” सरू बोलली.

“तिने हो म्हटलं की स्थळ पाहायला सुरुवात करू.” सखारामने सांगितले.

“या सुटीतच तिचा बायोडाटा तयार करू. स्थळ शोधत राहू. तोपर्यंत तिचे बी.टेकही होईल. मुलगाही इंजिनियरच पाहू.” सुमेधने सुचविले.

सुरुची काहीच बोलत नव्हती. काय बोलावं? घरच्यांना कसं सांगावं? त्यांनी आपल्याला समजून घेतलं नाही तर? तिला अनेक प्रश्न पडले होते. एवढ्यात त्याची उत्तरं तिला नको होती. ‘पदवी कोर्स पूर्ण झाल्यानंतर काय करायचं ते आपण ठरवायचं.’ असा विचार करून ती उठली आणि तिच्या रूममध्ये गेली होती. एकेक करून बाकी तिघेही ज्याच्या त्याच्या तालात राहिले.

तहसीलदारांनी सखारामला बोलावून घेतलं. तो त्यांच्या समोरच्या खुर्चीत जाऊन बसला. त्याच्या चेहऱ्यावरील टेन्शनच्या रेषा पाहून तहसीलदार म्हणाले,

“काय जाधव, टेन्शनमध्ये दिसता आहात जरा?”

“तसं काही नही साहेब. चालूच असतं जीवनात---” सखाराम फार काही बोलला नाही.

“अहो, आनंदाची बातमी आहे तुमच्यासाठी. विभागीय आयुक्त कार्यालयातून तुमच्या पदोन्नतीचा आदेश आला आहे. अभिनंदन!”

“थँक्यू साहेब, तुमचेही प्रयत्न आहेतच त्यात----”

“तुमचं काम पाहता दोन-तीन वर्ष आधीच हे प्रमोशन व्हायला पाहिजे होतं. त्यासाठी अनेकदा पदोन्नतीचा प्रस्ताव पाठविला होता. रिक्त पदांचा काही प्रश्नच नव्हता.”

“आपण प्रयत्न केले हेच खूप झाले साहेब. शासनाची धोरणं आणि प्रशासकीय कारणांमुळे बऱ्याच गोष्टी राहून जातात. नाही तर उशिरा होतात; पण जे होतं ते ठीक होतं.” सखाराम म्हणाला. त्याच्या बोलण्यात आनंद वाटत नव्हता.

“शेवटी-शेवटी का होईना, तुमच्या कामाला न्याय मिळाला, हेच खूप झालं.” असं म्हणून तहसीलदारांनी ज्ञानोबाला पेढे व बुके आणायला सांगितले. एक तरुण, उत्साही तहसीलदार सखारामच्या बढतीबाबत आनंदी दिसत होता. सखारामच्या कामाची छाप त्याच्यावर पडलेली होती.

“काय करणार साहेब, आता दीड वर्षच त राहिलं. काय फरक पडणार हाये, या पदाचा आणि वाढीव पगाराचा? वेळेवर बढती झाली असती त बरं झालं असतं.”

“जाधव, इतकं काही उदास व्हायचं नसतं हो. जे मिळालं, ते फुलासारखं सन्मान म्हणून स्वीकारून घ्यायचं. वरिष्ठ पदावरून तुम्ही रिटायर्ड होणार. पेन्शनमध्येही फरक पडेल.”

दोघांचं बोलणं सुरू असताना ज्ञानोबा पेढे आणि बुके घेऊन आला. नंतर सखारामचा सत्कार केला. त्याच्या उत्कृष्ट कार्याबद्दल तहसीलदार कौतुकास्पद असे दोन शब्द बोलले आणि ‘प्रत्येकाने

असेच काम केले पाहिजे', हा संदेशही दिला. पवारबाईंना कार्यमुक्त आदेशाचे पत्र द्यायला सांगितले. ती ऑर्डर देत बाई सखारामला म्हणाली,

"हे ऑर्डर घ्या. आणि एक-दोन दिवसांत धुळे जिल्ह्यातील शिंदखेडा तहसीलला रुजू व्हा."

"हे असं असतं साहेब. फुलाबरोबर काटे असले की मनाला टोचतं आणि त्या सन्मानाचा उत्साह कमी होतो."

"काय जाधव, पुन्हा तेच. जरा पॉझिटिव्ह विचार करा."

"हो न साहेब, नेहमीच विचारात गुंगलेले असतात जाधव साहेब. त्यांची रिलीव्ह ऑर्डर तयार करत होती तेव्हा 'कार्यमुक्त' या शब्दानं माझं मन भरून आलं होतं साहेब. चांगला माणूस आपल्यापासून दूर जातो आहे, याचं लय वाईट वाटत होतं."

"पाहिलं जाधव साहेब, अहो आमच्यासारखी प्रेमळ माणसं तुमच्यासोबत असताना फुलांचा विचार करा. काटे कशाला पाहता?" भोळे म्हणाला. ज्ञानोबा त्याच्याकडे पाहून बारीक हसला.

संध्याकाळी घरी आल्यानंतर सखारामनं शिरोळे साहेबांना फोन केला,

"काय गणेशराव, काय चाल्लंय सध्या? तू इतका बिझी कसा काय असतो रे? साधा फोनही करत नही?"

"तसं नाही रे. आमची काय सरकारी नोकरी आहे यार? कामं कमी आणि टाईमपास जास्त."

“म्हणजे आम्ही कामं टाळून टाईमपास करतो का बे?”

“तसं नाही रे. आम्हाला कामाचे रिझल्ट द्यावे लागतात. नाही तर त्याचे परिणाम नोकरीवर होतात.”

“ठीक हाये यार, पण तुले प्रमोशन मिळालं, हे सुमेधनं सांगितलं. आणखी बरंच काही सांगितलं त्यानं.”

“अरे, मी नाही सांगितलं होतं त्याला. तरी दिलं सर्व सांगून.”

“असू दे. तू खरी मैत्रीची लाज राखली यार. नाहीतर त्याला एम.बी.ए. करणं मले शक्यच नव्हतं; पण मी त्याले सांगितलं, ‘काकांचे पैसे परत करायचे.’”

“पागल आहे का रे तू? कशाला लेकराला ताण देतो आतापासून? शिरोळे म्हणाले.

“सुमेधचं पहिलं वर्ष असंच निघून गेलं. त्यानं चांगले मार्क्स मिळवले हाये.”

“पाहिले मी. तुले तर काही वेळ नसतो फोन करायला.”

“तू केव्हा रिकामा असतो काही कळत नही. तू का बरं फोन करत नही? सखारामच्या बोलण्यात राग होता.

“तू केला ना, तर बोल. आणखी काय ते सांग?”

“तुला विशेष बातमी सांगायची होती.”

“सांग. काही नवीन आहे का?”

“हो. तहसीलदार म्हणून रिटायर्ड व्हायचं होतं; पण नायब तहसीलदार म्हणून प्रमोशन झालं.”

“अरे वा, छान! जे मिळालं ते सही. सेवाज्येष्ठतेपेक्षा तुझ्या कामाची दखल घेतली गेली. हेच खूप झालं.”

“पण बदली झाली यार. आता दीड वर्षासाठी उगीच इकडून-तिकडे फिरावं लागेल.”

“फिरतोच कशाला? दोघेच तर असतात घरी. ये-जा करायची. फार लांब नसेल तर.”

“करून घेऊ काही तरी व्यवस्था. ते करता येईल. तू घरी कधी येणार सांग? बरेच वर्ष झाले भेट नाही आपली.”

“तसंच असतं गड्या. शिक्षण संपेपर्यंत संगत-सोबत असते. नंतर जो तो ज्याच्या त्याच्या विश्वात इतका गुरफटून जातो, की पुन्हा भेटीगाठी होणं कठीण होतं.”

“असो, या निमित्ताने तरी आपली जुनी ओळख नवी झाली न, ते भरपूर झालं.”

“चालेल. भेटू आपण लवकरच. तुला सरप्राईज द्यायला येईन. तेव्हाच भेटीन.” शिरोळे म्हणाले.

“ ठीक हाये---” म्हणून सखारामनं फोन कट केला.

*** *** ***

सुरुचीच्या शेवटच्या सत्राची परीक्षा संपून तीन दिवस झाले होते. मायलेकीचं फोनवर रोज बोलणं व्हायचं. 'घरी केव्हा येणार?' हे त्यांच्या बोलण्यात आलं नव्हतं. 'परीक्षा संपली की येईलच.' असं तिच्या आईनं गृहीत धरलं होतं; पण ती घरी न आल्याने तिची काळजी वाटत होती. संध्याकाळी सखाराम घरी आल्यानंतर मुलीचा विषय काढावा की नाही, या विचारात सरू होती. चिंता लागून असल्याने ती काहीच बोलली नव्हती. ती यंत्रासारखं काम करत होती. तिची अस्वस्थता त्याच्या लक्षात आली होती; पण त्याने काही विचारले नव्हते. बदलीच्या ठिकाणी रोज जाणं-येणं, थकवा आणि कामाचा ताण यामुळे तो शांत राहत होता. तरीही सरू मनातील जळमटं बाहेर टाकून म्हणाली,

"अहो, मी काय म्हणते?"

"मले माहीत हाये, काय म्हणशील ते. तुझ्यासारख्या बायकांना प्रश्न आणि समस्या याशिवाय नवऱ्याजवळ काही बोलणं सुचतं का?" सखाराम जरा हसून बोलला.

"आयका त खरी."

"सांग. रामायण सांगते की महाभारत?" पुन्हा त्याने तिची गंमत केली.

"अहो, परीक्षा संपली तरी पोरगी आली नही घरी."

"तू त रोज बोलते न तिच्यासोबत?"

“हो, ‘यीन म्हणे’ आन् पत्ताच नही तिचा. बरं, इचारलं त खरं सांगतबी नही.”

“तुम्हीच फोन करून इचारा न.”

सरूच्या समाधानासाठी सखाराम फोन करून सुरुचीशी बोलला,

“रुची बेटा, घरी यायचा विचार नही का?”

“हो पप्पा, येईल ना. थोडे दिवस. मग फोन करेल तसा.”

“येत नशीन त सांगजो, काही लागलं फोन करजो.”

त्याच्या या बोलण्याचा सरूला राग आला होता; पण तिने गिळून घेतला आणि हळूच म्हणाली,

“आसं इचारता का? घरी ये म्हणा. परीक्षा संपली आता.” हे ऐकून त्याने सरूच्या हातात फोन देत मुलीला सांगितले,

“बोल, तुही ममी काय म्हणते.”

तशी नाराज होऊन सरू फोन घेत बोलली,

“परीक्षा संपली न आता. मंग घरी ये. काय करते तढी?”

“ येईल ना गं ममी. मी जरा कंपनी जॉबची तयारी करते आहे.”

पोरगी ऐकत नाही आणि बाप सांगत नाही; म्हणून सरूनं फोन कट केला होता.

“हे तुमचे लाड हाये. पोरीले काही सांगतच नही.” सरू बोलली.

“काय सांगायचं, बोल? मुलांनो शिका अन् शिकून माय-बापाजवळ बसून राहा?”

“हे असंच आसतं तुमचं. आपण काही सांगा त तुमचं काहीच आसतं---”

“अगं, मुलांना नवीन आयुष्य घडवू द्यायचं हाये नं मंग जुन्या इचारानं पाहू नको.”

सरू शांत बसली. तोही तसाच बसून राहिला. शेवटी उठून बेडरूममध्ये जाऊन झोपला. तिचं काही समाधान झालं नव्हतं. ती मुलीचाच विचार करत होती. भीतीही वाटत होती.

*** *** ***

सुरुचीचे बी.टेकचे शेवटचे सत्र सुरू झाले होते. तिच्या कॉलेजमध्ये दोन-तीन आयटी कंपन्यांच्या कॅम्पस मुलाखतीही झाल्या होत्या. ती एका नामांकित आयटी कंपनीची Aptitude Test आणि Coding Round उत्तीर्ण झाली होती. तिच्या फायनल इयरच्या प्रोजेक्टवर विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे तिने बरोबर दिली होती. त्यानंतर त्या कंपनीच्या मानव संसाधन (Human Resources) विभागाकडून अंतिम मुलाखत घेण्यात आली होती. एच.आर.ला तिचं व्यक्तिमत्त्व, संवादकौशल्य, आत्मविश्वास, वागणूक आणि कंपनीत काम करण्याची तयारी, या गोष्टी भावल्या होत्या. तिने सामान्य प्रश्नांची व्यवस्थित उत्तरे दिली होती. त्यामुळे अंतिम वर्षाची परीक्षा

संपण्यापूर्वीच तिला ऑफर लेटर मिळाले होते. मात्र, पदवी पूर्ण झाल्यानंतरच कंपनीत रुजू होण्याची तारीख देण्यात येणार होती.

अखेर तो दिवस उजाडला. ती चांगल्या गुणांनी पास झाल्याने कंपनीकडून तिला जॉईनिंग लेटर मिळाले होते. त्यावेळी तिने तिच्या आईला फोन करून सांगितले होते. नंतर एक दिवसाच्या भेटीसाठी ती रविवार पाहून घरी आली होती.

सुरुची घरी आली होती खरी; पण ती मनाने घरात नव्हतीच. तिने एक औपचारिकता पाळली होती आणि तिसऱ्या दिवशी पुण्याला निघून गेली होती. तिचा क्लासमेट रोहण आणि ती एकाच कंपनीत, एकाच दिवशी रुजू झाले होते. तिने तिचे जॉइनिंग लेटर तिच्या आई-वडिलांच्या व्हॉट्सअॅपवर टाकले होते. दोघांना फार आनंद झाला होता.

दिवाळीच्या चार दिवसांच्या सुट्ट्या असल्याने सुरुची पुन्हा घरी आली होती. त्यावेळी सुमेधनं तिच्या लग्नाचा बायोडाटा तयार केला होता. घरातील सगळ्यांच्या 'हो'ला 'हो' लावून तिने मूक संमती दिली होती. नंतर ती कंपनीत हजर होण्यासाठी पुण्याला निघून गेली.

आई-वडील तिच्या लग्नासाठी स्थळ शोधत होते. मुंबईला एका कंपनीत इंजिनियर असलेल्या मुलाचे स्थळही आले होते. त्यासाठी तिला घरी बोलाविले होते. तेव्हा तिने आईला फोनवर स्पष्ट सांगितले,

"आई, मी लव्ह मॅरेज केलेले आहे. तुम्ही काही स्थळ पाहू नका."

मुलीचे बोलणे ऐकून सरूला मोठा धक्का बसल्याने ती कोमात गेल्यासारखी सुन्न झाली होती. लगेच स्वतःला सावरत म्हणाली,

"मले वाटतच होतं तू असं काही करशीन म्हणून; पण तुह्ये पप्पा ऐकतच नव्हते."

"आई, जे झालं ते झालं आता. तू मात्र पप्पांना शांतपणे समजून सांगशील."

"काय सांगू त्यांना? तुमच्या पोरीनं तोंडाले काळं फासलं म्हणून?"

"काय आई, तू त समजून घे."

"त्यांच्या लाडानं अन् त्यांनी सूट दिल्यानं तू असा निर्णय घेतला."

"बरं आई, बोलते मी नंतर. थोडी कामात आहे." सुरुचीने फोन कट केला. सरू तर अर्धमेली झाली होती.

*** *** ***

सरू अंथरूण टाकत होती आणि शेजारी असलेल्या खुर्चीत बसून सखाराम फाईल चाळत होता. काही पेन्सिलनं खुणा करत होता. थोड्या वेळानं सरू बोललीच. तिच्या बोलण्यात सखारामवर खरोखर राग होता.

"झाली नं तुमच्या मनाची शांती. लावले नं पोरीनं चांगले दिवे."

"अरे व्वा, नशीबवान हाये आपण. आपल्या मुलीनं दिवे लावले. लोकांना तेवढाच प्रकाश त मिळेल."

"ते नाही म्हणत मी."

“मंग काय म्हणते, सांग?”

“तिनं काय केलं, माहीत हाये तुमाले?”

“काय केलं? तूच सांग.”

“तिकडच्या तिकडे लग्न केलं तिनं. मायबाप मेले व्हते का तिचे?” सरूचा राग वाढत होता.

“तुले सांगू का?”

“आता काय सांगता? सांगा. मले माहीत हाये. चार पुस्तकं वाचून त्यातले विचार सांगणार; पण ते काही कामाचे नसता---” सरूचा राग काही गेला नव्हता.

“तुह्यासारखे लोकं जगण्याचे विचार बिनकामाचे मानता; म्हणून तुम्ही लोकं टेन्शनमधी राहता.”

“लोकं काय म्हणतील? याचा विचार त करा जरा. तुमाले सांगत होती कधीचीच. स्थळ पाहा म्हणून?”

“काळ खूप बदलला हाये गं. इथे कोणाला कोणाचा इचार कऱ्याले वेळ नही.”

“तुमाले काय माह्यती हाये. तुम्ही राह्यता तुमच्या-तुमच्या कामात. त्या कमलताईची पोरगी पळून गेल्ती त कॉलनीतल्या बाया नुस्त्या कुचकुच कऱ्याच्या.”

“दुसऱ्याच्या घरात डोकावून पाहण्यानं मंग काय मिळालं होतं, त्या बायांना?”

“रीतीरिवाज मोडणं नही चालत. नही त लोकं लाज काढता आपली.”

“काढू दे. कोणी काही ब्रँडेड लाजेचं लेबल लावून जन्माला येत नही.”

“तुमी काही सरळ इचार करत नका जाऊ. काव्हाबी पाहा त उलटंच सांगता.”

“जाऊ दे नं. जे झालं ते झालं. आता काय करशीन सांग? मुलं मोठी झाले की त्यांचे निर्णय त्यांना घेऊ द्याचे.”

“पण लोकांना पटतील आसे कामं कऱ्याचे न, का आपल्या मनानं काहीबी कऱ्याचं?”

“आता बोलून काही फायदा नही. पुढे काय कऱ्याचं ते पाहा. चुकीचे विचार सोडून दे. चांगले इचार कर. म्हणजे पोरीचं आयुष्य आनंदात जाईल.”

सखारामनं सांगितलं आणि बोलणं बंद करून फाईल ठेवून दिली. तो झोपून गेला. सरूच्या डोक्यातून मात्र मुलीचे विचार जात नव्हते. तिला फार काळजी वाटत होती; पण तिच्या हातात काहीच नव्हतं. ‘नवऱ्याला काही चिंता नाही,’ असंही तिच्या मनात येत होतं; पण इलाज नव्हता.

सुमेधच्या शेवटच्या सत्राची परीक्षा संपत आली होती, तरी त्याच्या कॉलेजमध्ये कॅम्पस प्लेसमेंटसाठी कोणी आलेले नव्हते; म्हणून त्याला जॉबच्या बाबतीत ताण येत होता. एम.बी.ए.नंतर कंपनी जॉब नाही

मिळाला, तर वडील रागवतील आणि शिरोळे काकांचे पैसेही देणं राहून जाईल, याची भीतीही त्याला वाटत होती. मात्र 'डर के बावजुद सक्सेस' हे त्याच्या मनावर कोरले गेले होते. त्यामुळे त्याने चारही सत्रांची नियोजनबद्ध व शिस्तबद्ध तयारी केली होती. तिन्ही सत्रांमध्ये त्याला 'फर्स्ट क्लास फर्स्ट'चे गुण मिळाले होते. तो संधीची वाट पाहत होता. 'शिरोळे काकांना फोन करून पाहावं का?' हा प्रश्नही अधूनमधून त्याला पडत होता; पण 'त्यांना आणखी काही टेन्शन देऊ नये,' असेच उत्तर त्याच्या मनाच्या कागदावर उतरत होते. तरीही त्याचा आकर्षण सिद्धांत त्याला कामात आला होता. शिरोळे साहेबांनी त्यांच्या कंपनीच्या 'एच.आर.' मॅनेजरला फोन करून सांगितले,

"हे बघा काळे, एम.बी.ए.च्या मुलांची परीक्षा संपत आली असेल. काही चांगली कॉलेज निवडा आणि कॅम्पस प्लेसमेंटची तयारी करा."

"हो साहेब, सर्व प्रोसेस झाल्यानंतर तुम्हाला सांगतो."

"ओके---" म्हणून शिरोळे साहेबांनी फोन बंद केला.

खानदेश इंडस्ट्रीज लिमिटेडच्या एच.आर. विभागामार्फत काळे साहेबांनी काही निवडक कॉलेजशी समन्वय साधून कॉलेजच्या प्लेसमेंट सेलच्या प्राध्यापकाशी संपर्क केला होता. प्लेसमेंटची तारीख, वेळ, विद्यार्थ्यांची संख्या ठरविली होती. विद्यार्थ्यांचे अर्ज आणि रिझ्युम तपासून पात्र उमेदवारांची यादी तयार केली. ती यादी शिरोळे साहेबांना दिली. त्या यादीत सुमेधच्या 'बाबासाहेब इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट,

पुणे' या कॉलेजचाही समावेश होता. नामांकित कॉलेज असल्याने त्यासाठी वेगळे काही प्रयत्न करावे लागले नव्हते.

प्लेसमेंट सेलच्या चेअरमनने विद्यार्थ्यांसाठी 'खानदेश इंडस्ट्रीज लिमिटेड' कंपनीचे अधिकारी कॅम्पस प्लेसमेंटसाठी येणार असल्याची सूचना नोटीस बोर्डवर लावली. त्या दिवशी चौथ्या सत्राचा शेवटचा पेपर होता. पेपर सुटल्यावर सुमेधने सूचना वाचली.

"अरे, ही तर काकांचीच कंपनी आहे," असं पुटपुटत स्वतःशीच बोलला.

बाकी वर्गमित्रांना काही सांगितले नव्हते. मात्र त्याला खूप आनंद झाला होता. 'शिरोळे काकांना फोन करावा का? फोन करून काय सांगणार? वशिला लावतो आहे, असं त्यांना वाटलं तर?' या विचाराने तो गोंधळून गेला होता. मनात आलेले विचार तसेच फेकून दिले होते.

सुमेधची शिस्त आणि अभ्यास यावर त्याचा विश्वास होता. शिवाय कंपनीत कॅलिबर कॅन्डिडेट निवडले जातात, हेही त्याला माहीत होतं; म्हणून 'उगीच शिरोळे काकांना कोड्यात टाकू नये,' या विचाराने त्याने फोन केला नव्हता.

पेपर संपल्याने परीक्षेचा ताण गेला होता खरा; पण कॅम्पस इंटरव्ह्यूची तयारी करण्यासाठी तो पुन्हा अभ्यासाला लागला होता. दुपारच्या लंच टाईममध्ये शिरोळे साहेबांनी सुमेधला फोन केला. मोबाईलच्या स्क्रीनवर त्यांचे नाव पाहून त्याला आश्चर्य वाटले.

"नमस्कार काका---?"

“सुमेध, काय करतोय सध्या? परीक्षा संपल्या न आता?”

“हो काका...”

“पुढील आठवड्यात कॅम्पस इंटरव्ह्यू आहे नं तुमच्या कॉलेजला?” शिरोळे साहेबांनी सहज विचारलं.

“हो काका, २७ जुलैला आहे.”

“चांगली तयारी कर. काही शंका असल्या तर फोन करशील.”

“हो काका, काही प्रॉब्लेम नाही. अभ्यास सुरूच आहे.”

“छान...! तयारी सुरू ठेव.”

शिरोळे साहेबांनी फोन बंद केला.

‘खानदेश इंडस्ट्रीज लिमिटेड’ कंपनीतील एजीएम श्री. शिरोळे, एच.आर. मॅनेजर श्री. काळे आणि प्रशासकीय प्रमुख श्री जोशी यांची निवड समिती तयार केली होती.

सुमेधची परीक्षा संपल्यानंतर तो घरी न जाता त्याच्या होस्टेलच्या रूमवर अभ्यास करण्यासाठी थांबला होता. अधूनमधून शिरोळे काकांना फोन करण्याचे विचार त्याच्या मनात यायचे; पण ‘काय सांगायचं?’ याचं उत्तर त्याला मिळत नव्हतं. त्यामुळे तो काही फोन करत नव्हता.

रात्री नऊ वाजता मोबाईलची रिंग वाजली. घाईनेच त्याने फोन उचलला. तो शिरोळे साहेबांचा नव्हता. स्क्रीनवर ‘आई’ हे शब्द पाहिले आणि त्याने फोन चालू केला.

“हंsss, बोल आई. कशी आहे?”

“सुटी लागली आशीन न आता?” सरूने विचारले.

“हो---”

“मग घरी का बरं आला नाही?”

“२७ तारखेनंतर येईल. थोडी इंटरव्ह्यूची तयारी करतो आहे.”

“जेवला? पेपर चांगले गेले न?”

“हो---, पप्पा---?”

“हाये नं---”

“नक्की येजो बरं. इंटरव्ह्यू झाल्यावर.”

“रुची आली का घरी?” त्याने विचारले.

“नही –”

“बरं, ठीक हाये. काळजी घे.” सुरुचीचा विषय निघाल्याने सरूने फोन कट केला होता.

*** *** ***

रोहण आणि सुरुची एकाच कंपनीत जॉबला होते. ती अमेरिकन ग्राहकासाठी विकसित केल्या जाणाऱ्या सॉफ्टवेअर प्रकल्पावर काम करत असल्याने तिची शिफ्ट दुपारी दोन ते रात्री अकरा अशी होती. तर रोहण भारत आणि युरोपमधील ग्राहकांच्या प्रकल्पांवर काम करत असल्याने त्याची शिफ्ट सकाळी नऊ ते संध्याकाळी सहा अशी होती. यामुळे दोघांचा सहवास फारसा घडत नसे. करिअरच्या मागे लागल्याने त्यांचे एकमेकांकडे बऱ्याचदा दुर्लक्ष होत होते.

रोहण सकाळी ऑफिसला जायचा, तेव्हा सुरुची नुकतीच झोपेतून उठायची. तो संध्याकाळी घरी यायचा, तर ती ऑफिसला असायची. तिला रात्री घरी यायला उशीर व्हायचा. तेव्हा तो झोपायच्या तयारीत असायचा. असा लपंडावसारखा उलटा खेळ सुरू होता. 'द गेम ऑफ लाईफ अँड हाऊ टू प्ले इट' या पुस्तकाची समरी दोघेही ऐकत होते; पण त्यांच्या रोमँटिक जीवनाचे सूत्र काही जुळत नव्हते.

आयुष्यात यश आणि पैसा हेच काही सर्वस्व नव्हते. त्याला प्रेमळ सहजीवनाला महत्त्व द्यायचे होते. नातेसंबंध टिकण्याच्या बाबतीत एकीकडे भीती तर कधी-कधी विश्वासही वाटत होता. त्यासाठी त्यांच्या मनाला आणि विचारांना योग्य दिशा देण्याचे प्रयत्न तो करत होता. मात्र कामाचा लोड आणि नोकरी टिकवण्याची, प्रमोशन मिळविण्याची धडपड यामुळे त्यांच्यातील अंतर कमी होत नव्हते.

दोघांना आठवड्यातून फक्त रविवार हाच एक पूर्ण दिवस एकत्र यायला मिळत होता. त्यात रोहणचं समाधान व्हायचं नाही. एका रविवारी दुपारी शहराच्या बाहेर थ्री-स्टार हॉटेलला ते गेले होते. जेवणाची ऑर्डर देऊन झाली होती. दोघेही आपापल्या विचारात बसले होते. बराच वेळ कोणी कोणाशी बोलत नव्हतं.

"अरे, बोलशील काही? का नुसतं खायला आलो आहे आपण इथे?" सुरुची म्हणाली.

"काय बोलू, सांग. नुसतीच धावपळ असते रोज."

"आपले जॉबच तसे आहेत, तर आपण काय करणार?"

“हो ना, आपल्याला निवांतपणा कधी मिळतच नाही.”

“चालूच असतं. करिअर करायचं म्हणजे काहीतरी ॲडजस्ट करावंच लागेल ना.”

“तुमचं बायकांचं ठीक असतं गं....”

“म्हणजे काय---?”

“बाईपेक्षा माणसाला स्त्रीचं आकर्षण जास्त असतं; म्हणून तर बायको जवळ असावी लागते.”

“तसं काही नसतं. तसं असतं तर आपलं प्रेम जोडलं असतं का?”

“हो, जुळल्यानंतर बाईला माणसाचं फार आकर्षण राहत नाही.”

“तू काय मानसशास्त्रात पीएच.डी. केली आहे का? काहीही बोलतोस.” ती म्हणाली.

“त्याची काय गरज? तूच पाहा ना. ठिकाणावर तरी असते का? रात्री थकून आली की पडून राहते.”

“तू तरी जागेवर असतो का? जरा वाटही पाहत नाही. घोरत पडलेला असतो.”

“त्यापेक्षा तू घरच सांभाळ. माझं प्रमोशन झालं की दोघांचे पगार त्यात बसून जातील.”

त्याच्या या बोलण्याने तिची वाचाच गेली. जेवणावरचं लक्ष उडालं. तिच्या चेहऱ्यावरील नाराजी त्याला दिसली. मग तोही चूप बसला. जास्त ताणलं जाऊ नये; म्हणून सुरुचीने वाद होऊ दिला नव्हता.

ते दोघे राहत असलेल्या फ्लॅटपासून कंपनी दूर असल्याने एक-दीड तास आधीच घरातून बाहेर पडावं लागत होतं. त्यामुळे रोहणला सकाळी लवकर उठून जायचं असल्याने तो झोपून गेला होता. हॉटेलमधून परत आल्यापासून तिने बोलणं बंद केलं होतं. मात्र तिला झोप लागत नव्हती. ती त्याच्या बोलण्याचे अर्थ लावत होती; पण मतितार्थ सापडत नव्हता. त्यामुळे तिचं झोपेचं खोबरं झालं होतं. दोघे एकाच बेडवर; पण तेथेही त्यांची जशी काही शिफ्ट बनली होती. दोघांत अंतर पडलं होतं.

‘जीवन केवळ गेम नाही, युद्धही आहे आणि ते कसं जिंकायचं?’ हा प्रश्न येऊन-जाऊन तिच्या मनात घोळत होता. बऱ्याच उशिराने तिला झोप लागली होती.

रोहण नेहमीप्रमाणे सकाळी पाच वाजता उठून त्याच्या तयारीला लागला होता; पण ती सोबत नव्हती. झोपून राहिली होती. उठली तेव्हा तो ऑफिसला जाण्याच्या तयारीत होता. तिच्याशी काही बोलत नव्हता. ती न राहवून म्हणाली,

“एकमेकांना प्रेमाची कबुली देणं सोपं असतं. पण त्याचा अनुभव आणून देणं कठीण असतं. आपल्या बाबतीत असंच काहीसं होत आहे.”

“म्हणजे माझं तुझ्यावर प्रेम नाही, असं वाटतं का तुला?” रोहणनं विचारलं.

“मी थोडी तसं म्हटलं....”

“त्याचा अर्थ तर तोच होतो ना?”

“तू काहीही अर्थ काढशीन, तर त्याला काय अर्थ आहे?”

“असंही तू समजून घेत नसल्याने तुला बोलण्याचे अर्थ कळणारच कसे?”

“तुझ्या बोलण्यात अर्थ कुठे असतो?” तिने प्रतिप्रश्न केला.

“जाऊ दे, तुझ्याशी डोकं लावत बसलो तर ऑफिसला वेळ होईल.”

“मी तरी तुला कुठे पकडून ठेवलं आहे? पकडून ठेवल्यानं त्रास होतो. तू ऐकलं नाही, ‘छोडना सीखो’?”

“त्या ऑडिओ क्लिपचा चांगलाच परिणाम झालेला दिसतो तुझ्यावर?”

“तू काही समज....” ती म्हणाली.

“ठीक आहे. तुला वाटत असेल सोडून द्यावं, तर तो तुझा निर्णय असेल. माझा नाही.... बाय.”

शेवटी फार वाद न घालता रोहण घराबाहेर पडला होता; पण त्याला बेचैन वाटत होतं. ‘तू नोकरी सोड.’ या एका बोलण्याने ती इतकी टोकाला का जाऊ शकते? आपलं काही चुकलं का? की तिला आता सोबत राहायचं नसेल? असे प्रश्न घेऊन तो ऑफिसला गेला होता.

*** *** ***

शेवटी यायची ती २७ तारीख उजाडली. सुमेध नेहमीप्रमाणे सकाळी पाच वाजता उठला. फिरून आल्यावर व्यायाम केला. नंतर इंटरव्ह्यूला जाण्याची तयारी करत असताना शिरोळे साहेबांचा फोन आला.

“गुड मॉर्निंग, काका.”

“गुड मॉऽऽऽर्निंग, सुमेध! काय, झाली का तयारी?”

“हो, काका.”

“घाबरायचं नाही. बिनधास्त उत्तरं द्यायची.”

“हो काका, काही प्रॉब्लेम नाही.”

“गुड... लक्षात ठेव. आत्मविश्वास असला की लढाई सुरू होण्याआधीच अर्धी जिंकलेली असते. त्यामुळे मनात ‘काय होईल?’, ‘कसं होईल?’ असं आणायचं नाही.”

“बरं, काका.”

“कुठल्याही प्रॉब्लेमकडे असंच पाहा. शुभेच्छा तुला.” शिरोळे साहेब उत्साहाने बोलले होते. सुमेधला जरा धीर आला होता; तरी मनात किंतु-परंतु होतेच.

सकाळी साडेदहा वाजता एक कार येऊन कॉलेजच्या गेटमधून आत आली होती. त्यातून तीन व्यक्ती उतरल्या होत्या. ते तिघेही प्राचार्यांच्या केबिनकडे चालले होते. त्यांच्यासोबत कॉलेजच्या प्लेसमेंट सेलचे चेअरमन असल्याने विद्यार्थ्यांनी ते कंपनीचे अधिकारी असल्याचे बरोबर ओळखले होते.

मुलाखती सुरू झाल्यानंतर एकेक विद्यार्थ्याचा नंबर येत होता. प्रत्येकाच्या मनात धाकधूक असायची. कोणी मुलाखतीच्या रूममधून बाहेर आला की काही जण त्याला, “काय काय प्रश्न विचारले?” आणि “कसा झाला इंटरव्ह्यू?” म्हणून विचारत असत. थोड्या वेळाने सुमेधला बोलविण्यात आले. केबिनमध्ये प्रवेश केल्यानंतर त्याने हात जोडून सर्वांना नमस्कार केला. त्याला समोर ठेवलेल्या खुर्चीवर बसण्यासाठी एच.आर. मॅनेजर काळे यांनी सांगितले आणि मुलाखतीला सुरुवात करत विचारले,

“स्वतःबद्दल माहिती सांगा.”

“सर, माझं नाव सुमेध जाधव आहे. मी ‘बाबासाहेब इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, पुणे’

येथून एम.बी.ए. (एच.आर.)च्या अंतिम वर्षाची परीक्षा दिली आहे. माझे वडील नायब तहसीलदार आहेत. मी स्पर्धा परीक्षेची तयारी करीत असताना एम.बी.ए. केलं.”

“स्पर्धा परीक्षेची तयारी सोडून एम.बी.ए. केलं?”

“सॉरी, सर. असं निश्चित काही सांगता नाही येणार.”

सुमेधचं बोलणं झाल्यानंतर एच.आर. विभागप्रमुख जोशी यांनी विचारलं,

“समजा, समूहामध्ये काम करताना दोन कर्मचाऱ्यांमध्ये वाद झाला, तर एच.आर. म्हणून काय कराल?”

“सर्वप्रथम दोघांचं म्हणणं स्वतंत्रपणे ऐकून घेईन. कोणताही पूर्वग्रह न ठेवता किंवा व्यक्तीभेद न करता वस्तुस्थिती समजून घेईन. त्यानंतर कंपनीच्या नियमांचं पालन करून दोघांमध्ये संवाद घडवून आणीन आणि तोडगा काढण्याचा प्रयत्न करीन.”

“एका दिवसात अनेक कर्मचाऱ्यांची उपस्थिती चुकीची लागली. एच.आर. विभागात तुम्ही काय कराल?”

“सर, प्रथम चूक नेमकी कुठे झाली ते तपासेन. बायोमेट्रिक रेकॉर्ड, शिफ्ट रजिस्टर आणि उपस्थितीची माहिती यांची पडताळणी करेन. संबंधित कर्मचाऱ्यांशी आणि विभागप्रमुखांशी संपर्क साधून योग्य

माहिती घेईन. पुन्हा अशी चूक होऊ नये म्हणून तिचं मूळ कारण शोधून त्यावर उपाय सुचवेन."

"MS Word, Excel आणि PowerPoint वापरता का?"

"हो, सर. आम्हाला त्याचं नेहमी काम पडतं."

जोशींचं बोलणं सुरू असतानाच शिरोळे साहेबांनी काही प्रश्न विचारले,

"बरं, एक सांगा. जर तुम्हाला कामाचा ताण आला, तर कसा हाताळाल?"

"सर, प्रत्येक कामाचं महत्त्व आणि अंतिम मुदत लक्षात घेऊन प्राधान्यक्रम ठरविला आणि त्यासाठी वेळेचं व कामाचं नियोजन केलं की अर्धा ताण त्याच वेळी कमी होतो. टीममधील सहकाऱ्यांशी समन्वय साधून शांतपणे निर्णय घेतले, की योग्य मार्ग काढता येतात, हे मला माहीत आहे."

"समजा, तुमचा जवळचा मित्र कंपनीत वारंवार उशिरा येतो; अशावेळी एच.आर. अधिकारी म्हणून तुमची भूमिका काय असेल?"

"सर, मैत्री आणि पद, मित्रप्रेम आणि कार्यालयीन जबाबदारी या वेगवेगळ्या गोष्टी आहेत. पहिले मी त्याला मित्र म्हणून त्याच्या उशिरा येण्याचं कारण समजून घेईन आणि त्याला समजावून सांगेन. जर त्याने ऐकलं नाही, तर कंपनीच्या नियमांनुसार वरिष्ठांना माहिती देणं ही माझी जबाबदारी असेल."

“उद्यापासूनच कामावर रुजू व्हायची संधी मिळाली, तर तयार आहात का?”

“होय, सर. माझी काम करण्याची इच्छा तर आहेच; पण अनुभवातून शिकून जबाबदारीही अधिक चांगल्या प्रकारे पार पाडेन.”

“तुमच्या आतापर्यंतच्या बोलण्यातून अहंकार व ओव्हर कॉन्फिडन्स वाटत नाही का? तसे असेल, तर आम्ही तुमची निवड का करावी?” हा प्रश्न ऐकून सुमेध जरासा गोंधळला, घाबरला आणि विचारात पडला. ‘आपण क्लोज रिलेशन म्हणून ज्यांना तोंडभरून काका म्हणतो, त्यांनी असं का विचारावं?’ तरीही स्वतःला सावरत तो उत्तरला,

“नाही, सर. तसं काहीच नाही. अहंकार व ओव्हर कॉन्फिडन्स यामुळे योग्य निर्णय घेण्यात चुका होतात. शिकण्याची वृत्ती कमी होते, अपयशाची शक्यता वाढते, नाती बिघडतात. हे मला माहीत आहे. त्यामुळे मी नम्रपणे बोलतो आणि शांतपणे निर्णय घेतो.”

“ठीक आहे. तुम्ही जाऊ शकता.” शिरोळे साहेबांनी सांगितलं.

“सर्वांचा आभारी आहे मी,” म्हणत हात जोडून सुमेध रूममधून बाहेर पडला. त्याला थकल्यासारखं वाटलं. जास्त वेळ मुलाखत चालली म्हणून बाकी विद्यार्थी चर्चा करत होते. एकाने विचारलंच,

“अरे यार, इतका वेळ कसा काय रे?”

“अरे, ते एक से बढकर एक रथी-महारथी. नुसतेच प्रश्न विचारायचे.”

“मग काय? तू दिली का उत्तरं?” दुसऱ्याने विचारलं.
“हो, जसं सुचलं तसं सांगितलं. बघू काय होईल ते.”

सुमेध बाहेर गेल्यावर काही क्षण मुलाखतीच्या केबिनमध्ये शांतता पसरली होती. त्याने दिलेल्या मुलाखतीबाबत निवड समितीच्या सदस्यांमध्ये त्याच्या ज्ञानाची, बुद्धीची व कौशल्याची चर्चा झाली. तिघांनी त्याचं कौतुक केलं होतं. शिरोळे साहेबांनी कंपनीचा प्रोटोकॉल पाळून सर्व विद्यार्थींना समान वागणूक दिली होती. पहिल्या वेळेस त्यांनी सुमेधमधी हुशारी पाहिलेली होती. त्यामुळे त्यांना त्याच्यासाठी काही वेगळे पर्यटन करण्याची गरज वाटली नव्हती. फक्त त्याच्यासारख्या हुशार, होतकरू तरुणांना संधी उपलब्ध करून देण्याच्या तयारीत ते असायचे. त्यामुळे सुमेधला ती संधी मिळाली होती.

कंपनीच्या त्या तीन सदस्यांनी मिळून निकाल तयार केला. त्यात सुमेधची निवड झाली होती. परत जाताना शिरोळे साहेबांनी सुमेधला फोन केला आणि मोबाईलवर पाठविलेल्या लोकेशनवर यायला सांगितलं. नंतर तो विचारात पडला,

“शिरोळे काकांच्या मनात नेमकं काय आहे, तेच कळत नाही. फोन करून चौकशी करतात. धीर देतात. बाकी काही सांगत नाहीत. उलट तटस्थ राहतात. जसे काही आपले कोणतेच संबंध नाहीत. असे ते या वेळी वागले; पण असं का? त्यांचं बरोबर असेल. नाहीतर त्यांनी कोर्स पूर्ण होण्यासाठी मदत केलीच नसती.” त्याने स्वतःच्या मनाची समजूत घातली आणि तो त्यांनी बोलावलेल्या लोकेशनवर गेला.

कोरेगाव पार्क येथील स्पेशालिटी कॉफीसाठी प्रसिद्ध असलेल्या शांत वातावरणात समितीतील तिघेही बसले होते. शिरोळे साहेबांनी कॉफीची ऑर्डर दिली होती. श्री. काळे यांनी विचारलं,

“साहेब, आपण तीन आणि ऑर्डर चारची का दिली?”

“असंच...” शिरोळे साहेब फार काही बोलले नव्हते.

“त्यांना डबल पेग मारायचा असेल. हो ना, साहेब?” जोशी म्हणाले आणि शिरोळे फक्त किंचित हसले.

तेवढ्यात समोरून सुमेध येताना त्यांना दिसला. काळे आणि जोशी यांचंही त्याच्याकडे लक्ष गेलं. काळे म्हणाले,

“अरे, तो विद्यार्थी सुमेधच ना?”

“हो, सुमेधच आहे.” जोशींनी पुष्टी केली.

“इथे कसा काय? त्याचं कॉलेज तर फार लांब आहे.”

“तो माझ्या खऱ्या मित्राचा मुलगा आहे. भेटायला बोलावलं आहे.” शिरोळे म्हणाले.

“आपण तर मुलाखतीच्या वेळी भेटलो होतो; पण तुम्ही तसं काही बोलले नाही की काही सांगितलं नाही.” श्री. काळे म्हणाले.

“हो ना. उलट आमच्यापेक्षा तुम्ही त्याला जास्त कठीण प्रश्न विचारले.”

“त्याचं कारण असं आहे की, उद्या कोणी असं म्हणू नये की, शिरोळेंनी त्यांच्या मित्राच्या मुलाला नोकरी दिली.” शिरोळे साहेबांनी सांगितलं.

“कमालच आहे, साहेब! जर तो इंटरव्ह्यूमध्ये कमी पडला असता तर?” श्री. काळे यांनी प्रश्न केला.

“माझा विश्वास होता त्याच्यावर. त्यामुळे मी तटस्थ भूमिका घेतली.”

सुमेध त्या तिघांच्या टेबलजवळ आला. सर्वांना नमस्कार केला आणि शिरोळे साहेबांच्या पाया पडला. त्यांनी त्याला समोरच्या खुर्चीवर बसायला सांगितलं. वेटरने चार कॉफी आणल्या. तेव्हा ‘चार का?’ हे काळे आणि जोशी यांना कळलं. कॉफी घेताना जोशी म्हणाले,

“सुमेध, तू फार हुशार आणि समजदार आहेस. एवढं पोटेन्शियल तुझ्यात आलं कुठून?”

“काय जोशी! अहो, हा काय इंटरव्ह्यू इव्हेंट आहे का?” श्री. काळे म्हणाले.

“नाही हो, मुलगा फार हुशार आहे. त्यामुळे त्याचं नावच लक्षात राहिलं नाही, तर उत्सुकताही निर्माण झाली.” जोशींनी समर्थन केलं.

“तुमचे दोघांचे म्हणणं बरोबर आहे. अशी काही मुलं आहेत, त्यांना आपण योग्य दिशेने घेऊन जायला हवं.” शिरोळे साहेब बोलले.

“काका, तुम्ही दोन-तीन वेळा फोन केले; पण तुम्ही इंटरव्ह्यू पॅनलचे प्रमुख आहात, हे सांगितलं नव्हतं की तसे संकेतही दिले नव्हते. जेव्हा तुम्हाला गाडीतून उतरताना पाहिलं, तेव्हा तर आश्चर्यच वाटलं.” त्याचं बोलणं ऐकून काळे आणि जोशी एकमेकांकडे पाहायला लागले. शिरोळे साहेब म्हणाले,

“त्याचं काय आहे, सुमेध, तुला सांगितलं असतं, तर काकाच प्रमुख आहे म्हटल्यावर तू निश्चिंत राहिला असता आणि तुझे प्रयत्नशील मन कमजोर बनले असते.”

“तरीही साहेब, तुम्ही म्हटलं असतं, तर आपण त्याचं सिलेक्शन केलं असतं,” जोशी म्हणाले.

“ते ठीक आहे की, आपण त्याला संधी दिली असती; पण कंपनी ते नाही पाहत. गुणवत्ता पाहते, रिलेशन नाही. आणि मला कंपनीचा प्रोटोकॉल तोडायचा नव्हता.”

“म्हणजे एकाच वेळी तुम्ही कंपनीचा प्रोटोकॉल की मित्राचा मुलगा, या कात्रीत सापडले होते का?” जोशींनी विचारले.

“नाही, मला खात्री होती की कंपनीचा प्रोटोकॉल तोडून सुमेधची निवड करण्याची गरज पडणार नाही.”

“व्वा साहेब, मानलं तुम्हाला; म्हणून तर कंपनीने तुम्हाला प्रोमोशन देऊन बऱ्याच जबाबदाऱ्या सोपवल्या, ते बरंच झालं,” काळे म्हणाले.

“तुम्हाला सांगू, हे मला सुमेधच्या वडिलांकडूनच शिकायला मिळालं.”

“म्हणजे, तुमचे शिक्षक होते का ते?” जोशींनी विचारले.

“नाही, तालुक्याच्या शाळेत आम्ही क्लासमेट होतो. आमची गावे शेजारी-शेजारी होती.”

“मग...?” काळेंनी उत्सुकतेने विचारलं. सुमेध लक्ष देऊन ऐकत होता.

“मग काय, ते शेतकरी आणि आम्ही मजूर. असं विरोधी चित्र होतं; पण मैत्री सुसंगत होती.”

“बरं का, जोशी साहेब, शिरोळे काकांनी दोन वर्षं खूप छान सांभाळलं मला. त्यामुळे मी निवांतपणे काही करू शकलो,” सुमेधने कृतज्ञतापूर्वक सांगितले.

“सुमेध, माझा तुझ्यावर विश्वास होता. त्या विश्वासाला तू तुझ्या आत्मविश्वासामध्ये कन्व्हर्ट केलं, हे मी जाणून होतो. त्यामुळे मी बिनधास्त होतो.”

“थँक्यू, काका---”

“मागे तुझ्या अकॅडमीला मी प्लेसमेंटसाठी आलो होतो. त्यावेळी तुझ्यातले सगळे गट्स मी ओळखले होते; म्हणून तुला एमबीए करण्याचा सल्ला दिला होता. तो तू अमलात आणला, हे खूप चांगलं झालं.”

“खरंच ना, साहेब, आजकाल कोणी कोणाचं ऐकतच नाही; पण हा मुलगा ऐकून आहे, हे विशेष! नाहीतर आजकालची पिढी तिच्याच तालात असते. अपवाद हे असे आहेत,” काळे म्हणाले.

“चला आता, बराच वेळ झाला आहे.” शिरोळे साहेबांनी सांगितले. सर्व जण उठले. सुमेधला शुभेच्छा देऊन समितीचे सदस्य त्यांच्या कंपनीच्या मार्गाला लागले आणि सुमेध त्याच्या रूमवर गेला.

*** *** ***

संध्याकाळी हॉलमध्ये बसून सखाराम सातच्या बातम्या पाहत होता. सरू ही टीव्ही पाहता-पाहता गवाराच्या शेंगा खुडत असतांना म्हणाली.

“पोरांची काही काळजी हाये की नाही?”

“काय झालं आता, एवढी काळजी कऱ्याले?”

“सुमेधची परीक्षा संपली. तरी घरी आला नाही.”

“घरी येऊनबी काय करीन तो? पाहात असेल जॉब तिकडेच. असाही त्याचा कोर्स संपला हाये आता.”

“मंग काय चाल्लं? काय नाही? फोन करून इचाऱ्याले नको का?”

“तू करते नं त्याला रोज फोन. मंग...?”

“तो सांगतोच कुठी काही. आपण इचरावं तं ‘काळजी करू नको’ म्हणतो.”

“अगं, मुलं मोठे झाले की त्यांना त्यांच्या पद्धतीनं चालू द्यावं. आता तो काय लहान हाये का? समजतं त्याला सगळं.”

“तुम्ही तं काही सिरियसली घेतच नाही. पोरीले सूट दिली आणि डोक्यात राख घालून बसली. तिनं साधं इचारलंबी नही.”

“असं काय केलं तिनं?”

“तुमाले जसं काही माह्यतीच नही?”

“लव्ह मॅरेज केलं, हेच न? आपणही लग्न लावून दिलं असतं तिचं. मंग ते काय आणि हे काय? लग्नच हाये न?”

“पण मुलगा कोण? कुठला? त्याचं खानदान काय? पाह्याले नको का?”

“आता आपण पाहून काय करणार? जे झालं ते स्वीकारावं.”

“ती काही फोन करत नही. सांगत नही. मंग कसं कळीन आपल्याले?”

“तू चांगली बोलत नाही न तिच्याशी. ती घाबरत असेल तुले.”

“मी काय दुस्मान हाये का तिची? तुम्ही का नाही जाऊन चौकशी करत? वर्ष झालं, तरी तिचा काही पत्ता नाही.”

“उगीच काही काळजी करू नको. मी करतो तिला अधूनमधून फोन. सांगते ती, ‘चांगलं चाल्लं हाये,’ म्हणून.”

“डोळ्यानं पाह्यलं त बरं वाटतं, पण तुम्हाले जाऊन भेट्याले वेळच कुठी हाये.”

“बघू एक दिवस...” असं म्हणून तो उठला आणि बॅगमधून फाईल काढून तपासत राहिला.

“नवरा काही ऐकत नाही आणि मुलं काही ठिकाणावर राहात नाही,” असा विचार करून ती उठली. स्वयंपाकाला लागली.

रात्री दहा वाजता दोघेही झोपले होते. बेडरूममधील झिरोचा बल्ब जरासा उजेड देत होता. नेहमीप्रमाणे सखारामच्या घोरण्याचा आवाज येत नव्हता. त्याला झोप येत नसेल, हे सरूच्या लक्षात आलं होतं; पण ती बोलली नव्हती.

“बायकोले वाटतं का? की, मी मुलांची काळजी घेत नाही? त्यांच्या गरजा आपण पूर्ण करतो. त्यांच्या मनासारखं त्यांना स्वातंत्र्य देतो. चुकले तं समजून सांगतो. मुलं ऐकून आहेत. चांगले यश मिळवत आहेत. मंग आणखी काय काळजी घ्याची?” तो बराच वेळ विचार करीत राहिला. तिच्या घोरण्याने त्याच्या विचारांना आणि झोपेला ब्रेक लागत होता. त्याचा मेंदू थकला, तेव्हा त्याला झोप लागली होती.

*** *** ***

मोबाईलची रिंग वाजली. इतक्या सकाळी कोणाचा फोन आला असेल? या प्रश्नाने सखाराम उठला आणि मोबाईल हातात घेऊन पाहतो, तर भोळेचं नाव दिसलं.

“आता याचं काय अडलं इतक्या सकाळी?” असं म्हणून त्याने फोन घेतला.

“नमस्कार, साहेब...”

“बोला, भाऊसाहेब. कसं चाल्लं तुमचं ऑफिस?”

“बरं चाल्लं, साहेब. आज रविवारचे घरीच असाल न?”

“हो, काय विशेष?”

“काय विशेष आसीन साहेब. खूप दिवस झाले, तो पाटील पैसेच देत नही.”

“मंग...? काय करायचं सांगा?”

“दुपारी जेवण झाल्यावर जाऊ त्याच्याकडे.”

“फोनवर त तो पैसे द्याचं हावच म्हणतो; पण काही देत नाही.”

“बरं, ठीक हाये. जाऊ दुपारी.”

सरूने सखाराम आणि भोळेचं बोलणं ऐकलं. इतक्या सकाळी त्याचा फोन आला म्हणजे यांनीच काही रिकामे कामं केले असतील, असं ती काय समजायचं ते समजून तिने सखारामला विचारलं,

“त्याचे पैसे घेतले हाये का त्या पाटीलनं?”

सांगून काही फायदा नाही, असं त्याला वाटलं; म्हणून सखारामनं तिच्या बोलण्याकडे दुर्लक्ष केलं. तिने मात्र डोळे ताणून त्याच्याकडे

पाहिलं. तेव्हा 'माणसं अशीच असतात. बायकांना विचारात घेतच नाही.' ती मनाशीच पुटपुटली. बोलायचं होतं खूप काही; पण ती बोलली नाही.

दुपारी चार वाजता भोळे टू-व्हीलर घेऊन सखारामकडे आला होता. त्याने फोन करून सांगितल्याप्रमाणे तो तयार होऊन बसला होता. भोळे आल्यानंतर गाडी वळवून रस्त्यावर उभा राहिला. सखाराम त्याच्यामागे बसला. दोघेही संकेतकडे गेले. त्यांना अचानक आलेलं पाहून त्याला आश्चर्य वाटलं होतं. तो त्यांच्या येण्याचा हेतू समजून चुकला होता. नाईलाजाने संकेतने त्या दोघांचं स्वागत करत म्हटलं,

"याsss, साहेबsss. बसाsss."

टेबलासमोर ठेवलेल्या खुर्च्यांकडे हात दाखवत वेगळ्याच मूडमध्ये संकेत बोलला. दोघेही बसले; पण काय बोलावं? विषय कसा काढावा? थोडा वेळ कोणालाच काही सुचलं नव्हतं. संकेत उगीच टेबलावरील रजिस्टर पाहण्याचं नाटक करत होता. मग सखारामच बोलला.

"पाटील, भोळेचे पैसे देऊन टाका. "

"हो, साहेब. या आठवड्यात माझं कर्ज पास झालं की पहिले यांचे पैसे देऊन टाकीन."

"काय सांगता, पाटील. अहो, दोन दिवस, आठ दिवस करता-करता वर्ष होत आलं हाये. नुसते चालवता हाये फक्त," भोळे जरा रागात बोलला.

“खरंच, भाऊसाहेब. तुमचे आणि जाधव साहेबांचे दोघांचेही पैसे देऊन टाकतो. फक्त आठ दिवस थांबा. कर्ज मिळूनच जाईल.”

सखारामने त्याच्या पैशाचा विषय काढण्यापूर्वीच संकेतनं आधीच सांगून मोकळा झाला. त्यामुळे सखारामला पुढे बोलता आलं नव्हतं. संकेतने त्याच्या एका कामगाराला बोलावलं आणि समोर बसलेल्या त्या दोघांना विचारलं,

“काय मागवू, साहेब? थोडी-थोडी मारू आणि बाहेर जेवायला जाऊ.”

“काही नको, पाटील. पैशांची व्यवस्था करा. खूप झालं आता,” सखारामने सांगितलं.

“पैसे त देईनच हो. आलेच हाये त पार्टी करून जा,” संकेत म्हणाला.

“पार्टी काही पचणार हो. कुठी चार आण्याची कोंबडी आणि बारा आण्याचा मसाला करता,” भोळे म्हणाला.

त्या दोघांचं बोलणं संकेत फारसं मनावर घेत नव्हता. “आलोच मी,” असं म्हणून तो स्वतः जागेवरून उठला आणि बाहेर जाऊन नेहमीचा ब्रँड आणला. त्या दोघांची इच्छा नसतानाही हो-नाही म्हणता संकेतने दोघांना पार्टी दिली.

सखाराम आणि भोळे खाली हात गेले तसेच परत आले. येताना त्यांनी मसाले पान खाऊन तोंड रंगवलं आणि घरी जेवण न करता तसेच झोपून गेले.

*** *** ***

त्या दिवशी रोहणला त्यांच्या सहजीवनाबद्दल शंका वाटू लागली होती. 'सुरुची अशीच प्रत्येक गोष्टीत विरोधी भूमिका घेत राहिली, तर एकत्र संसार करणं कठीण होईल,' हा विचार त्याच्या मनात सतत घोळत होता. त्यामुळे त्याचं कामात लक्ष लागत नव्हतं. शेवटी त्याने अर्धा दिवस रजा घेऊन दुपारी घरी आला, तेव्हा सुरुची ऑफिसला जाण्याची तयारी करत होती.

"चहा ठेवशील का जरा? कसं तरीच वाटतं आज." त्याने अस्वस्थ होऊन सांगितले.

"अरे, दिसत नाही का तुला? मी तयारी करते आहे. तू चहा कर. तोपर्यंत माझी तयारी होईल. मग मीही थोडा चहा घेऊन जाईन."

"आज फार थकलो गं मी. थोडं रिलॅक्स होतो. तू चहा ठेव, तोपर्यंत---"

"अरे, आता तुझी ड्युटी संपली नं. माझी सुरू होणार. मला जायला उशीर होणार नाही का? तू तुझा चहा करून घे. मी जाते तशीच."

"हे असं असतं बघ तुझं. तू नकारात्मक सवयी सोडायला तयारच नाही."

"अरे, बायकोनेच चहा करायला पाहिजे का? तूदेखील जुन्या सवयी आणि जुनी विचारसरणी सोडून दे."

तिने सांगितलं आणि पर्स घेऊन त्याच्या बोलण्याची वाट न पाहता निघून गेली.

‘जुन्या मर्यादा पाळून आपण मनात कायम भीती ठेवली, आपल्याला मनासारखं कधीच जगता येणार नाही आणि सातत्याने छोटी-छोटी पावलं उचलल्याशिवाय आपण पुढे जाऊन मोठ्या यशाचा पाया घालू शकणार नाही.’ विचार करत ती घाईगडबडीत ऑफिसला पोहोचली, तरी तिला उशीर झालेला होता. तिला पाहून एच.आर. मॅनेजर म्हणाले, “मॅडम, उशीर झाला आज?”

“सॉरी, सर. यापुढे नाही होणार असं.”

“इट्स ओके,” म्हणत मॅनेजरने दुर्लक्ष केलं; पण तिने उशीर झाल्याचं खापर रोहणच्या डोक्यावर फोडलं होतं.

सुरुची सॉफ्टवेअर इंजिनिअर म्हणून पाच जणांच्या टीममध्ये काम करत होती. दुपारी दोन वाजता तिच्या शिफ्टची सुरुवात झाली. टीम लीडने मागील दिवसाच्या कामाचा आढावा घेत त्या दिवसाच्या कामाचं वाटप केलं. अमेरिकन ग्राहकाने सुचवलेल्या नव्या सुविधांसाठी तिला कोड लिहायचा होता. सॉफ्टवेअरमधील त्रुटी दूर करून संध्याकाळी अमेरिकेतील ग्राहकांसोबत होणाऱ्या ऑनलाइन बैठकीत सहभागी व्हायचं होतं.

सुरुची तिच्या कामाला लागली होती; परंतु रोहणच्या वागण्याने तिचा मूड खराब झाला होता. ‘एक साधी गोष्ट होती, चहाची. त्यानेच केली असती तर काय बिघडलं असतं? पण नाही. किचन म्हटलं की नवऱ्याला तेथे काम नकोच वाटतं.’ ती सतत त्याच्या वागण्या-बोलण्याचा विचार करत असल्याने तिच्या कामात चुका होत गेल्या.

रोहणसोबत सकाळी झालेला वाद सुरुचीच्या मनातून काही केल्या जात नव्हता. संगणकावर काम करत असताना तिच्या डोळ्यांसमोर वारंवार रोहणचाच चेहरा येत होता. नवीन फीचर विकसित करण्याच्या घाईत काही मिनिटांतच संगणकाच्या पडद्यावर लाल रंगाची सूचना झळकली. तिने सबमिट केलेल्या कोडमुळे स्वयंचलित चाचणी अयशस्वी ठरली होती आणि त्याचा परिणाम दुसऱ्या मॉड्यूलवर झाला होता. टीम लीड आपल्या जागेवरून उठला आणि तिच्या डेस्कजवळ येऊन म्हणाला,

“सुरुची, दोन मिनिटं.”

त्याचा आवाज ऐकून ती दचकली. तो पुन्हा म्हणाला,

“हा बदल सबमिट करण्यापूर्वी टेस्ट केला होता का? तुझ्या या बदलामुळे दुसऱ्या मॉड्यूलच्या टेस्ट्स फेल झाल्या आहेत.”

सुरुचीने पटकन स्क्रीनकडे पाहिलं, तेव्हा तिची चूक तिच्या लक्षात आली. तेव्हा ती फक्त,

“सॉरी सर, कसं झालं काही कळलंच नाही,” ती म्हणाली.

“सुरुची, आज तुझं लक्ष कामात नाही, असं दिसतंय. काही प्रॉब्लेम आहे का?”

“तसं काही नाही सर; पण मला काय होतंय तेच कळत नाही. मी माझं काम व्यवस्थित करते; पण काही तरीच वेगळं वाटतं.”

“तुझी तब्येत ठीक नसेल. मग असं कर, एक चूक झाली की बाकी चुका वाढत जातात. त्यापेक्षा आज इथंच थांब. टेन्शनमध्ये काम

केलंस, तर आणखी चुका होऊ शकतात; म्हणून घरी जा, आराम कर. उद्या नव्याने सुरुवात करू."

"ओके सर-----" तिने हातातील काम बाजूला ठेवलं आणि ती रात्री अकरानंतर घरी यायची, ती सात वाजताच घरी आली होती.

दारावरची बेल वाजली. रोहणने दरवाजा उघडला, तर समोर सुरुचीला पाहताच त्याने आश्चर्याने विचारलं...

"आंsss! आज कशी काय इतक्या लवकर?"

"तू आला, तशी मी आली; पण तुझ्यामुळेच सगळा प्रॉब्लेम निर्माण झाला आणि मला घरी यावं लागलं."

"ठीक आहे. आधी आत ये. फ्रेश हो. मग सांग, तुला काय सांगायचं ते." तो बाजूला झाला.

ती आत गेली आणि बेडरूममध्ये जाऊन कपडे चेंज करून फ्रेश झाली. काय करावं, तिला काही सुचत नव्हतं. ती पुन्हा बेडरूममध्ये जाऊन आरशासमोर केस ठीकठाक करत होती. रोहण तिच्यामागे उभा होता. त्याने विचारले,

"काय झालं? काही सांगितलं नाही?"

"अलीकडे तू काही चांगला राहत नाही. आज तुझ्यामुळे सगळं काम बिघडलं."

"मी काय केलं असं? प्रॉब्लेम तुझा आणि माझ्यावर का ब्लेम करतेस?"

"मग काय करू? तू ऐकत का नाही?"

“काय ऐकू मी? तुला चहा करून देऊ? तुझ्यासाठी स्वयंपाक करून देऊ की तुझे कपडे धुऊ?”

“असं थोडी सांगितलं होतं मी तुला.”

“सांगितलं नाही; पण तू कधी सकारात्मक पाऊल उचलत नाही.”

“म्हणजे काय करायला हवं मी?” त्याने विचारले.

“काहीच करू नको. एक लक्षात ठेव, स्वतः बदलल्याशिवाय नव्या आयुष्याची अपेक्षा करणं व्यर्थ आहे.”

“छान! तू बदलू काही नको. फक्त माझ्याकडून तशी अपेक्षा कर.”

“तूच लग्नाच्या आधी मोठी-मोठी स्वप्नं दाखवली होती. माझ्या मनात अपेक्षांचा डोंगर उभा केला होता, पण लक्षात ठेव, मोठी स्वप्नं प्रेरणा देतात; पण ती प्रत्यक्षात उतरवण्याचं काम आपल्या रोजच्या छोट्या कृती करत असतात. हे विसरून गेला तू.”

“तू का समजून घेत नाही. अगं, आपलं भविष्य मोठ्या ध्येयांनी नव्हे, तर रोजच्या छोट्या-छोट्या सवयींनी घडत असतं. तुझ्या सवयी मला त्रासदायक वाटतात; म्हणून तुला मी सांगतो की, आपण मस्त लाईफ जगू.”

“आपण जर एकमेकांवर प्रेम केलं आहे, तर सिच्युएशन समजून घेतली पाहिजे. कारण परिस्थिती नेहमी आपल्या मनासारखी नसेल; पण त्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन मात्र आपल्या हातात असतो.”

“जाऊ दे गं. तू तुझ्या मर्जीने राहा. योग्य वेळेची वाट पाहत राहणं म्हणजे स्वतःलाच थांबवून ठेवणं आहे; पण मी थांबणार नाही.”

“नको थांबू..., आपण दोघे वेगवेगळ्या रस्त्याने जाऊ.”

तिच्या बोलण्याने त्याला एकदम शॉकच लागला. तो पुढे काही बोलला नाही. मात्र एक गोष्ट त्याच्या लक्षात आल्यानंतर त्याने विचारले,

“तुझ्या भूमीत माझं बीज रुजलं आहे. त्याचं काय?”

“तो माझा प्रश्न आहे. त्याचं काय करायचं, तो निर्णय मी घेईन.” सुरूचीने स्पष्टपणे सांगितले.

“ते शक्य नाही होणार. माझाही हक्क आहे त्यावर---”

“माझा अपमान करून तो हक्क गमावला आहेस तू.”

“असा कोणता अपमान केला आहे मी?”

“तू मला सोडून डायरेक्ट फॅमिलीची नावं का घेतलीस? म्हणे, बापाचं नाव सखाराम, आईचं नाव सरू, भाऊ सुमेध आणि तू सुरूची. म्हणे, सर्वांची पहिली अक्षरं ‘एस’ने सुरू होतात. ‘एस’ म्हणजे ‘सकारात्मकता’; पण ‘नकार’ ठासून भरला आहे म्हणे.”

“गंमत केली गं बाई मी---” स्वतःचं समर्थन करत तो हसला.

“अशी कुठे गंमत असते का? कोणतीही गंमत कर; पण बापाचं नाव घ्यायचं नाही.” सुरूची त्याला ताकीद दिल्यासारखी बोलली आणि तिच्या कामाला लागली. थोडा वेळ रूममध्ये शांतता पसरली. कोणीच कोणाशी बोलत नव्हतं.

“आपण सालं कथा-कादंबऱ्या वाचून जरा गमती-जमती करतो, तर त्याचे वेगळेच अर्थ काढले गेले. कदाचित फॅमिलीचा इश्यू असल्याने

तिला वाईट वाटलं असेल.” रोहणच्या मनात आलं आणि त्याने स्वतःची चूक दुरुस्त करत म्हटलं,

“सॉरी यार, चूक झाली.” रोहणने माघार घेतली. ती लॅपटॉपवर दुपारच्या चुका शोधून दुरुस्त करण्यात गुंतली होती. तिला लाडीगोडी तो म्हणाला,

“चल, आपण काहीतरी बनवू. जेवण करून झोपून जाऊ. मला सकाळी जायचं आहे.”

“तू बनव आणि जेवण करून झोप.”

“बनवायचं नसेल, तर बाहेरून मागवू का?”

“मला नाही जेवायचं. तुला काय करायचं ते कर.”

“इतका राग चांगला नसतो. आपण बदलायचं म्हणतो, बदलतो का?” तो म्हणाला.

“फक्त चांगले विचार ऐकून किंवा वाचून आयुष्य बदलत नाही; ते रोजच्या कृतीत उतरवल्यावरच खरा बदल घडतो. पण तुझ्या सवयी सुटत नाहीत, त्याचं काय?” तिने प्रश्न केला.

“अगं, पहिलं पाऊल कोण उचलणार? हाच खरा प्रश्न असतो.”

तिने बोलणं बंद केलं. दोघांचीही रात्र अस्वस्थतेत गेली. कोणीही माघार घ्यायला तयार नव्हतं. फक्त एकमेकांकडून अपेक्षा करत होते. मात्र तडजोड करत नव्हते.

सुमेधच्या एम.बी.ए.चा निकाल लागला होता. त्याचा CGPA 8 होता. म्हणजे त्याला ७२ टक्के गुण मिळाले होते. त्याने सखाराम आणि शिरोळे साहेब यांच्या व्हॉट्सॲपवर मार्कशीट पाठवली होती.

रात्री जेवण झाल्यावर सखारामने निवांतपणे सुमेधला फोन केला आणि म्हणाला,

“अभिनंदन, बेटा सुमेध!”

“थँक्यू, पप्पा---”

मुलाचं नाव ऐकताच सरूनं सखारामकडे पाहिलं. एरव्ही कामाशिवाय ते दोघं बोलत नाहीत, हे तिला माहीत होतं. त्यामुळे तिच्या चेहऱ्यावर उत्सुकता दिसत होती.

“बरं, आता काय करशील पुढे?” सखारामनं विचारलं.

“सांगतो थोड्याच दिवसात---”

“काय झालं? नोकरी लागली का सुमेधले?” सरूनं सखारामकडे पाहत विचारलं. सखारामने हात दाखवून तिला थांबायला सांगितलं.

“प्रयत्न चालू ठेव. लागल्यास शिरोळे काकांना भेट. ते लावून देतील एखाद्या कंपनीत.”

“हो, पप्पा---”

“मी फोन करू का त्यांना?”

“नको, मी भेटीन त्यांना.”

“ठीक हाये. कळव तसं.”

“त्याला म्हणा, घरी त ये. का तिकडेच राहातो, म्हणा?” सरू मध्येच बोलली.

तेवढ्यात सखारामनं फोन कट केला. सरू पुन्हा बोलली,

“पूर्ण गोष्टबी आयकत नाही आपली.”

तिच्या बोलण्यात काहीसा राग होता. सखाराम शांतपणे म्हणाला,

“काय ऐकू, सांग. मुलांना घरी बोलावून त्याह्यले इकडेतिकडे बेकार फिर्याले लावू?”

“तुमी त बस, काव्हाबी उलटाच इचार करता. किती दिवस झाले. पोरं घरी आली नाही.”

“तसं नाही गं. घरी रिकामे असण्यापेक्षा शहरात नोकरी तरी पाहातीन.”

“काही दिवस राहातीन नं, जातीन परत. मी का म्हन्ते, आढीच ठेवा.”

“पोरीचं काय चाल्लं? काही सांगितलं का तिनं?”

“तुह्या राग गेला आशीन, त कर तिले फोन.”

“तुम्ही केला त काय बिघडीन? मी फोन केला त उचलत नही ती.”

“तुले घाबरत आशीन ते.”

“तुम्ही करा फोन आन् इचारा. ख्यालीखुशाली. सुमेधचं काय झालं, तेबी सांगलं नाही?”

“पास झाला तो. चांगले मार्क्स मिळाले त्याला. दुपारीच त्याने मार्कशीट पाठवली होती.”

“बरं झालं. एक ताण गेला. आता नवकरी पाह्य म्हणा.”

“आता तू त्याले घरी बोलवलं, त तो घरी बसून कशी काय नवकरी पाहीन?”

“आपण काही म्हणालं की लागेच आडवं बोलणं सुचतं.”

“तुच त म्हन्ते, ‘घरी बोलवा’ म्हणून?”

“मी म्हणलं आन् लगेच बोलावलं का तुमी?”

“बस कर न आता. पोरगं पास झालं, त्याचा आनंद घे.”

“त्या दोघायले बोलावून घ्या. सांगा, ‘मस्त पार्टी करू’ म्हणा.”

“तू देशीन का पार्टी?” सखाराम हसला आणि म्हणाला,

“मह्या का पगार येतो का? त्याह्यचा बाप नही का बिल द्याले?”

‘तोफेच्या तोंडी उभं असणं किंवा बसणं म्हणजे वाटोळंच हाये,’ असा विचार करून सखारामनं सरूशी बोलणं बंद केलं आणि मोबाईल हातात घेऊन सुरूचीला फोन लावला. स्क्रीनवर ‘पप्पा’ शब्द पाहताच तिला आश्चर्य वाटलं. तिने फोन घेतला.

“पप्पा---”

“कशी हाये बेटा?”

“मी कामात आहे. करते फोन थोड्या वेळाने, अकरा नंतर.”

“बरं, ठीक हाये---”

“हाय न! बापाशीबी बोलत नही ते. कश्याले फोन करीन ते? एक त तिकडच्या तिकडे लग्न केलं. माय-बापाले इचरलंबी नही.”

“तू आशी निगेटिव इचर करत नको जाऊ. कामात आशीन ते.”

“इतक्या राती काय कामं आसता?”

“तुझ्यासारखी घरी राहून भाकरी थापत नही ते. कंपनीत नवकरी करते.”

“आंऽऽऽ! नवकरी करते आन सांगलंबी नही तुमी?”

“तू आशी जवळ येऊन बोलतेच कुठी. तुह्याच त तालात राहाते.”

“मंग का भूत बोलतं का तुमच्याशी? आता कोण बोलून राह्यलं मंग?”

सखाराम पुढे काही बोलला नव्हता. सारखा घड्याळाकडे पाहत होता. काटे हळूहळू पुढे सरकत होते. तिच्या फोनची वाट पाहत होता.

*** *** ***

रोहणसोबतच्या तणावाचा परिणाम मागे तिच्या कामावर झाला होता. सर्व मॉड्यूल्स वापरत असलेल्या सामायिक उपयुक्त कोडमध्ये तिच्याकडून चूक झाली होती. दुसऱ्या दिवशी ती चूक दुरुस्त करून टीम लीडकडून रिव्ह्यू करून घेतला होता. तो बरोबर आल्यानंतर तिचा जीव भांड्यात पडला होता. तेव्हाच तिने मनाशी पक्कं ठरवलं होतं की, 'काहीही झालं तरी वैयक्तिक आयुष्याचा परिणाम कामावर होऊ द्यायचा नाही.' त्यामुळे काम सुरू असताना वडिलांचा फोन आला, तेव्हा तिने 'नंतर बोलते' म्हणून सांगितलं होतं. कारण काम पूर्ण झाल्यावरच त्यांच्याशी बोलायचं, हा तिचा हेतू होता. ती फोन करेल, याबद्दल सखारामलाही शंका नव्हती; म्हणून त्यानं तिचं ऐकून घेतलं होतं.

सव्वा अकरा वाजता मोबाईलची रिंग वाजली. सखारामनं घाईघाईनं फोन उचलला, तर भोळेचा कॉल आलेला दिसला. सखाराम हिरमुसला आणि मनातल्या मनात, 'या मूर्खाला आता काय आठवण झाली एवढी?' म्हणून भोळेला एक शिवीही दिली. नाईलाजाने त्याचा कॉल घेऊन विचारलं,

"बोल, काय म्हणतो?"

"मी आणि पाटील दोघे बसलो होतो ढाब्यावर."

"मंग काय झालं?"

"साला... पहिलेच पैसे देत नाही, उलट आणखी पैसे मागत होता."

"बरं, ठीक हाये. आपण बोलू उद्या... एक अर्जंट कॉल येतो आहे---"

सखाराम बोलत असतानाच सुरूचीचं नाव स्क्रीनवर दिसत होतं. त्यामुळे त्याने भोळेचा फोन कट केला होता. तोपर्यंत तिचा कॉल कट झाला होता. लगेच सखारामनं तिला फोन लावला.

“हां बेटा, कशी हाये? इतक्या रात्री काय करते एवढं काम?”

काय बोलावं, तिला क्षणभर काही समजलंच नव्हतं. ती स्तब्ध झाली होती. त्यामुळे सखाराम पुन्हा बोलला,

“काय झालं बेटा? रेंजचा प्रॉब्लेम हाये का?”

“नाही पप्पा. बोला नं, काय म्हणता? तुम्ही कसे आहात? आई कशी आहे?”

“आम्ही चांगले हाये. तू सांग. कशी हाये? इतक्या उशिरापर्यंत जागायचं नाही. लवकर झोपायचं न लवकर उठायचं.”

“माझी शिफ्ट दुपारी दोन ते रात्री अकरापर्यंत असते नं, म्हणून उशीर होतो.”

“पण अशी ड्युटी नही कऱ्याची, बेटा. तुह्या आईशी बोलते का?”

“हो, द्या फोन.”

“बोल---” सखारामनं फोन सरूकडे दिला. तिनेही आतुरतेने पटकन घेतला.

मायलेकीच्या कानाला त्यांचे फोन होते; पण काही वेळ कोणीच कोणाशी बोलत नव्हत्या. सरूचे डोळे भरून आले होते आणि तिकडे सुरूचीला गहिवरून आलं होतं. काय बोलावं? सुरुवात काय करावी?, ते दोघींनाही सुचत नव्हतं. मग सखाराम सरूला म्हणाला,

“अगं, बोलशीन की नही? नाहीतन फोन कट होईन---”

“रुची बेटा, बरी हाये नं तू?”

सुरूचीच्या घशात हुंदका दाटून आला. बोलण्यासाठी तिने ओठ उघडले; पण शब्द बाहेर पडले नव्हते. फक्त तिचा विस्कळीत श्वास आणि दाबलेले हुंदके सरूच्या कानावर पडत होते.

“नको रडू. आम्ही काही तूहे दुस्मन नही. ये घरी. वर्ष झालं, तूही भेट नाही.”

“हां आई, नक्की येईल.” ती कशीतरी म्हणाली. दोघींना फार काही बोलता आलं नव्हतं. शेवटी फोन बंद झाले. सरू व सखाराम काही वेळ विचार करत बसले होते.

*** *** ***

सुमेधचे कॅम्पस सिलेक्शन होऊन दोन महिने झाले होते, तरी नोकरी काही हाती लागली नव्हती. त्यामुळे त्याची अस्वस्थता वाढत गेली होती. ‘काय झालं असेल? काय होईल? शिरोळे काका जवळचे असले तरी त्यांचा स्वभाव वेगळाच आहे.’ तो विचारांच्या दरीत अडकला होता. कंपनीच्या ऑफर लेटरची वाट पाहता-पाहता एकेक दिवस सरत होते. नोकरीसाठी आतुर झाल्याने त्याला काहीच सुचत नव्हतं. अशातच त्याला आठवलं होतं की, ‘शिरोळे काकांसोबत त्या कॅम्पस इंटरव्ह्यूच्या वेळी एच.आर. काळे साहेब आणि विभागप्रमुख जोशी सर पॅनेलवर होते. मुलाखती संपल्यानंतर त्यांच्यासोबत काकांनी कॉफीसाठी बोलावलं होतं. तेव्हा ते चांगले वाटले. मग

एच.आर. काळे साहेबांना फोन करून विचारलं तर? पण नको. काकांना कळलं तर त्यांना काय वाटेल?' त्याच्या मनात नुसते प्रश्नच फिरत होते. मार्ग सापडत नव्हता. मात्र त्याच्या बॅचमधील एका उमेदवाराला ऑफर लेटर मिळाल्याची बातमी त्याला नुकतीच समजली होती. त्यामुळे त्याची बेचैनी आणखी वाढली होती; म्हणून त्याने शिरोळे यांना फोन केला,

"गुड मॉर्निंग, काका---"

"हं! बोल सुमेध, कसा आहेस?"

"ठीक आहे काका. तुम्हाला भेटायचं होतं."

"बरं, आज जरा मी कंपनीच्या मिटिंग आणि काही कामात आहे. असं कर, उद्या दीड वाजता ये. मग मी तुला ऑफिसलाच भेटू शकतो."

"ओके काका. उद्या येतो मी."

"चालेल---" शिरोळे साहेबांनी दुजोरा दिला.

दोघांचं बोलणं संपलं; पण आता त्याच्या मनात प्रश्न अधिकच गडद झाले होते. 'उद्या शिरोळे काका काय सांगतील? नक्की काय झालं असेल?' याचाच तो विचार करू लागला होता; पण त्याला काही अंदाज येत नव्हता. त्या विचारात तो दुपारी जेवलाही नव्हता. टू-व्हीलर घेऊन तो सारसबागेत गेला. जाताना थोडासा नाश्ता करून एका ठिकाणी एकांतात बसून कंपनीचा ई-मेल आला आहे का, हे वारंवार पाहत राहिला; पण 'खानदेश इंडस्ट्रीज'चं नाव स्क्रीनवर दिसत नव्हतं. त्याला आतून काहीतरी पोखरल्यासारखं वाटत होतं.

रात्री झोपताना कानात हेडफोन लावून मोटिव्हेशनल स्पीच ऐकत राहिला. कानात आवाज आणि डोक्यात विचार सुरू होते. सकाळ केव्हा होते आणि दुपारी शिरोळे काकांकडे केव्हा पोहोचतो, असं त्याला झालं होतं. 'वेळ तर काही थांबत नाही; निघून जाते, तशी येतेही,' अशी मनाची समजूत घालून तो थोडा शांत पडून राहिला.

सुमेध दुसऱ्या दिवशी ठरल्याप्रमाणे वेळेवर पोहोचला होता. शिरोळे साहेब त्यांच्या ऑफिसमध्ये बसले होते. दरवाजातूनच सुमेधने विचारले,

"आत येऊ काका?"

"अरे, ये सुमेध. जेवण करून आलास ना, की बाकी आहे?"

"नाही काका, येतानाच थोडं खाऊन आलो."

"बरं, बोल. काय म्हणतो?"

"काका, जुलैमध्ये आपल्या कंपनीनं माझं कॅम्पस सिलेक्शन केलं. आता सप्टेंबर महिना आला; पण अजून आपल्या कंपनीचं ऑफर लेटर मिळालं नाही."

"त्याचं काय आहे सुमेध, उद्योगक्षेत्रात कॅम्पस सिलेक्शन झाल्यानंतर ऑफर लेटर उशिरा येण्याची अनेक वैध कारणं असतात. त्यामुळे ऑफर लेटर काही आठवडे किंवा महिने पुढे ढकललं जातं."

"त्याचं काही एवढं टेन्शन येत नाही काका. नोकरी जेव्हा मिळायची तेव्हा मिळेल; पण—"

शिरोळे साहेबांनी त्याचं बोलणं पूर्ण होण्याच्या आधीच म्हटलं,

“अरे, तू एवढा हुशार, समजदार मुलगा आणि उगीच कशाला ताण घेतो? तुला निक व्हुजिसिक यांची गोष्ट माहीत आहे का?”

“हो काका ---” सुमेध म्हणाला.

“पाहा ना, किती कमालीची गोष्ट आहे. ‘त्यांना हात-पाय नव्हते; तरी त्यांनी आयुष्य जिंकलं. आपल्याला तर फक्त थोडी प्रतीक्षा करायची आहे.” शिरोळे यांनी सुमेधला समजावून सांगितलं.

“हो काका, त्यांची गोष्ट फार प्रेरणादायी आहे.”

“म्हणजे एक गोष्ट लक्षात ठेव. परिस्थितीमुळे आपली ओळख ठरत नाही; तर तुमचा दृष्टिकोन, जिद्द आणि चिकाटीमुळे तुमचं भविष्य घडतं. तेव्हाच तुमची ओळख निर्माण होते.”

शिरोळे याचं धीर देणारं बोलणं ऐकून सुमेधने व्यावहारिक जगण्याचा आणि घरच्या परिस्थितीचा विचार केला आणि म्हणाला,

“हो काका, ते ठीकच आहे; मला ताण येतो, तो पप्पांचा.”

“अरे, मुलाने कुठे बापाचा ताण घ्यायचा असतो का? ताण घेणं बापाचं काम असतं.”

“काका, तसं नाही म्हणत मी.”

“मग...? कसं तर...?”

“त्याचं काय आहे काका, पप्पांना रिटायर्ड व्हायला काही महिनेच बाकी आहेत. त्याआधी कुठे काही जॉब मिळाला तर त्यांना बरं वाटेल. नाहीतर ते आधीच तुटलेले आहेत. पुन्हा कोलमडून जातील...” सुमेध भावूक झाला होता.

शिरोळे साहेब क्षणभर विचारात पडले. सखारामची प्रतिमा त्यांच्या डोळ्यासमोर उभी राहिली. सुमेधचं सर्व बोलणं त्यांनी समजून घेतलं. त्या दोघांमध्ये थोडी शांतता पसरली. सुमेध विचारात पडला.

शिरोळे यांनी हळूच इंटरकॉमचा फोन हातात घेतला आणि एच.आर. काळे यांना, "दोन मिनिटं वेळ असेल, तर जरा माझ्या केबिनमध्ये या," म्हणून सांगितलं.

थोड्याच वेळात काळे आले. त्यांनी विचारलं,

"काय म्हणता, सर?"

"हा सुमेध जाधव... गेल्या कॅम्पस ड्राइव्हमधला उमेदवार आहे."

"हो सर, ओळखलं. त्या दिवशी आपण परत येताना सोबतच कॉफी घेतली होती."

"हे बघा काळे, कॅम्पस सिलेक्शनची फाईल जरा पाहा आणि ऑफर लेटरची प्रक्रिया नेमकी कुठपर्यंत आली आहे, ते सांगा."

"ओके सर, आलोच एका मिनिटात." होकार देऊन काळे परत गेले आणि त्यांच्या टेबलवरील लॅपटॉप घेऊन लगेच परत आले. शिरोळे साहेबांसमोर बसून सुमेधच्या भरतीची स्थिती तपासली आणि म्हणाले,

"सर, यांची निवड झालेली आहे; परंतु ऑफर ऑर्डर अजून रिलीज झालेली नाही."

"काय प्रॉब्लेम आहे? कारण काय आहे?" शिरोळे साहेबांनी विचारलं.

“सर, सुमेधचं काही वेगळं नाही. या बॅचमधल्या काही निवड झालेल्या उमेदवारांची ऑफर लेटर्स अजून पाठवली गेलेली नाहीत. कंपनीची प्रक्रिया पूर्ण झाली की ती पाठवली जातील.”

काळेंनी खुलासा केला. प्रक्रियेचा एक भाग म्हणून उमेदवारांना ऑफर लेटर पाठविण्यास उशीर झाल्याचं शिरोळे साहेबांच्या लक्षात आलं. तेव्हा ते म्हणाले,

“ठीक आहे. या बॅचच्या ऑफर लेटर्सची प्रक्रिया नेमकी कुठे थांबली आहे, ते तपासा आणि ज्या उमेदवारांची प्रक्रिया पूर्ण झाली आहे, त्यांची ऑफर लेटर्स आता पाठवण्याची प्रक्रिया सुरू करा.”

“हो सर.” म्हणत काळे बाहेर गेले. नंतर शिरोळे यांनी सुमेधला सांगितलं,

“तुझी निवड रद्द झालेली नाही. थोडा प्रक्रियेचा विलंब आहे. येईल तुला कंपनीचं पत्र. थोडी वाट पाहा. काही टेन्शन घ्यायचं नाही.”

“धन्यवाद काका. आता बरं वाटतंय.”

सुमेध उठला आणि माघारी वळला. शिरोळे साहेब त्याच्याकडे पाहतच राहिले होते. ‘बालपणीचा त्यांचा मित्र सखाराम असाच गरीब होता; पण मनाने फार श्रीमंत होता. त्याच्या श्रीमंतीने आपलं आयुष्य उजळून निघालं,’ याची जाणीव शिरोळे साहेबांना झाली होती.

*** *** ***

दारावरची बेल वाजली. रोहणने घड्याळाकडे पाहिलं. रात्रीचे साडेअकरा वाजले होते. सुरूची आली असेल, म्हणून त्यानं उत्साहानं

दार उघडलं. पाहिलं तर त्याचा मित्र हेमंत होता. तो आत आला. त्याने हातातील बॅग टीपॉयवर ठेवली. दोघेही सोफ्यावर बसले. रोहणकडे पाहून हेमंतनं विचारलं,

"अरे, असा उदास का दिसतोस?"

"छे! कुठं काय? काहीच नाही."

"उदास मन कितीही लपवून ठेवलं, तरी चेहऱ्यावर ते दिसतंच."

"नाही रे, तसं काही नाही. होतं कधी कधी."

"सांगायचं नसेल, तर नको सांगू. आज तुझ्या लग्नाचा पहिला वाढदिवस आहे. म्हटलं, चला, तू बोलवायला विसरला असशील, म्हणून जाऊन तुला शुभेच्छा देऊ."

"थँक्स..." रोहण बोलला; पण त्याच्या शब्दांत आनंद नव्हता.

"सोबत स्कॉच आणि वाईनही आणली आहे. जेवणाची काय ऑर्डर द्यायची, ते सुरूची आल्यावर बघू." हेमंत म्हणाला.

रोहण फारसा बोलत नव्हता. तो अधूनमधून सारखा घड्याळाकडे पाहत होता. काही वेळाने दारावरची बेल वाजली. रोहणने दार उघडलं. सुरूची आलेली पाहून तो जरा खुलला होता.

"वेलकम डार्लिंग, लवकर फ्रेश हो आणि ये..."

ती आत आल्यावर तिचं लक्ष हेमंतकडे गेलं. तिने विचारलं,

"अरे सर, तुम्ही! इतक्या रात्री?"

"आमचा हा एकुलता एक येडपट मित्र. दुपारी येताना सांगत होता, 'उद्याचा तुमच्या लग्नाचा वाढदिवस रात्री बारा वाजता साजरा करणार आहे.' म्हणून मी त्याला सरप्राईज द्यायला आलो."

"छान! स्वागत आहे तुमचं. येते मी. तुम्ही करा एन्जॉय." असं म्हणून ती बेडरूममध्ये गेली. जाताना रोहण म्हणाला,

"सुरू, लवकर ये. पहिले केक कापू."

"बघा मॅडम, आतापर्यंत कोमेजला होता. तुम्ही आल्यावर बघा, कसा फुलला."

तिने दोघांच्या बोलण्याकडे लक्ष दिलं नव्हतं. वेगळ्याच विचारात ती त्यांच्या समोरून बेडरूममध्ये गेली आणि फ्रेश झाल्यानंतर लॅपटॉप सुरू करून तिच्या कामाला लागली.

रोहण आणि हेमंत दोघे हॉलमधून किचनमध्ये गेले. हेमंतने आणलेलं पार्सल आणि ग्लास टेबलवर ठेवले. शेजारी तिच्या नावाच्या केकचं पॅकबंद पार्सल होतं. रोहण त्या बेडरूममध्ये जाऊन तिला म्हणाला,

"चल, आपण केक कापू आणि मस्त पार्टी करू."

"नको यार, आता फार उशीर झाला. उद्या संडे आहे. उद्या करू सेलिब्रेशन."

"अगं, तो मित्र आला आहे. त्याला काय वाटेल?"

"अरे, मला एक नवीन फीचर तयार करण्याचं काम टीम लीडनं दिलं आहे."

"असू दे. उद्या सुटी आहे. आपण करू ते."

"नको. तू जा. तुम्ही तुमचा एन्जॉय करा. मी येते थोड्या वेळाने."
"पण केक तरी कापून घे."
"ते राहू दे. फ्रीजमध्ये ठेव. उद्या बघू. तू चालू दे पार्टी. मी आलीच."
'तिला कसं सांगावं, बोलावं', ते रोहणला कळत नव्हतं. शेवटी अधिक हट्ट न धरता तो म्हणाला,
"ठीक आहे. तू ये. आम्ही सुरू करतो आमचा प्रोग्राम. बाहेरून जेवण मागवतो. तू काय घेशील? सोबत जेवण करू." रोहणनं विचारलं.
"मी येतानाच कॅन्टीनला जेवण करून आली आहे. तुम्ही तुमचं चालू द्या."
"ओके..." त्याने असं म्हटलं असलं, तरी तो नाराज होऊन किचनमध्ये परत आला.
हेमंतने त्याच्याकडे पाहिलं. पहिल्यापेक्षा तो अधिक उदास दिसत होता. 'उगीच आल्याची रुखरुख त्याला वाटत होती'; पण तो काही बोलला नव्हता. रोहणच म्हणाला,
"चल, आपण सुरू करू. ती कामात आहे. काय मागवायचं, ते मागव. बऱ्याच दिवसांनी आला आहेस."
"असू दे. त्यांना त्यांचं काम करू दे. आपण थोडी-थोडी मारू, मग निघतो मी. त्यांना डिस्टर्ब नको. बघू, नंतर करू गेट-टुगेदर." हेमंत काय समजायचं ते समजला.
सुरूची एक औपचारिकता म्हणून थोड्या वेळाने आली आणि म्हणाली,

"सर, वाईट वाटून घेऊ नका. खरंच मी जरा खूप कामात आहे. मला उद्यापर्यंत नवीन फीचर तयार करून सोमवारी टीम लीडला दाखवायचं आहे."
"तसं काही नाही. तुम्ही चालू द्या तुमचं काम." हेमंतनं सांगितलं.
ती पुढे काही न बोलता तिच्या बेडरूममध्ये निघून गेली. रोहणला फार वाईट वाटलं होतं; पण तो काहीच बोलला नव्हता. हेमंतने परिस्थिती लक्षात घेऊन दोन पेग मारले आणि रोहणला म्हटलं,
"मित्रा, तुम्ही दोघं जेवण करून घ्या. मी निघतो."
तो उठला आणि त्याच्या बोलण्याची वाट न पाहता तेथून बाहेर पडला. तेव्हा रात्रीचा दीड वाजला होता.
हेमंत गेल्यावर रोहणनं किचनमधला पसारा आवरला आणि तिच्याकडे गेला. सकाळी सुट्टी असल्याने ती लॅपटॉपवर काम करत होती. तो रागाने बोलला,
"सुरू, काही कॉमन सेन्स आहे की नाही तुला? मित्र शुभेच्छा द्यायला आला आणि तू अशी परक्यासारखी वागलीस?"
ती काहीच बोलली नव्हती. त्याचा पारा चढला होता. पुन्हा तो म्हणाला,
"इतका मूर्खपणा करायची काय गरज होती? त्या मित्राला काय वाटेल?"
त्याचं बोलणं तिला आवडलं नसल्याने ती उलटून बोलली,
"डोकं ठिकाणावर ठेव जरा. दुपारी त्याला आपली ॲनिव्हर्सरी असल्याचं सांगितलं. मला सांगितलं असतं, तर तुझं काय बिघडलं असतं?"

"तुला काय तेवढंही माहीत नाही का? एवढी शार्प असूनही साधी लग्नाची तारीख लक्षात नाही?"

"कामात विसरून गेले असेन. आणि लक्षात ठेवून काय त्याचा बोनस मिळणार होता काय?"

"इतकं काम करून कंपनी तुला काय देणार आहे?"

"कंपनी प्रमोशन नक्की देते, हे माहीत नाही का तुला?"

"माणसांपेक्षा तुला प्रमोशन महत्त्वाचं वाटतं का? काही अक्कल तर ठेव ठिकाणावर. इतक्या तोऱ्यात राहून काय मिळणार आहे?"

"माणसं परत गेली, तर पुन्हा येऊ शकतात; पण प्रमोशनची संधी पुनःपुन्हा येत नाही. जास्त झाली आहे तुला. जा, झोप तू."

ती समजून घ्यायला तयार नसल्याने जास्त काही बोलला नव्हता. दुसऱ्या बेडरूममध्ये जाऊन झोपला होता. सुरूची लॅपटॉपवर तिचं काम करत होती. सकाळचे तीन वाजले होते. तो गेल्यावर तिने लॅपटॉप बंद केला आणि डोळे मिटून पलंगावर पडली. मनात अनंत विचारांच्या मुंग्या फिरत होत्या. दोघेही एकमेकांना समजून घेण्याऐवजी स्वतःचं म्हणणंच पुढे रेटून नेत होते. त्यामुळे त्यांनी केक कापला नव्हता, की जेवणही मागवलं नव्हतं. रेल्वे रूळासारखे दोन समांतर मनं लांबत गेलेले दिसत होते.

*** *** ***

सुमेधला मोबाईलच्या स्क्रीनवर खानदेश इंडस्ट्रीजचा ई-मेल आलेला दिसला. त्याने डोळे मिटून एक दीर्घ श्वास घेतला. शिरोळे

साहेबांना भेटला होता, तो दिवस व त्यांच्या केबिनमधील प्रसंग क्षणभर त्याच्या डोळ्यांसमोर तरळून गेला. त्याने मनोमन त्यांचे आभार मानले. मग उत्साहाने ई-मेल ओपन करून वाचला. ऑफर लेटर आलेले होते. त्याने ते बारकाईने वाचले. कंपनीच्या सूचनेप्रमाणे स्वीकृतीपत्रावर स्वाक्षरी करून ते एच.आर. पोर्टलवर अपलोड केले. नंतर त्याने आनंदाने शिरोळे साहेबांना फोन केला. त्यांनी सुमेधचे नाव पाहून फोन घेतला आणि विचारले,

“हं, बोल सुमेध, काय म्हणतो?”

“थँक्यू काका, आत्ताच कंपनीचे ऑफर लेटर मिळाले.”

“छान! ॲक्सेप्टन्स लेटर दिलं ना?”

“हो काका, कंपनीने सांगितल्याप्रमाणे दिलं.”

“गुड! तू संयम राखला, हे फार चांगलं झालं. आता आणखी थोडी वाट पाहा.”

शिरोळे यांच्या या बोलण्याने सुमेधचा वाढलेला उत्साह कमी झाला होता. ‘वाट पाहा म्हणजे किती पाहा?’ हा अनुत्तरित प्रश्न त्याच्या मनात आला आणि त्याने, “हो काका, बरं... ठीक आहे काका.” असं म्हणून फोन बंद केला; पण त्या शेवटच्या वाक्याने त्याला काहीसं बेचैन केलं होतं.

सुमेधला रात्र खूप मोठी वाटू लागली होती. घड्याळाचे काटे हळूहळू सरकत होते. अंधारात बेडवर पडल्या-पडल्या त्याच्या मनावर अनेक प्रश्नांचं ओझं पडलं होतं. ‘शिरोळे काका जवळचे; पण आपण

काही एकटेच नाही. बाकी उमेदवारही आहेत. मग ते तरी काय करतील?' त्यानं पुन्हा डोळे मिटून झोपेचा प्रयत्न केला; पण विचार वाढतच होते.

'येणाऱ्या प्रत्येक दिवसाला किती आणि कसं सामोरं जायचं आणि मार्ग कसे काढायचे?' हा शेवटचा प्रश्न सोबत घेऊन तो झोपला होता. त्याची सकाळही त्याच प्रश्नाने सुरू झाली होती. 'वाट पाहता-पाहताच माणसाची वाट लागते.' विचार करून त्याने नाईलाजाने वडिलांना फोन केला.

"अरेsss! सुमेधsss, इतक्या सकाळी? काय म्हणतो, सांग?"

"पैसे पाहिजे होते थोडेफार. माझ्याकडचे संपले."

"बरं, किती पाहिजे?"

"चालू महिन्याचं रूमभाडं, मेस आणि बाकी किरकोळ... बस्स, एवढंच."

"ठीक आहे. आठ हजार पाठवतो."

सखारामनं होकार दिल्यानंतर दोघांनी फोन बंद केले. मात्र त्यांचं बोलणं सरूच्या लक्षात आलं होतं. तरीही तिने सखारामला विचारलं,

"काय म्हणतो सुमेध?"

"काही नही. पैसे पाहिजे हाये त्याला."

"त्याला म्हणा, तिकडे राहून विनाकारण खर्च करण्यापेक्षा घरी ये."

तिचं नेहमीचं बोलणं ऐकून सखारामनं तिच्याकडे दुर्लक्ष केलं होतं. ऑफिसला गेल्यानंतर त्याने प्रथम सुमेधला फोनवरून ऑनलाईन पैसे

पाठवून दिले. नंतर तो त्याच्या कामाला लागला होता; परंतु कशातच लक्ष लागत नव्हतं. 'संकेत पाटीलकडे अडकलेले पैसे कसे काढावे?' हेच अधूनमधून सारखं मनात येत होतं.

महिना उलटून गेला होता, तरी रोहण आणि सुरूची यांच्यातील रुसवे-फुगवे कमी झालेले नव्हते. ॲनिव्हर्सरीच्या दिवसापासून दोघेही एकमेकांशी बोलत नव्हते. दुसऱ्या दिवशी रोहणने तो केक भिकाऱ्याला देऊन टाकला होता. पुन्हा सुरूचीला मस्का लावायचा नाही, असं ठरवून तो कंपनीच्या कामात गुंतून राहत होता. कंपनीच्या कामाबाबत दोघांची जशी काही स्पर्धा लागली होती. मैत्रीचं रूपांतर पती-पत्नीत झालं होतं; पण त्या नात्याच्या अनुभवाचे सुखद क्षण त्यांना लुटता येत नव्हते. त्यामुळे तो फार नाराज झाला होता.

तिलाच काय साक्षात्कार झाला होता, काय ठाऊक. एका रविवारी ती म्हणाली,

"काय मौनीबाबा, बोलायला पैसे लागतात की कष्ट?"

"काय बोलू, सांग? बोलावं, तर तुला वाटेल की मी तुझ्या मनालाही ओरबाडतो आहे."

"तसं नाही रे. बोलणं चांगलं असलं, की कशाला काही वाटेल?"

"चांगलं म्हणजे कसं असतं?"

"हे बघ, आलाच वाकड्यावर?"

"यात काय वाकडं आहे? चांगलंच विचारतो आहे."

“चांगलं म्हणजे काय असतं, हे तुला कळत नाही का?”

“मी तेच म्हणतो. मी जे बोलतो, करतो, ते मला कळू शकत नाही. म्हणून तर म्हणतो, ‘तू सांग नेमकं काय ते. चांगलं आणि वाईट तू सांगशील तेव्हा मी तुझ्या मताने चालेल.”

“मी सांगितलेलं, तर तुला कधी कळलेलं आहे का?” तिने उलट विचारलं.

“बघ, कशी बोलते आहे तू? आपण कॉलेजला होतो, तेव्हा कशी गोड बोलायची. आताच काय इतकं डेरिंगबाज बोलू लागली आहे. नोकरी करते म्हणून का?”

“तुलाच तसं वाटतं. तसं काही नाही. तुझा इगो कमी कर. म्हणजे तुला माझं बोलणं कडू वाटणार नाही.”

“इगो कमी करू म्हणजे काय? लाचार होऊन तुझ्या मागे-पुढे फिरू?”

दोघेही काय बोलत होते आणि काय सांगत होते, हे त्यांचं त्यांनाच कळत नव्हतं. ‘मी बरोबर, तू चूक’ आणि ‘तुझं चुकतं, माझं बरोबर’ या भावना त्यांच्या नात्यात शॉर्टसर्किट करत होत्या.

“लाचार नको होऊ. कॉलेजमध्ये मित्र म्हणून जसा राहत होतास, तसा राहा. मग कसा छान वाटशील.” ती पुन्हा बोलली.

“तू मला चांगला म्हण की वाईट म्हण. आता तुझ्याकडून काही अपेक्षा करणं सोडून देणार आहे मी. तू कंपनीत प्रमोशन मिळव की स्वतःची कंपनी काढ. माझी काही हरकत नाही.”

“तुझं असं बोलणंच पटत नाही मला. म्हणून कधी-कधी राग येतो.” ती म्हणाली.

“कधी-कधी नाही, नेहमीच येतो. जरा माझ्या आत्म्याला स्पर्श करून पाहा. मग कळेल माझ्यातलं खरं प्रेम.”

“तुझं मन जर शब्दांच्या जखमा करून जात असेल, तर सांग, तुझा आत्मा दिसेल तरी कसा?”

“तो आत्मा पाहण्यासाठी आकड ठेवावी लागत नाही, जिव्हाळा असावा लागतो.”

“असा जिव्हाळा कोणत्या बाजारात मिळतो?” तिने त्याची गंमत करत म्हटलं,

“तू अशी बोलते आणि उलट माझ्यावरच आरोप करते. जो दुसऱ्याच्या मनाला जखम देतो, तो स्वतःच्या मनातही एक जखम घेऊन जगत असतो. हे ऐकलं होतंस नं तू एका ऑडिओमध्ये?”

“अरे, ते फक्त ऑडिओ आहे. रिअल लाइफ नाही. ते काही वेगळंच असतं.”

“लक्षात ठेव, जगात प्रत्येक माणसाला प्रेमाची गरज असते. ते एकमेकांनी समजून-उमजून पूर्ण करायचं असतं.”

“व्वा! काय मस्त शिकवतो तू. प्रेमाची अपेक्षा करतो आणि असा कसा मूग गिळून बसतो?” तिने विचारलं.

“तुला माझ्या खऱ्या प्रेमाची किंमत कळलीच नाही; म्हणून एक दिवस तू प्रेमासाठी भिकारी बनशील.”

“भिकारी मी नाही, तू होतास; म्हणून मला शेवटच्या वर्षी सतत प्रपोज करत होता. म्हणे, ‘आपण मस्त राजा-राणीसारखे राहू, आणि आता मला दासी समजतो आहे.”

“तू जर साध्या-साध्या गोष्टींकडेही तशी पाहत राहशील, तर तुला तेच वाटणार आहे.”

“तू नोकरी सोडायला लावतो, ही काय साधी गोष्ट आहे?”

“बापरे! त्या गोष्टीला बरेच दिवस झाले, तरी ती तुझ्या मनातून गेली नाही?”

“ते काही एकच कारण नाही. तू नेहमी डॉमिनेट करत असतो.”

“मी तुझं सगळंच ऐकून चालावं, तुझ्या इच्छेनुसार वागावं, हेच वाटतं तुला? तसे झाले तरच तू माझ्यावर प्रेम करशील, माझ्यासोबत राहशील आणि माझा स्वीकार करशील. हा तर एक व्यवहार होणार नाही का?”

“मी कुठे असं म्हटलं तुला? मनाने काहीही तर्क करत नको जाऊ. तुला पटत नसेल, तर जाऊ दे. जसं होईल तसं.”

“म्हणजे? काहीही होवो? पण काळ कोणालाही सोडत नाही. तो प्रत्येकाच्या वागण्याची नोंद करतो आणि त्याचे परिणाम समोर आणतो.”

“तुझं तत्त्वज्ञान तुझ्याजवळ ठेव. तुला कामात येईल. माझं काय ते मी पाहून घेईल. पटलं तर बघ, नाही तर जाऊ दे.” तिचं हे बोलणं ऐकून रोहण दचकला. त्याने तोंडाला कुलूप लावले.

‘म्हणजे तिला नेमकं काय म्हणायचं असेल?’ हा प्रश्न त्याला पडला होता. तिच्या मनाचा त्याला अंदाज घेता येत नव्हता. ‘शांतपणे अंतर राखून असलो, तर तीच कधी-कधी स्वतःहून बोलते. म्हणजे तिच्या मनात दुसरं काही नसेलही? पण मग ऐकत का नाही?’ या विचारांनी त्याचं डोकं गरम झालं होतं. नंतर तो सरळ हेमंतकडे निघून गेला होता.

*** *** ***

सुमेधने ऑफर स्वीकारल्यापासून बरेच दिवस झाले होते, तरी कंपनीकडून त्याच्या जॉईनिंगबाबत कोणतीही सूचना आलेली नव्हती. पुन्हा वडिलांना खर्चासाठी पैसे मागावे लागतील. त्यांच्या रिटायरमेंटचे दिवसही जवळ आलेले आहेत. त्यांना पैशांचा ताण देण्यापेक्षा काहीतरी पर्याय निवडावा.’ या विचारात तो मित्राच्या रूमवर निघून गेला होता. ‘जाताना शिरोळे काकांना भेटून जावं?’ हा विचार त्याच्या मनात आला होता; पण पुन्हा-पुन्हा त्यांना त्रास देणं नको, म्हणून तो विचार त्याने फेकून दिला मित्राकडे जाताना दोन सिगारेट सोबत घेतल्या होत्या.

सुमेध आलेला पाहून अनंतला नवल वाटलं. त्याला बसायला खुर्ची देत विचारलं,

“अरे सुमेधsss! कुठे गायब झाला होता इतके दिवस?”

“पहिले माचीस आण, मंग सांगतो.”

“ काय करतो माचीसला आग लावतो की काय जगण्याला? इतका उदास नको होऊ” अनंतने गमतीने म्हटले.

“ उदास वगैरे काही नाही. अपेक्षित गोष्टी वेळेवर झाल्या की, ताण नसतो. वाट पाहणं जीव घेणं असतं.”

अनंतने त्याला माचीस दिली. त्याने खिशातून सिगारेट काढल्या. एक त्याला दिली, एक स्वतः पेटवली. जोराने एक झुरका मारून नाका-तोंडातून धूर सोडला. अनंत त्याच्याकडे पाहतच होता. सुमेधच्या शरीरात एक वेगळेच तरंग उठले. मग तो म्हणाला,

“यार, काय सांगू तुला. कंपनीकडून अजून जॉईनिंगची सूचना आलेली नाही. तुझ्यासोबत इंटरव्ह्यू दिला असता, तर तुझ्या कंपनीत आपली सोबतच जॉईनिंग झाली असती.”

सुमेध बोलत असताना अनंतनेही सिगारेट पेटवून एक झुरका मारला होता. त्याचं म्हणणं ऐकून घेत तो म्हणाला,

“त्या-त्या कंपनीच्या काही पद्धती असतात. काहींची प्रोसेस लवकर होते, काहींची उशिरा होते. तुझं सिलेक्शन झालंच आहे. आज ना उद्या तूही जॉईन होशीलच.”

“हो, तेही खरं आहे. आता वडिलांकडे पैसे मागणं कसं तरीच वाटतं, यार.”

“झालं ना आता? शेवटच्या टप्प्यात आलं असेल तुझं काम.”

“हो, फक्त जॉईनिंग लेटर बाकी आहे. तू देशील मला काही पैसे लागले तर? मी नंतर परत करेलच तुला. पहिला पगार झाला की.” सुमेधने सांगितले.

अनंताने त्याला होकार दिल्याने त्याला बरं वाटलं होतं. 'आता जॉईनिंग उशिरा का होईना, काही प्रॉब्लेम नाही,' असा मनोमन विचार करत तो सिगारेटचा झुरका मारायला गेला, तर ती संपत आली होती. तेवढ्यात त्याच्या मोबाईलची रिंग वाजली. त्याने पाहिलं, तर ओरडलाच,

"बाssपरे!"

"काय झालं?" अनंतनं विचारलं.

"शिरोळे काकांचा फोन." त्याने सांगितलं आणि फोन घेतला.

"नमस्कार काकाsss."

"सुमेध, मेल चेक कर. एच.आर.कडून मॅनेजमेंट ट्रेनी बॅचच्या जॉईनिंगचे मेल गेले आहेत. तुझाही मेल आला असेल. पाहून घे."

"हो काका."

"बरं, ठीक आहे."

शिरोळे साहेबांनी फोन कट केला. सुमेधनं मोबाईलमधील मेल चेक केले, तर एच.आर. काळे यांचा मेल आलेला दिसला. मेल पूर्ण वाचून त्याने फोन केला.

"हो काका, मेल मिळाला. दहा दिवसांच्या आत रुजू व्हायला सांगितलं आहे."

"बरं, तयारीला लाग मग." असं सांगून शिरोळे साहेबांनी फोन कट केला.

सुमेध खूप खुश झाला होता. त्याच्या जीवात जीव आला होता. त्याच्या चेहऱ्यावरील उत्साह पाहून अनंत म्हणाला,

“आता काही टेन्शन नाही. जे व्हायचं ते होणारच असतं; पण आपण उगीच काळजी करत बसतो.”

“हो, ते ठीक आहे यार; पण वेळ थांबून राहिली की जरा घुसमट होते. बाकी काही नाही.”

“चल आता, आज या खुशीत एन्जॉय करू.”

“ओके, काही प्रॉब्लेम नाही. कर तयारी.”

दोघेही तयारी करून रूमच्या बाहेर पडले. शहरातील रस्त्यावरील लाईट लागले होते. सगळीकडे झगमगाट दिसत होता. सुमेध गाडी चालवत होता. वाहनांची गर्दी आणि बेशिस्त वाहतूक याचा त्याला नेहमीप्रमाणे ताण येत नव्हता. अनंत त्याच्यामागे बसलेला होता. पुढे काही अंतरावर चायनीज स्पॉट आणि चाटभंडारच्या गाड्या लागल्या होत्या. तिथून दरवळणाऱ्या पदार्थांच्या वासानेही त्याला थांबवू शकलं नव्हतं. तो रेस्टॉ-बारच्या दिशेने गाडी चालवत होता. ‘खानदेश इंडस्ट्रीज’ कंपनी, शिरोळे काका, एच.आर.काळे आणि तेथील आकर्षक वातावरण त्याच्या डोळ्यांसमोर दिसत होतं, तरी गाडी सरला रस्त्याने जात होती.

*** *** ***

नेहमीप्रमाणे सुरूची रात्री घरी आली होती. तिच्याजवळील चावीने दार उघडून ती आत आली आणि सरळ मास्टर बेडरूममध्ये गेली. तेव्हा तिला रोहण दिसला नव्हता. 'गेला असेल कोणाकडे तरी;

पण मेसेज तर करायला पाहिजे? आलाच, तर एक चावी आहेच त्याच्याकडे.' जास्त विचार न करता ती झोपून गेली.

सकाळी उठल्यावर तिने दुसऱ्या बेडरूममध्ये जाऊन पाहिलं, तर रोहण तेथेही दिसला नव्हता. तो घर सोडून गेला होता, हे तिच्या लक्षात आलं होतं. 'उपलब्धतेमुळे कोणत्याही गोष्टीचं महत्त्व कमी होतं,' हे त्याचं शेवटचं वाक्य तिला विचार करायला लावत होतं. आणखी खोलात जाऊन त्याचा विचार करण्याची तिला गरज वाटली नव्हती. 'आला तर येईल, नाहीतर राहीलं' म्हणून नित्य कामाला लागली.

आठ-दहा दिवस झाले, तरी रोहणचा पत्ता नव्हता. त्या दोघांकडे मोबाईल होते खरे; पण स्वतःहून कोणीच कोणाशी कॉन्टॅक्ट करायला तयार नव्हते. 'भारी भरतो, तर भरू दे. कुठं जाईल? घरीच येईल.' तिला वाटायचं आणि त्याला फोन करणं टाळायची.

एक दिवस तिला एकटं वाटायला लागलं होतं. ती बेचैन झाली होती. काय करावं, तिला काही सुचत नव्हतं. मग तिला शिरोळे काकांची आठवण झाली. तिने सुमेधला फोन केला. तिचा फोन आलेला पाहून त्याला नवल वाटलं. त्याने फोन घेतला आणि विचारलं,

"सुरू, अगं कुठं आहेस तू? काही फोन नाही की काही नाही."

ती क्षणभर काही बोलली नाही. तोच पुन्हा म्हणाला,

"अगं, बोल ना. रेंज नाही का? आवाज येत नाही का?"

हुंदका दाबून ती कसं तरी बोलली,

“हो, ऐकायला येतं.”

“काय म्हणतेस, सांग?”

“शिरोळे काकांचा नंबर देशील?”

“का बरं? काय काम आहे?”

“काही नाही, सहज. आज संडे आहे ना, त्यांना भेटायला जाते आहे.”

“काही विशेष? लागल्यास मी येतो तुझ्याकडे. तुझे लोकेशन पाठव. जाऊ आपण दोघं सोबत?”

“नको, मीच जाऊन येते.”

“ठीक आहे.” म्हणून त्यानं फोन कट केला आणि मोबाईल नंबर दिला. सुरूचीने शिरोळे यांना फोन लावला. ट्रू-कॉलरवर तिचं नाव ओळखीचं वाटलं. ‘सखारामची मुलगी’ त्यांच्या लक्षात आलं. त्यांनी फोन घेतला आणि बोलले,

“हांsss! सुरूची---”

“गुड मॉर्निंग, काका.”

“हं, बोल---”

“काका, तुम्ही घरी आहात का?”

“हो. का बरं? काय काम आहे?”

“मी येते आहे तुमच्याकडे भेटायला.”

“बरं, चालेल. ये, एक वाजेपर्यंत.”

“ठीक आहे, काका.”

फोन बंद झाल्यानंतर शिरोळे विचार करायला लागले. 'मुलगी लहान होती, तेव्हा पाहिली होती. नंतर फक्त तिची माहितीच मिळत होती. काय काम असेल असं?' विचार करत बसले. जेवण करून तिची वाट पाहत राहिले.

*** *** ***

हेमंतचं लग्न झालेलं नव्हतं. त्याच्या फ्लॅटवर तो एकटाच राहत होता. त्यामुळे रोहणनं घर सोडलं तेव्हापासून तो त्याच्याकडे आला होता. त्याचं नेमकं काय बिनसलं, हे हेमंतला कळत नव्हतं आणि रोहण काही सांगत नव्हता. त्याची उदासीनता मात्र लपत नव्हती.

"रोहण, एक सांगू का?" हेमंतनं विचारलं.

"बोल, काय म्हणतो?"

"इतके दिवस झाले. तू ऑफिसला जातोस, परत माझ्याकडे येतोस. घरी का जात नाहीस?"

"म्हणजे मी तुझ्याकडे येऊ नको का? तुला नको असेल, तर जातो आता."

"तसं नाही म्हणत रे मी. तुझं आणि सुरूचं काही बिनसलं का? काही वाद झाले आहेत का?"

"वाद, भांडण वगैरे काही नाही."

"मग ती घरी नाही का? कुठे बाहेर गेली का?"

"हो, लागल्यास तसं म्हण."

“अरे, अशी टोलवा-टोलवी करू नको. तू कधी तिला फोन करताना दिसत नाहीस. तिचं नाव काढत नाहीस. तिचा फोनही कधी आला नाही. खरं सांग, काय झालं?” हेमंतनं विचारलं.

“ती फार तोऱ्यात असते, यार. आपण काही म्हणा, तर ती काहीच म्हणते. सरळ ऐकत नाही की बोलत नाही.”

“फार काही मोठं भांडण झालं आहे का तुमच्यात?”

“तसं काहीच नाही. तिला माझ्यापेक्षा गुण जास्त, तिचा पगार जास्त, तिचं काम जास्त आणि चांगलं. कंपनीत तिच्या टीममध्ये तिचं कौतुक होतं. तो एक इगो वाढला असेल तिच्यात.”

“तसं काही नसतं. तुम्ही नवरा-बायको आहात. त्यात कोणी काही कमी-जास्त असणं किंवा चांगलं-वाईट ठरवणं, हे काही योग्य नसतं. फक्त 'जोडीदार' हीच भावना महत्त्वाची.”

“हे मलाही वाटतं; पण तिला नाही वाटत ना. ती आपलं म्हणणं उडवून लावते.”

रोहण आणि हेमंत त्यांच्या पद्धतीने बोलत होते. मात्र मार्ग निघत नव्हता. दोघांमध्ये काय बिनसलं, हे हेमंतलाही लक्षात न आल्याने त्याने विचारलं,

“घर तू सोडलंस. ती तर तिथेच आहे. म्हणजे तुलाच नको आहे का ती?”

“तसं काहीच नाही. तिला माझी गरज असती, तर तिने फोन केला असता; पण नाही.”

“मग तू केला असता. नाहीतर आता करून पाहा.” हेमंतनं सांगितलं.
“तिचं प्रेम असतं, तर दुसऱ्या दिवशीच तिने फोन करून विचारलं असतं, पण तिला जर माझी किंमत वाटत नसेल, तर राहू दे. कळू दे तिला. त्यासाठी मी दूर झालो.”
“तिचं प्रेम होतं, म्हणून तर तिने तुझ्याशी लग्न केलं की नाही.”
“हेमंत, हे लग्न झाल्यानंतर कळतं. खरंच प्रेम आहे की नाही. तोपर्यंत फक्त जवळ येण्याची घाई असते. जवळ आल्यानंतर सगळे दोष दिसतात. असेच झाले आमचे.”
“मग त्यावर काही पर्याय नाही का?” हेमंतनं विचारलं.
“काय पर्याय काढायचा? तिला जर सोबत राहायचं नसेल, तर पर्याय निघणारच नाही.”
“लाव फोन. मी बोलतो सुरूशी. ती नाही समजली, तरी तू समजून घे. एक तर पार्टनर मिळत नाही रे इतक्या सहज. वर्ष झालं, घरचे लोक स्थळ पाहत आहेत. अजून पाहिजे तशी मुलगी मिळाली नाही.”
रोहणनं मोबाईल हेमंतच्या हातात देत सांगितलं,
“हे घे आणि लाव फोन. बोल, काय बोलायचं ते.”
हेमंतनं फोन घेऊन तिचं नाव शोधलं. समोर कॉल हिस्ट्री दिसली, तर सकाळी रोहणचा आउटगोइंग कॉल दिसला. तिला फोन लावण्याच्या आधी तो म्हणाला,
“रोहण, काय लबाड आहेस रे तू! सकाळी तिला कॉल केलेला दिसतोय.”

“चांगलं पाहा. काही बोलणं झालेलं वाटतं का? बिझी होता तिचा कॉल.”

“मग पुन्हा केला असता ना?”

“का? माझा कॉल मिस झाल्याचं तिला स्क्रीनवर दिसलं असेल की नाही? मग कॉल बॅक करता येत नाही?”

“ठीक आहे. आता मी कॉल करून पाहतो.”

हेमंतनं कॉल लावला. रिंग जात होती; पण फोन उचलला गेला नव्हता. ‘जिस व्यक्ति से आप बात करना चाहते हैं, वह अभी उत्तर नहीं दे रहा है। कृपया थोड़ी देर बाद पुनः प्रयास करें।’ अशा प्रकारचा व्हॉइस मेसेज काही वेळा ऐकू आला. हेमंतनं पुन्हा फोन लावला, तर पुन्हा तोच आवाज आला. रोहण म्हणाला,

“पाहिलं? किती भारी भरते ती? तिलाच गरज नसेल, तर कशाला भीक मागायची?”

तिने फोन न उचलल्याने हेमंतला रोहणचं म्हणणं खरं वाटलं. रोहणाला तिचा राग आला होता. त्याने वैतागून म्हटलं,

“जाऊ दे. चल, येऊ फिरून कुठून तरी. बघू काय करायचं ते.”

“चल, काढ गाडी. कार घेऊन जाऊ माझी. तिकडूनच जेवण करून येऊ.”

दोघांचं एकमत झालं आणि ते घराच्या बाहेर पडले.

*** *** ***

शिरोळे यांनी दिलेल्या लोकेशनवर रिक्षा थांबली. सुरुचीने समोर पाहिलं. दोन-तीन घरं सारखेच दिसत होते. मग गेटच्या शेजारील नावाच्या पाट्या तिने पाहिल्या. हवे ते घर मिळाले. गेटच्या आत येऊन तिने दारावरची बेल वाजवली.

"कोण पाहिजे?" सौ. शिरोळे यांनी दार उघडून विचारले.

"शिरोळे काका इथेच राहतात ना?"

"हो, तुम्ही कोण?"

"काकू, मी सुरुची, सखाराम जाधव यांची मुलगी."

“अगं तूsss! कित्तीsss वर्ष झाले, पाहिलंच नव्हतं तुला. किती मोठ्ठी झाली. खूप बदलली आहेस तू!”

“अगं, तिला आत येऊ देशील की दारातच गप्पा मारत बसशील?” शिरोळे सहज म्हणाले.

“ये, बस. मी पाणी आणते.”

समोरच्या खुर्चीकडे हात दाखवून मिस. शिरोळे किचनमध्ये गेल्या. सुरुचीने शिरोळे यांना नमस्कार करून खुर्चीवर बसली. तिच्या मनात अनेक लाटा उसळून येत होत्या. काय बोलावं, तिला काही सुचेना.

“कशी आहेस, सुरु? वर्ष झालं, तू इथेच आहे म्हणे पुण्यात?” शिरोळे यांनी विचारले,

“हो काका.”

“कसा चाल्ला तुझा जॉब? सगळं ठीक आहे ना?”

“सगळं काही ठीक नाही, काका.”

“आंsss! का? काय झालं?” शिरोळे यांनी विचारल्यानंतर नेमकं काय सांगावं? कसं सांगावं? तिला काही सुचलं नव्हतं.

तिची भयभीत अवस्था पाहून सौ. शिरोळे यांनी तिला पाणी दिलं आणि समोर शिरोळे यांच्या शेजारी जाऊन बसल्या. तिच्या घशातून पाण्याचे घोट जात नव्हते. डोळे लाल झाले होते. चेहरा पडलेला होता. पाणी पिऊन झाल्यानंतर त्यांनी तिला विचारले,

“बेटा सुरु, हे नेहमीच तुमच्या फॅमिलीविषयी बोलत असता. सगळे चांगले आहेत ना?”

सुरुचीला एकदम रडू कोसळलं. दोघं पती-पत्नी तिच्याकडे प्रश्नार्थक नजरेने पाहू लागले. मग सौ. शिरोळे उठून तिच्या शेजारी जाऊन बसल्या. तिच्या पाठीवरून हात फिरवून त्यांनी विचारले,

“काय झालं बेटा? काही घडलं का? काय झालं, सांग. हे घर तुझंच आहे.”

“मी लव मॅरेज केलं आहे.” जरा शांत होऊन तिने सांगितले.

“त्यात काय विशेष आहे? आजकाल ते खूप होत आहेत.” सौ. शिरोळे यांनी सांगितले.

“पण काकू, आमच्यात जमत नाही. वाद होतात.”

“ हे बघ सुरु, नवरा-बायको म्हटलं की थोडं-फार चालूच असतं.”

“ काकू, तसं पाहिलं तर आमचे वाद काही टोकाचे नाहीत. फार मोठं भांडणही नाही.”

“ मग काय प्रॉब्लेम आहे?”

“काकू, आम्ही बोलतो तेव्हा आमचे सूर जुळून येतच नाही. तो म्हणतो काही तर मी म्हणते काही. त्याला वाटतं त्याचंच खरं. मग मला त्याचा इगो सहन होत नाही.”

इतका वेळ शांतपणे ऐकून तिला समजून घेत शिरोळे यांनी विचारले,

“आई-वडिलांना माहिती आहे का, तू लव्ह मॅरेज केलं म्हणून?”

“हो काका. त्यांचा काही प्रॉब्लेम नाही.”

“मग नेमका काय प्रॉब्लेम आहे?”

“रोहण हा समजून घेण्याच्या तयारीतच नसतो. त्याला वाटतं, ‘तो जे सांगेल, ते मी करत राहावं.’”

“तुमच्यातील वाद कधीपासून सुरू आहे?” शिरोळे यांनी विचारले.

“सुरुवातीला सहा-एक महीने चांगलं चाललं होतं काका. मग कामाचा व्याप वाढत गेला, तशा त्याच्या तक्रारी वाढत गेल्या.”

“कोणत्या तक्रारी असायच्या?”

“ त्याला वाटतं, मी घर सांभाळावं, पण मला ते शक्य होत नाही.”

“त्याबाबत दोघांनी शांतपणे कधी त्यावर चर्चा केली?”

“नाही, काका.”

“का बरं? वेळ मिळत नाही का?”

“आमच्या शिप्ट वेगवेगळ्या आहेत. संडेच मिळतो, निवांतपणे एकत्र यायला.”

“मग तर छान आहे. मस्त बाहेर फिरायला जायचं आणि मन मोकळं करून यायचं. एकमेकांच्या मनात काही असलं की सांगून टाकायचं.”

“त्याचा एक प्रॉब्लेम आहे काका. ‘मी त्याला माझ्या ऑफिसच्या अडचणी सांगितल्या की, डायरेक्ट नोकरी सोड,’ म्हणतो. मग काय करू?”

“एक जोडीदार म्हणून त्याच्या काही अपेक्षा असतील, म्हणून तो असं म्हणत असेल.”

“ पण काका, माझ्या करिअरशी तडजोड करणं मला नाही पटत.”

“सुरु, त्यावर मार्ग काढता येतो. बाकी जोडपे आहेतच की नाही, कॉर्पोरेट क्षेत्रात?”

“पण काका, तो वेगळाच आहे. समोरच्यालाही काही इच्छा असतात, हेही समजून घ्यावं की नाही त्यानं? त्याचीच गोष्ट खरी मानून चालतो आणि स्वतः राग धरतो.”

“त्याच्या अपेक्षा काय ते समजून घे आणि त्याला सांग, ‘दोघांचे मनं राखायचे आणि वाद टाळायचे.’” शिरोळे यांनी सांगितले.

“बायकोशी कसं बोलावं, याची अक्कलच नाही त्याला.”

“लग्नाच्या आधी त्याचा स्वभाव कळला नव्हता का तुला?” मिस. शिरोळे म्हणाल्या.

“मित्र म्हणून खूप चांगला होता तो. सगळ्या गोष्टी पॉझिटिव्ह घेत होता. लग्नानंतर नवरा म्हणून वर्चस्व गाजवतो आहे.”

“नवरा-बायकोमध्ये असं थोडं फार चालूच असतं.” शिरोळे म्हणाले.

“काका, तो कचऱ्यासारखा समजतो. मला वाटतं, त्याच्या नादी लागण्यापेक्षा रस्ता बदलेला बरा.”

“म्हणजे तू त्याला सोडून देणार?”

“हो काका, मला माझं स्वतंत्र आयुष्य जगायचं आहे.”

“आई-वडिलांना सांगावं लागेल ना. आधीच त्यांच्या माघारी तू लग्न करून टाकले. त्यात पुन्हा हा कठीण निर्णय. त्यांना काय वाटेल मग? याचा विचार केला का तू?” शिरोळे यांनी सांगितले.

“सगळ्यांनी बसून एकत्र निर्णय घ्या. त्या मुलाला आणि त्याच्या आई-वडिलांनाही बोलवून घ्या.” सौ. शिरोळे यांनी चांगली कल्पना सुचवली.

“नको काकू, आता काहीच करायचं नाही. मी डबल टेन्शनमध्ये आहे.”

“म्हणजे?” शिरोळे पती-पत्नीच्या तोंडून एकाच वेळी आवाज बाहेर आला.

‘सांगावं की नाही सांगावं?’ सुरुची विचारात पडली होती.

“सांग बेटा, काय झालं? घाबरू नको. आम्ही आहोत ना.” सौ. शिरोळे यांनी धीर दिला.

“काकू, मला दिवस गेले. तिसरा महिना सुरू आहे. आणि तो असा वागतो.”

“सरू, मग हे तर कठीणच आहे. आपण सलोख्याने मार्ग काढला पाहिजे.” सौ. शिरोळे म्हणाल्या.

“त्याला सांगितलं मी, पण तो उलट बळावर हक्क आहे म्हणून सांगतो, पण धीर देत नाही.”

तिचं ते ऐकून दोघं पती-पत्नी गंभीर विचारात पडले. मोठा गहन प्रश्न म्हणून तेही काही फार बोलू शकले नव्हते. शेवटी, ‘ठीक आहे बेटा. आपण मार्ग काढू काही तरी,’ असं सांगून शिरोळे यांनी तिला धीर दिला आणि मिस. शिरोळे यांनी, “जेवण करून जा,” म्हणून थांबवून ठेवले. दोघी किचनमध्ये गेल्या.

शिरोळे उठले आणि बाहेर फिरायला गेले. सूर्य हळूहळू बुडत चालला होता. अंधार वाढत होता. 'काय करता येईल? कसं करता येईल?' हे विचार शिरोळे यांच्यासोबत चालत होते. त्यांच्या पावलांची गती मंदावत होती.

*** *** ***

रोहण आणि हेमंत शहराच्या बाहेर सिंहगडकडे एका निसर्गरम्य ठिकाणी गेले होते. शहराच्या गोंगाटापासून दूर होते. त्या शांत निसर्गाच्या सान्निध्यात गप्पांच्या आनंदापेक्षा रोहण आतून अशांत होता. त्याची अवस्था हेमंतने आधीच ओळखली होती. वेटरला ऑर्डर दिल्यानंतर हेमंत म्हणाला,

"आता आणखी एक फोन करून पाहा सुरुला. लागल्यास आपण सरळ इथून तुझ्या घरी जाऊ आणि बोलू तिच्याशी."

"ठीक आहे. हा मोबाईल घे आणि तूच बोल." रोहणनं त्याला मोबाईल दिला. त्याने फोन केला.

मोबाईलची रिंग वाजली. स्क्रीनवर रोहणचं नाव दिसलं. तिने फोन घेतला नाही.

"जिस व्यक्ति से आप बात करना चाहते हैं, वह अभी उत्तर नहीं दे रहा है। कृपया थोड़ी देर बाद पुनः प्रयास करें।"

पुन्हा तोच व्हॉईस मेसेज त्या दोघांना ऐकायला मिळाला.

"एकदा ट्राय करून पाहू." हेमंत म्हणाला.

“नको गड्या, एवढी लाचारी. तिची इच्छा नसेल तर राहू दे. भर पेग.” रोहणनं सांगितलं.

दोघांनी त्यांचे पेग रिकामे करत विषय बदलले आणि जॉबसंबंधी बोलत राहिले.

“सुरु, फोन वाजला तुझा. घे, पाहा कोणाचा आहे?” सौ. शिरोळे यांनी सांगितले.

सुरुचीनं फोन हातात घेतला. रोहणचे बरेच कॉल मिस झालेले दिसले. घरी गेल्यावर कॉल बॅक करायचे तिने ठरविले आणि पुन्हा मोबाइल सायलेंट मोडवर ठेवला.

थोड्या वेळानं शिरोळे पती-पत्नींसोबत सुरुचीने जेवण केले. नंतर ती घरी परत जायला निघाली. तेव्हा सौ. शिरोळे म्हणाल्या,

“सुरु, काही काळजी करू नको बेटा. सगळं व्यवस्थित होईल.”

ती काहीच बोलली नव्हती. फक्त त्यांच्याकडे पाहून मान हलवली. ते दोघे तिला गेटपर्यंत सोडवायला आले. तेव्हा शिरोळे म्हणाले,

“आरामशीर जा. समोरच रिक्षा स्टॉप आहे. आपण तुझ्या आई-वडिलांना बोलावून घेऊ. काही तरी मार्ग काढू.”

“ठीक आहे काका. बरं काकू, येते मी.” तिने निरोप घेतला. रिक्षा करून ती रूमवर गेली. तेव्हा रात्रीचे दहा वाजले होते.

तिने मोबाईलवर रोहणची कॉल हिस्ट्री पाहिली. दुपारपासून त्याचे तीन-चार कॉल मिस झालेले पुन्हा पाहिले. ‘कॉल करण्यापेक्षा घरीच

का नाही आला? काय असेल त्याच्या मनात?' तिने विचार केला आणि फोन लावला.

रोहणच्या मोबाईलची रिंग वाजली. तिचे नाव पाहताच त्याने पटकन फोन सुरू केला; पण बोलला नव्हता. तीही जरा 'काय बोलावं?' या विचारात पडली. हेमंतने हळूच विचारले,

"सुरुचा फोन आहे ना?"

"हंsss!" रोहणनं मान हलवली.

"बोल ना मग." हेमंतनं सांगितलं; पण त्याला काही बोलणं सुचेना.

शेवटी सुरुचीनं फोन कट केला. फ्रेश होऊन बेडरूममध्ये गेली आणि लॅपटॉप उघडून टीम लीडनं दिलेलं टार्गेट पाहू लागली; पण त्याकडे लक्ष लागत नव्हतं. मोबाईलच्या रिंग नाही तर मेसेजच्या अलर्ट टोनकडे तिचं लक्ष लागून होतं.

थोड्या वेळानं मोबाइलची रिंग वाजली. तिने पाहिलं तर सुमेधचा फोन होता.

"सुरू, जाऊन आली का शिरोळे काकांकडे?" त्याने विचारले.

"हो, खूप चांगले आहेत रे, ते दोघंही."

"काय झालं मग? का बरं गेली होती?"

"सहज, सुटी होती तर जाऊन आली." तिने खरं कारण सांगितलं नाही.

"बरं, पुढच्या आठवड्यात पप्पा रिटायर्ड होत आहेत. आपल्याला जायचं आहे घरी."

“हो, ठीक आहे. जाऊ सोबत.” ती म्हणाली.

“ओके, टेक केअर.” त्याने फोन कट केला. तिने मोबाईल बाजूला ठेवून दिला.

‘पप्पानं त्याला फोन केला. मग मला का केला नाही? त्यांच्या मनात काही राग असेल का? पण पप्पा तसे नाही.’ तिच्या मनात उलट-सुलट विचार आले. ती सगळ्यांचा विचार करत होती. कोण कसं आहे, कसं नाही? आणि आपण काय निर्णय घ्यावा? ती गोंधळून गेली होती. नंतर तिने फोन हातात घेतला, तर स्क्रीनवर ‘पप्पा’ हे नाव दिसलं. ‘उगीच पप्पांबद्दल शंका घेतल्याचं वाईटही वाटलं.’ तेवढ्यात पुन्हा फोन आला. तिने आनंदाने घेतला.

“बोला पप्पा, कसे आहात? आई कशी आहे?”

“आम्ही चांगले हाये. तू कशी हाये?”

“छान आहे. आत्ताच सुमेधचा फोन येऊन गेला. तो सांगत होता.”

“हो, म्हटलं, पुढच्या शुक्रवारी ये. शनिवारी माझा नोकरीचा शेवटचा दिवस हाये.”

“हो पप्पा, नक्की येईल. आई कुठे आहे?”

“हाये न. बोल.” सरूकडे मोबाईल देत सखाराम म्हणाला.

“सुरु बेटा, कशी आहे?”

“मी चांगली आहे, आई. तू सांग, कशी आहे?”

“बरी हाये. तू नक्की ये बरं. लय दिवस झाले, आलीच नही.”

“हो आई, नक्की येईल.”

“बरं, ये मंग. काळजी घे.”

तिघांचं बोलणं संपलं होतं. बराच वेळ झाला होता. रोहणचा फोन आला नव्हता. ‘त्याची वाट पाहण्यात अर्थ नाही,’ या विचाराने ती झोपली. तिच्या डोळ्यासमोर बाप, भाऊ आणि नवरा तिघंही येत होते. मात्र तिघांचे रूपं वेगवेगळे दिसत होते. बाप हा हिमालयाएवढा वाटत होता.

सुरुची नेहमीप्रमाणे उशिरा उठली. एकटी असल्याने चार रुमच्या घरात तिचं लक्ष लागत नव्हतं. सकाळी रोहणची ऑफिसला जाण्याची घाईगडबड, त्याचा तो स्वतःची तयारी करतानाचा कानावर येणारा आवाज, तिला काही दिसत नव्हता की, काही कानावर येत नव्हता. घर एकदम शांत होतं. रोहणचा फोनही आलेला नव्हता.

तिला बारा-साडेबारा वाजता घरातून निघायची आणि साधारण दीड वाजता कॅन्टीनमध्ये येण्याची सवय होती, हे रोहणला माहीत होतं. म्हणून तोही दीड वाजता कॅन्टीनमध्ये जाऊन बसला. ‘सुरु लंच करायला आली, तर तिची भेट घेऊ आणि ती असं का करते?’ फोन का करत नाही? आपण फोन केला तर उचलत का नाही?’ विचार करत, त्यापेक्षा एकदा प्रत्यक्ष बोलून घेतलेलं बरं---” म्हणून तो तेथे तिच्या येण्याची वाट पाहात होता. शेवटी कंटाळून त्याच्या ऑफिसला गेला.

वेळ झाल्याने सुरुची घाईघाईने ऑफिसला गेली. सव्वा दोन वाजता टीम लीड नेहमीप्रमाणे ऑनलाईन स्टँड-अप मिटिंग घेणार

होते. त्यामुळे आपल्या जागेवर बसून तिने लॉगीन केलं. थोड्या वेळाने स्टँड-अप सुरू होताना सर्व सदस्य ऑनलाईन जोडले गेले.

“ओके टीम, सुरू करूया.” टीम लीडनं सांगितलं.

प्रत्येकाने आधीच्या कामाचा आढावा दिला आणि दिवसभर काय करणार ते सांगितलं. शेवटी सुरुची राहिली. तिच्याकडे लक्ष देऊन टीम लीडनं विचारलं,

“सुरुची, सांग.”

त्यांचे शब्द कानावर आल्यानंतर ती भानावर आली.

“कालचं काम पूर्ण केलं. आज QA चे defects fix करेन.” तिनं एवढंच सांगितलं.

मिटिंग संपल्यानंतर जो तो सदस्य त्याच्या कामाला लागला. मात्र तिचे लक्ष समोरच्या स्क्रीनवरून रोहणकडे जात होते. ‘त्याला गरज नसेल का आपली? आपलं तरी काय चुकलं होतं? तो जसा त्याच्या मनाचा मालक, तसं आपण आपल्या मनाचं; पण त्याला ते नको होतं, नाहीतर ऑफिसमध्ये भेटायला आला असता.’ या विचारातून ती बाहेर आली आणि तिला मागे घडलेल्या कामातील चुकीची आठवण झाली. पुन्हा स्वतःला सावरत कामात लक्ष घालू लागली. तरीही ‘काम की रोहण?’ या विचारावर ती थांबली होती.

‘आपण गृहिणी व्हावं, त्याच्या मुलाची आई आणि त्याची बायको म्हणून राहावं, तरच त्याच्यासाठी आपण चांगले. नाहीतर वाईट. मग आपल्या अस्तित्त्वाचं काय? तो बदलणार नाही. तसं असतं तो फोनवर

गप्प बसला नसता. स्वतःहून बोलायला का त्याचं मास कमी होणार होतं?' तिच्या डोक्यातून तो जात नव्हता.

'असंच चालत राहिलं, तर आपल्या कामात चुका होतील आणि आपली नोकरी अडचणीत येईल,' नोकरीचा विचार तिला महत्त्वाचा वाटला. तिने हातातील काम थोडा वेळ बाजूला ठेवलं. ईमेलची विंडो ओपन केली. रोहणचा ईमेल टाईप केला. सब्जेक्ट न टाकता सरळ मजकुराच्या ठिकाणी कर्सर घेतला. की-पॅडकडे नजर टाकली; पण 'काय टाईप करायचं?' म्हणून की-पॅडवर नजर आणि बोटं बटनांवर जात नव्हती.

'इतके दिवस झाले. त्याला आठवण येत नसेल का? आली असेल, म्हणून तर त्याने फोन केला होता? मग पुन्हा का बोलला नसेल? त्याला नकोशी वाटत असेल. त्याने तसं सांगण्याआधीच त्याला सांगून टाकावं की, ठीक आहे, ॲज यू लाइक.'

शेवटी, 'आपण एकत्र राहू शकत नाही. तू तुझ्या पद्धतीने राहा. माझी काही हरकत नाही.' असा मेल टाईप केला. थोडी थांबली. आता त्याच्याकडून काही वेगळ्या वागण्याची अपेक्षा ठेवण्यात अर्थ नव्हता. नाही तर तो कधीचाच सरळ झाला असता, पण तसं लक्षण त्याच्यात दिसत नाही. उगीच काही त्याच्यात अडकून पडायचं नाही. त्याची काही गरजही नाही. स्वतःच्या हिमतीने पुढे गेली तरच मनासारखे जगता येईल." विचारांती तिने एक क्लिक करून मेल पाठवून दिला

आणि डोक्यातून त्याचे विचार काढून तिच्या कामाला लागली. त्याशिवाय कोणतीच गोष्ट महत्त्वाची वाटली नव्हती.

*** *** ***

गेल्या दोन दिवसांपासून सुमेधची अस्वस्थता वाढत चालली होती. आठवडा सुरू झालेला होता. वडिलांच्या रिटायर्डमेंटची तारीख जवळ येत गेली होती. तो घडीघडी ईमेल चेक करत होता; पण पदरी निराशाच पडत होती. दुपारी कसे तरी जेवण करून मित्राच्या रूमवर जाऊन वेळ घालवण्याचा विचार करत होता. आरशासमोर केस विंचरून, चेहऱ्याला पावडर लावून झाल्यानंतर कपडे घालत होता. तेवढ्यात बाजूला असलेल्या पलंगावर ठेवलेल्या मोबाईलने हलकीशी 'बीप' दिली. सुमेधने स्क्रीनकडे पाहिलं. ई-मेल आल्याचे पाहून त्याने तयारी करणे राहू दिले आणि मोबाईल हातात घेऊन उत्सुकतेने ईमेल चेक केला.

'Khanadesh Industries मध्ये Management Trainee म्हणून तुमची निवड झाल्याबद्दल पुन्हा एकदा अभिनंदन.' हे विधान त्याला खूप आनंद देऊन गेलं. रुजू होण्यासाठी शुक्रवार, दिनांक २९ सप्टेंबर रोजी कॉर्पोरेट ऑफिसला हजर राहायला सांगितलं होतं. एच. आर. काळे यांच्याकडे रुजू अहवाल सादर करायचा होता. तो ईमेलमध्ये दिलेली तारीख आणि लागणारी कागदपत्रे पुन्हा-पुन्हा वाचत होता.

कंपनीत रुजू होण्याची तारीख मिळाल्याने सुमेधला फार हलकं वाटू लागलं होतं. त्या उत्साहात त्याने मित्राला फोन करून विचारले,

“कुठे आहे?”

“आत्ताच आलो ऑफिसमधून. बोल, काय म्हणतो?”

“आलोच तुझ्याकडे.” सुमेधनं सांगितलं आणि फोन ठेवून दिला.

रूमच्या बाहेर पडून त्याने गाडी काढली. त्याचा आनंद गगनात मावत नव्हता. रस्त्याच्या वाहतुकीकडे त्याचं लक्ष नव्हतं. शेजारून जाणारी गाडी कट मारून गेली, तेव्हा भानावर आला. समोरच्यावर चिडला नव्हता. सरळ मित्राच्या रूमवर गेला होता.

सुमेधचा फुललेला चेहरा पाहून मित्राने विचारले,

“खुश दिसतो आहे आज. सिगारेट आणल्या की नाही?”

“अरे यार, विसरलोच. जाऊ आपण आज बाहेर.”

“काय विशेष?”

“सांगतो. पहिले पाच हजार रुपये उसने दे. मी लवकरच परत करीन.”

“पैसे तर देईलच, पण सांगशील तर खरं, काय झालं?”

“सांगतो. पहिले पैसे दे.”

मित्राने त्याला पाच हजार रुपये दिले. त्याने खिशात ठेवताना म्हटले,

“त्या दिवशी तू पार्टी दिली होती. आज मी देईल.”

“मग का पार्टीचं सांगत होता फक्त?”

“नाही रे, जॉईनिंग लेटर मिळालं कंपनीचं.”

“अरे व्वा! अभिनंदन. मग नक्कीच पार्टी करू. तू नको, मीच देतो तुला पार्टी.”

“नाही, मीच देतो. माझा आनंद तुला वाटतो.”

दोघेही गप्पा मारत बसले. नंतर त्याच्या मित्राने बाहेर जाऊन दोन सिगारेट आणल्या. त्या पेटवून दोघे झुरका मारत पुन्हा गप्पा करण्यात रमले होते. वेळ पुढे सरकत होती. सूर्य मावळतीला चालला होता. थोड्या वेळाने दोघे नेहमीच्या ठिकाणी पार्टी करायला निघाले होते.

*** *** ***

रोहण आणि हेमंत दोघे वेगवेगळ्या कंपनीत कामाला होते. मात्र दोघांची शिफ्ट एकच होती. त्यामुळे ते दोघे संध्याकाळी रूमवरच असायचे. रोहण आधी येऊन फ्रेश झाला. लॅपटॉप उघडून आधीच्या कामाचे अवलोकन करीत होता. त्याच वेळी तीन दिवसांपूर्वी सुरूचीचा आलेला ईमेल त्याला काट्यासारखा बोचत होता. मध्येच त्याचे लक्ष स्क्रीनवरून उडून जात होते. त्याचे त्याला हादरे बसत होते.

‘तिला आपण जास्तच बोललो. तिचंही ऐकून घेतलं असतं, तर तिने कदाचित असा निर्णय घेतला नसता. आता काही दिवस झाले. आपण मौन पाळून दूर झालो; मात्र त्याचा परिणाम उलट झाला.’

विचार करून तो थकला. जागेवरून उठून किचनमध्ये गेला.

“हेमंत येतो आहे ना रूमवर, की उशीर होईल?” त्याने फोन करून विचारले.

“हो, आलोच पाच मिनिटांत.”

“मी चहा ठेवतो आहे. मग तुझाही ठेवू का?” चहा ठेवताना रोहणनं विचारलं.

“हो, ठेव. आलोच मी.”

चहा होईपर्यंत हेमंत आला. फ्रेश होऊन किचनमध्ये गेला. रोहणनं दोन कपात चहा ओतून एक हेमंतच्या पुढे टेबलवर ठेवला. त्याने विचारले,

“रोहण, अरे, आज कशी काय तुला चहाची तलप लागली होती?”

“काही नाही यार, ऑफिसला थोडं गरगरल्यासारखं वाटत होतं, म्हणून लवकर आलो होतो. लॅपटॉपवर काम करत होतो, तर लक्षच लागत नव्हतं.”

“अरे, तू एकटा नाही आता. सोबत बायको आहे तुला. तिची सवय झाल्याने तिच्यापासून दूर कसा राहू शकशील? असं एकटं राहून तुझं काही भागेल का ”

“काय त यार, बायको जिवंत असून विधुरासारखी गत झाली.”

“त्या दिवशी आपण फोन केले, ते सगळे मिस झाले होते. नंतर काही कॉन्टॅक्ट झाला की नाही?”

“नाही. मी केला नाही आणि तिनेही काही कॉन्टॅक्ट केला नाही. ”

“अरे, इतकं थंडपणे काय सांगतो. काही बिनसलं का?”

रोहणनं नजर चोरून खाली मान घातली. थोडा वेळ तो विचारात पडला. हेमंतनं पुन्हा विचारलं,

“काही तरी झालं आहे; पण तू सांगत नाही. मी फोन करू का सुरूचीला?”

“नको, राहू दे. सर्व संपल्यासारखं वाटतं आहे आता.”

“म्हणजे? फार गंभीर मॅटर दिसतं. मग सांगत का नाही?”

चहा पिऊन झाल्यानंतर दोघं हॉलमध्ये त्यांच्या लॅपटॉपवर त्यांची कामे करत होती. रोहण मनानं सुरूचीकडे, तर हेमंतचं लक्ष रोहणकडे होतं. अधूनमधून तो त्याच्याकडे पाहात होता. चुरघडलेल्या कागदासारखा त्याचा चेहरा पाहून त्याने विचारले,

“रोहण, असं उदास राहून नाही चालणार. मार्ग काढणं आपल्या हातात असतं. फोन करून पाहा अजून एकदा.”

“यार, तिचं सुरुवातीचं हसणं, बोलणं फार छान वाटत होतं. मी तिच्यात माझी ओळख शोधत होतो; पण कुठे काय बिघडलं, काही कळलंच नाही.”

“अजूनही वेळ गेली नाही. चाल, आपण जाऊन भेटू तिला.”

“काही उपयोग होणार नाही. प्रेम आटलं. आता फक्त आठवणी उरल्या.”

“तू सरळ सांगशील की नाही?” हेमंतनं त्याला रागावून विचारलं.

“हे बघ.” हेमंतकडे लॅपटॉप सरकवून रोहणनं तिचा ईमेल दाखविला. त्याने तो वाचला आणि सुन्न झाला.

“का रे, आता काय करायचं?”

“बघू. काय होईल ते.”

“तू काही सांगितलं नाही तिला?”

“काय सांगू? फक्त ‘ओके’ म्हणून तिला रिप्लाय दिला.”

दोघेही काही बोलले नव्हते. डोक्यात 'सुरुची' हीच प्रतिमा दिसत होती. रूममध्ये काही वेळ शांतता पसरली. अंधार पडत गेला. हेमंतने उठून लाइट लावले.

"काय करायचं आता?" त्याने विचारले.

"चाल, जाऊ आपल्या नेहमीच्या ठिकाणावर."

" ते तर जाऊ, पण रोहण, तुला तिचा इमेल आला, ते काही लव लेटर नाही. गंभीर प्रश्न आहे. त्याविषयी विचारतो आहे तुला."

"तिने जर तसा निर्णय घेतला आहे, तर आपण काय करू शकतो?"

" हे बघ रोहण, मला वाटते, शेवटचा प्रयत्न करून पाहा."

"काही उपयोग होणार नाही, ती निर्णयाची फार पक्की आहे. माणूस मेला तरी तिचे मत बदलणार नाही."

" तिच्याकडे जाऊन भेटायला काय हरकत आहे?"

" जाण्यापेक्षा फोन करून पाहू, पण तू कर. कारण मी तिला पॉझिटिव्ह होकार दिला आहे."

" ठीक आहे. आण तो मोबाईल इकडे"

हेमंतने त्याचा मोबाईल घेऊन सुरुचीला फोन लावला. तर 'जिस व्यक्ति से आप बात करना चाहते हैं, उसका मोबाइल स्विच ऑफ है या वह नेटवर्क कवरेज क्षेत्र से बाहर है। कृपया थोड़ी देर बाद पुनः प्रयास करें।' व्हाईस मेसेज आला. हेमंतने आणखी थोड्या वेळाने प्रयत्न केला तर तेच ऐकायला मिळालं.

“ राहू दे, तिला कॉल मिस झाल्याचे दिसेल. तिची इच्छा असली तर कॉल करेल. नाहीतर जाऊ दे,चाल.”

दोघेही ठरलेल्या सिंहगडच्या रस्त्यानं गेले होते. एका निसर्गरम्य वातावरणात असलेल्या रिसॉर्टमध्ये त्यांनी बराच वेळ घालविला होता. मात्र सुरुचीचा फोन काही आलेला नव्हता. त्यांनी तिचं पुरण बंद करून दुसऱ्याच चर्चा सुरु केल्या होत्या.

रोहणचं मन कॉलेजमधील प्रेमाच्या लाटांवर तरंगत होते. ‘सुरु तेव्हा फार गोड आणि जिवाभावाची वाटायची. आताच ती अशी आरोगंट का वाटत असावी? ती तेव्हा कोणत्याही गोष्टीला होच म्हणायची आणि आताच तिच्यात एवढा फरक का बरं पडला.’ तो बोलतानाही वेगळ्याच विचारात दिसत होता. तरी हेमंतने त्याला काही विचारले नव्हते. विचारूनही त्याला काही फायदा वाटत नव्हता.

*** *** ***

शुक्रवारी सकाळी नऊ वाजता सगळी तयारी करून सुमेध ‘खानदेश इंडस्ट्रीज’च्या कॉर्पोरेट ऑफिसमध्ये पोहोचला. मुख्य प्रवेशद्वारावरील सुरक्षा रक्षकाने त्याचं ऑफर लेटर पाहिलं आणि व्हिजिटर रजिस्टरमध्ये नोंद करून रिसेप्शनकडे जाण्यास सांगितलं. तेथे त्याने स्वतःची माहिती दिली. रिसेप्शनवरील कर्मचाऱ्याने फोनवर एच. आर. विभागाशी संपर्क करून सांगितले,

“मॅडम, मॅनेजमेंट ट्रेनी सुमेध जाधव जॉइनिंगसाठी आले आहेत.”

“ठीक आहे. पाठवून द्या.”

सुमेध एच. आर. विभागात गेला.

“बसा. आता येतीलच काळे साहेब.” समोरची खुर्ची दाखवत मॅडम म्हणाल्या.

सुमेधनं मोबाईलमधील घड्याळ पाहिलं. सव्वा नऊ वाजले होते. ऑफिससमोरच्या रस्त्याकडे त्याचे डोळे खिळून होते. एकेक सेकंद त्याला एकेक तास वाटत होता. थोड्या वेळात समोरून एच. आर. काळे येताना दिसल्याने त्याचा चेहरा खुलला होता.

“गुड मॉर्निंग सरsss.” सुमेध बोलला.

“या, सुमेध जाधव. लवकर आलात?” काळे यांनी विचारले.

“आत्ताच आलो सर. थोडा वेळ झाला.”

काळे त्यांच्या खुर्चीत बसले. समोर सुमेधला बसायला सांगितले. त्याच्याकडे पाहून हलकंसं स्मित केलं.

“सुमेध, सर्वप्रथम तुमचं स्वागत आणि खानदेश इंडस्ट्रीजमध्ये निवड झाल्याबद्दल अभिनंदन.”

“धन्यवाद, सर.”

“आपण आधी जॉइनिंगची औपचारिकता पूर्ण करूया.” काळे यांनी जॉइनिंग रिपोर्ट समोर ठेवत सांगितले.

“ओके सर.” सुमेध म्हणाला.

“हे वाचा आणि योग्य त्या ठिकाणी सही करा.”

सुमेधने काळजीपूर्वक फॉर्म वाचून सही केली. काळे यांनी मागितल्याप्रमाणे मूळ कागदपत्रे दिली. मूळ कागदपत्रांशी प्रत्येक

झेरॉक्सची पडताळणी करून त्यांनी फाईलमध्ये व्यवस्थित ठेवली. त्यानंतर त्यांनी वैयक्तिक माहितीचा पी.एफ.साठीचा फॉर्म, नामनिर्देशनाची माहिती आणि गोपनीयतेसंबंधी करार नीट वाचून भरून घेतले. फॉर्म पूर्ण झाल्यावर त्यांनी पुन्हा एकदा सर्व कागदपत्रे तपासली.

सर्व कागदपत्रे बरोबर असल्याची खात्री झाल्यावर काळे यांनी सुमेधचा कर्मचारी क्रमांक तयार केला. संगणकावर काही नोंदी करून त्याचा एम्प्लॉई कोड बनविला. सुमेधनं तो वहीत लिहून घेतला. काळे यांनी लगेच आय.टी. विभागाला मेल पाठवून त्याच्यासाठी लॅपटॉप, अधिकृत ई-मेल आणि सिस्टम ॲक्सेसची प्रक्रिया सुरू करायला सांगितली.

थोड्या वेळाने काळे यांनी पुन्हा सुमेधकडे पाहून सांगितले,

“आजचा दिवस मुख्यतः इंडक्शनसाठी असेल. कंपनीची माहिती, विविध विभागांची ओळख, सुरक्षा नियम आणि काही आवश्यक सूचना दिल्या जातील. त्यानंतर मी तुम्हाला ए.जी.एम. शिरोळे सरांकडे घेऊन जाईन. त्यांच्याशी औपचारिक भेट झाल्यावर तुमच्या विभागात रिपोर्ट करायचं आहे.”

“ठीक आहे, सर.”

“आज पहिलाच दिवस आहे. काही अडचण आली, काही विचारायचं असेल तर संकोच करू नका.”

काळे यांच्या बोलण्याने सुमेध विचारात पडला. त्याने मान खाली घालून पायाच्या अंगठ्याकडे पाहिलं. त्या क्षणी काळे यांनी त्याच्या मनातील गोंधळ ओळखून विचारले,

“काही प्रॉब्लेम आहे का?”

‘काय बोलावं? कसं सांगावं आणि विचारावं?’ त्याला जुळवाजुळव करता आली नव्हती. मग काळेच म्हणाले,

“अरे, काही टेन्शन घ्यायचं नाही. काय असेल ते मोकळेपणाने सांगायचं.”

“सरsss...” सुमेध पुन्हा थांबला.

“बोला जाधव. घाबरू नका. आता तुम्ही या परिवारातील एक सदस्य झाला आहात.”

“सर, आज माझी जॉइनिंग झाली, पणsss?”

“काय जाधव, इतकं टेन्शन नाही घ्यायचं. पण... काय ते तर सांगा?”

“सर, उद्या माझ्या वडिलांचा रिटायर्डमेंटचा दिवस आहे. त्यांनी घरी बोलावले आहे. आज माझी जॉइनिंग झाली. कसं करावं?”

“अरे व्वा! हा तर चांगला योग आहे. वडिलांचे आयुष्य कसे का गेलेले असेना, त्यांना रिटायर्डमेंटचा सोहळा पाहता आला, हे चांगलं नशीब आहे.”

“हो सर.”

“ठीक आहे. आता आपण शिरोळे साहेबांकडे जाऊन त्यांची पाचेक मिनिटांची औपचारिक भेट घेऊ.”

दोघेही शिरोळे साहेबांच्या कॅबिनमध्ये गेले. जाताना सुमेध मागे आणि श्री काळे पुढे होते.

“सरsss...” काळे म्हणाले.

“या काळे. बसा.”

काळे समोरच्या खुर्चीत बसले आणि शेजारी सुमेधला बसायला सांगितले. तेव्हाही त्याच्या चेहऱ्यावर चिंतेचे काळे ढग दिसत होते. त्याच्या मानतील गोंधळ थांबत नव्हता. वाऱ्यासोबत ढगांनी पळत जावे, तसे त्याचे मन गावाकडे धावत होते. शिरोळे साहेब त्याला निरखून पाहात होते. जॉईन झाल्याचा आनंद त्याच्या चेहऱ्यावर दिसत नव्हता. ते म्हणाले,

“मिस्टर सुमेध जाधव, तुमचं स्वागत आहे. कंपनीच्या कार्यसंस्कृतीनुसार तुम्ही काम कराल, अशी अपेक्षा बाळगतो आणि तुम्हाला शुभेच्छाही देतो.”

“थँक्यू सरsss.” त्याच्या आवाज खोल गेलेला होता.

“सर, सुमेधची आज जॉइनिंग झाली; पण उद्या त्यांच्या वडिलांचा रिटायर्डमेंटचा दिवस आहे. त्यामुळे तो जरा कन्फ्यूज झाला आहे.”

“हो, मला माहीत आहे. कालच त्याच्या वडिलांचा फोन आला होता. मलाही त्यांनी त्यांच्या रिटायर्डमेंटला बोलावले आहे.”

“मग सर?”

“मग काय, जावंच लागेल. आणि हो, सुमेधची जॉइनिंग किट त्याला द्या आणि त्याची उद्याची रजाही लिहून घ्या. परवा संडे आहेच. सोमवारपासून तो कामाला सुरुवात करेल.”

“ओके सर. येतो मी.” काळे एजीएमच्या कॅबिनमधून बाहेर पडले.

“सर, येऊ मी?” सुमेधनं विचारलं.

“अरे, कुठे चाल्ला? उद्या एकटा गेलो, तर तुझा बाप मला घरात घेणार नाही.” शिरोळे खाजगीत बोलल्याने सुमेधला बरेच हलके वाटले होते.

“मग काय करायचं सर आता?”

“काळे यांच्याकडून ती किट घे. त्यातील जॉइनिंगचं पाकीट माझ्याजवळ दे. तू सात वाजता माझ्याकडे ये. आपण जेवण करून रात्री दहा वाजता निघू.”

“थँक्यू सर.”

“अरे, थँक्यू कसलं आणि सर कशाला? हे घरगुती मॅटर आहे. काका आहे मी तुझा. जा, तयारी कर.” शिरोळे जरा मिस्किलपणे बोलले. मग सुमेध त्यांचा निरोप घेऊन गेला. त्याला खूप चैतन्य भरल्यासारखं वाटलं.

*** *** ***

शिरोळे यांनी सुमेध आणि सुरुची या दोघांनाही वेगवेगळे फोन करून संध्याकाळी सात वाजता घरी येण्यास सांगितले होते, पण नेमकं का बोलावलं आहे, हे मात्र मुद्दाम सांगितलं नव्हतं.

"संध्याकाळी सातला घरी या... थोडं काम आहे," एवढंच त्यांनी दोघांनाही सांगितलं.

दोघांच्या मनात कुतूहल होतं; पण शिरोळे काकांचा स्वभाव माहिती असल्यामुळे त्यांनी अधिक चौकशी केली नव्हती.

संध्याकाळी नेमक्या सातच्या ठोक्याला सुमेध शिरोळे यांच्या घरी पोहोचला. दरवाजा उघडून तो हॉलमध्ये आला आणि क्षणभर

थांबलाच. समोरच्या सोफ्यावर सुरुची शांतपणे बसली होती. तिच्याही चेहऱ्यावर हलकंसं आश्चर्य आणि तितकंच कुतूहल दिसत होतं.

"अरे... सुरु! तू इथे?"

सुरुची हसली.

"हो. काकांनी सकाळीच फोन केला होता."

"असं? मला तर दुपारी फोन आला. फक्त 'घरी ये' एवढंच म्हणाले."

"मलाही काही कारण सांगितलं नाही."

दोघे एकमेकांकडे पाहून हलकेच हसले. लहानपणापासून अशा अनेक प्रसंगांत शिरोळे काका आधी काहीच सांगत नसत आणि शेवटी एखादं सुखद आश्चर्य देत असत, हे त्यांनी ऐकलं होतं. त्या आठवणी दोघांच्या मनात एकाच वेळी तरळून गेली.

हॉलमध्ये काही क्षण शांतता पसरली. भिंतीवरील घड्याळाची टिकटिक ऐकू येत होती. टेबलावर व्यवस्थित ठेवलेल्या प्रवासाच्या पाण्याच्या बाटल्या, काही बॅगा आणि गुंडाळून ठेवलेल्या शाली पाहून कुठेतरी बाहेर जाण्याची तयारी सुरू असल्याचा अंदाज दोघांनाही आला; पण कुठे आणि कशासाठी, याचं कोडं अजून सुटलं नव्हतं. तेवढ्यात आतल्या खोलीतून शिरोळे बाहेर आले. नेहमीप्रमाणे प्रसन्न चेहरा, हातात कारच्या किल्ल्या आणि ओठांवर हलकंसं स्मित.

"काय मग? दोघेही वेळेवर आलात. छान!"

"हो काका," दोघांनी एकसुरात उत्तर दिलं.

शिरोळे काही क्षण त्यांच्याकडे पाहत राहिले. त्यांच्या डोळ्यांत आज नेहमीपेक्षा वेगळीच ऊब होती.

"तयारी झाली आहे ना?"

"हो काका," सुरुची म्हणाली.

"बरं. आज घरी जेवण नाही. आधी बाहेर जेवून घेऊ. ड्रायव्हर आला की आपण लगेच निघू."

"कुठे जायचं आहे?" सुमेधच्या तोंडून नकळत प्रश्न बाहेर पडला.

शिरोळे फक्त हसले.

"थोडा संयम ठेवा. पोहोचलो की सगळं कळेल."

त्यांच्या त्या गूढ हसण्याने दोघांची उत्सुकता आणखी वाढली.

सुरुची उठून आतल्या खोलीत गेली. तेथे सौ. शिरोळे कपाटातून शाल, औषधांची छोटी पिशवी आणि काही आवश्यक वस्तू एका बॅगेत ठेवत होत्या. त्यांनीही प्रवासासाठी साधी पण देखणी साडी नेसली होती.

"काकू... तुम्हीही येणार आहात?" सुरुचीने सहज विचारलं.

सौ. शिरोळे हसल्या.

"हो गं. इतका मोठा प्रसंग आहे... आम्ही कसे राहणार मागे?"

त्यांच्या आवाजात एक वेगळीच आपुलकी होती.

सुरुचीने काहीच विचारलं नाही; पण तिच्या मनात विचारांचे तरंग उठले. एवढ्या घाईगडबडीत, सगळ्यांना एकत्र बोलावून, बाहेर

जेवून मग प्रवास... नक्कीच काहीतरी विशेष असणार, हे आता स्पष्ट जाणवत होतं.

थोड्याच वेळात ड्रायव्हरने गाडी गेटसमोर आणून उभी केली. शिरोळे यांनी घराचं कुलूप लावलं. सौ. शिरोळे यांनी देवघरात हात जोडून शांतपणे नमस्कार केला. सुमेधने बॅगा उचलल्या. सुरुचीने काकूंचा हात धरला.

चारही जण गाडीत बसले.

गाडी शहराच्या दिव्यांमधून पुढे निघाली.

गाडीत सुरुवातीला हलक्याफुलक्या गप्पा सुरू होत्या; पण शिरोळे मात्र खिडकीबाहेर पाहत शांत बसले होते. त्यांच्या चेहऱ्यावर समाधान होतं, पण त्या समाधानामागे दडलेली एक भावूक प्रतीक्षा कोणाच्याही नजरेतून सुटत नव्हती.

त्यांच्या मनात एकच विचार घोळत होता, 'आयुष्यभर इतरांसाठी जगलेल्या सखारामला, त्याच्या आयुष्यातील या अविस्मरणीय क्षणी, त्याच्या मुलांसोबत उभं राहण्याचं सुख मिळायलाच हवं. गाडी वेगाने गावाच्या दिशेने धावत होती... आणि प्रत्येक मैलागणिक त्या भेटीचा क्षण अधिक जवळ येत होता.

सखारामच्या सेवा निवृत्ती समारंभासाठी गावाला जाणं, हे त्याचं कारण होतं प्रवासाची व्यवस्था, कार्यक्रमासाठी आवश्यक वस्तू, सगळं त्यांनी बारकाईने पाहिलं होतं. सखारामच्या दोन्ही मुलांना

सोबत नेऊन त्या मित्राला आश्चर्याचा सुखद धक्का त्याला द्यायचा होता.

*** *** ***

भोळेनं सखारामला फोन करून विचारलं,

“कुठं हाये साहेब?”

“घरी.”

“जेवण झालं?”

“नाही अजून.”

“मग या न चौकात.”

“बरं, आलोच.”

सखारामनं कपडे घातले. बाहेर जायला निघाला.

“आता कुढी चाल्ले?” सरूनं विचारलं.

“आलोच.”

“जेवण करून घ्या. मग जा.”

“आलो लगेच.”

सखाराम गाडी काढून बाहेर पडला. भोळे वाट पाहात होता. दोघांची भेट झाली. सोबत पार्सल घेऊन ते भगीरथ ढाब्यावर गेले. त्यांचा नेहमीचा प्रोग्राम सुरू झाला. भोळे म्हणाला,

“साहेब, आता उद्या तुमचा शेवटचा दिवस. मग ऑफिसची कटकटच नाही.”

“भोळे भाऊसाहेब, मी आयुष्यात कधी कटकट करून घेतलीच नही.”

“तुमचं एक चांगलं हाये साहेब. तुम्ही कधी टेन्शन घेत नही.”

“भोळे, अहो, आयुष्यात कधी रडायचं नसतं. लढायचं असतं. हे मी अनुभवानं शिकत गेलो.”

“मग साहेब, एक करा. त्या संकेत पाटीलकडून पैसे कसे काढायचे? ते बघा.”

“भोळे, तुमचे तरी तीन लाख रुपये आहे. मह्ये त सत्तावीस लाख रुपये बाकी आहे. मग?”

“तुमची गोष्ट वेगळी हाये साहेब.”

“काय वेगळी असणार? रिटायर्ड होतो हाये; पण अजून डोक्यावर कर्ज हायेच की नही?”

“साहेब, जेवण करायचं नं?” म्हणून भोळेनं विचारलं,

“घरी स्वयंपाक तयार हाये. तू म्हटलं म्हणून आलो.”

“जाऊ द्या न आता. ते सकाळी खाजा.”

“ठीक हाये.” सखाराम म्हणाला.

भोळेनं जेवणाची ऑर्डर दिली होती. दोघांनी जेवण केल्यावर सखारामनं बिल भरलं. घरी परत जाताना भोळे म्हणाला,

“साहेब, असं करा न. तुम्ही मला तीन लाख रुपये देऊन टाका. मग ते पाटीलकडून घेजा.”

“पाहू न काय कऱ्याचं ते.”

दोघेही त्यांच्या घरी पोहोचले. सखारामच्या डोक्यात संकेत आणि पैसे होते. 'उद्याचा शेवटचा दिवस आणि सर्व आयुष्यभराचा हिशेब.' विचार करून सखाराम झोपला.

*** *** ***

सकाळी उठल्यापासून सखारामभोवती एकच विचार गोलगोल फिरत होता. 'आज नोकरीचा शेवटचा दिवस. उद्यापासून निवृत्त आयुष्य सुरू होणार. ना दगदग, ना धावपळ. रोज तेच असणार घर... फक्त घर. निवांत, सुस्त, शांत. लोकं नाहीत, त्यांच्या फायली नाहीत, निर्णय नाहीत, जबाबदाऱ्या नाहीत. निष्क्रिय जगणं. हळूहळू माणूस कोणाच्या ध्यानीमनीही राहत नाही. रस्त्याच्या कडेला पडलेल्या दगडासारखा... घरातल्या अडगळीतल्या एखाद्या जुन्या वस्तूसारखा. खायला काळ आणि भुईला भार... पण काही असो. इतकं आयुष्य तरी निभावून नेलं, हेच काय कमी आहे?' या विचारांच्या गर्दीतच ऑफिसला जाण्याची वेळ झाली. त्याने शांतपणे तयारी केली. तेवढ्यात गेटसमोर येऊन एक सेव्हन-सीटर गाडी थांबली. गाडीचा आवाज ऐकताच तो उत्सुकतेने खिडकीजवळ गेला.

सर्वप्रथम गाडीतून शिरोळे उतरले. क्षणभर सखारामचा स्वतःच्या डोळ्यांवर विश्वासच बसला नव्हता. शिरोळे त्याच्या मुलीच्या लग्नाला आणि नंतर घराच्या वास्तुशांतीलाही आले होते. त्यानंतर ते तिसऱ्यांदा त्याच्या दारात उभे होते.

सखाराम अजूनही खिडकीतूनच पाहत होता. शिरोळेंच्या मागोमाग सौ. शिरोळे उतरल्या. मित्र पत्नीसह आल्याचं पाहून त्याच्या चेहऱ्यावर हलकंसं हास्य उमटलं. तो घाईघाईने गेट उघडण्यासाठी बाहेर आला. इतक्यात गाडीच्या मागच्या सीटवरून सुमेध आणि सुरुची खाली उतरले. दोघांनाही पाहताच त्याच्या चेहऱ्यावर आश्चर्य अधिकच गडद झालं.

“अरे... गणा! तू तर कमालच केली. मले शंका होती. तू येणार की नाही? पण सगळ्यांनाच घेऊन आला. चांगलं झालं. ये.”

“मी हक्काचा माणूस. माझ्यावरच शंका घेणार तू.” शिरोळे थोडं हसून म्हणाले.

शिरोळे यांनी सखारामला कडकडून मिठी मारली. एक शांत स्पर्श. त्या दोघांनाही गहिवरून आलं.

सुमेधनं गाडीतून सामान उतरवलं. सुरुची तिची बॅग घेऊन वरच्या खोलीत गेली. सुमेधनंही आपलं सामान ठेवून शिरोळेंच्या बॅगा शेजारच्या खोलीत ठेवल्या. तो परत खाली न येता त्याच्या खोलीत झोपून राहिला. रात्रभर प्रवास झाला आहे; मुलं थकली असतील,' सरूने मनाशी म्हटलं. ती किचनमधून येऊन सौ. शिरोळे यांच्याजवळ येऊन “कशा हाये ताई?” म्हणत त्यांच्या शेजारी बसली.

“आम्ही छान आहोत. तुमचं कसं चाललं?”

“बरं चाल्लं.” सरू थकल्यासारखी बोलली, जशी तीच प्रवास करून आली होती.

“बोल सखा, तब्बेत कशी आहे तुझी?” शिरोळे यांनी विचारलं.

“ही अशी हाये.” सखारामनं स्वतःच्या शरीराकडे पाहत हलकंसं हसण्याचा प्रयत्न केला.

दोघं मित्र बोलत बसल्यानंतर सरू म्हणाली,

“चाला ताई, या.”

दोघी किचनमध्ये गेल्या. सारूनं चहा करून हॉलमध्ये नेऊन दिला.

किचनमध्ये दोघींनी चहा घेतल्यानंतर सरूनं सौ. शिरोळे यांना वरच्या रूममध्ये नेलं. फ्रेश होऊन खाली यायला सांगितलं.

सखाराम आणि शिरोळे चहा घेत बोलत बसले होते.

“तू कधी पुण्याला येत नाही का? आमची आठवण कधी येते की नाही?” शिरोळे यांनी सहज विचारलं.

“बऱ्याचदा वाटतं, पण आमच्या मिटिंगा इतक्या असता की वेळच मिळत नाही.”

“माझं तर फारच कठीण काम आहे. आमचे महाराष्ट्राबाहेर बरेच युनिट आहे. त्यामुळे तेथे जावं लागतं बऱ्याचदा.”

“वर्गमित्रांचा हाच एक ड्रॉबॅक असतो. एकदा इकडे-तिकडे मार्गाला लागले की, पुन्हा एकत्र येणं, भेटी होणं कठीणच असतं.” सखाराम म्हणाला.

“हो ना, त्याला काही इलाज नसतो. संसारपाण्यासाठी नुसती धडपड चाललेली असते.”

“काय म्हणता मुलंबाळं? कसे हाये? काय करता?” सखारामनं विचारलं.

“छान आहे. एकच मुलगा आहे. त्याचंही चांगलं आहे.” हे ऐकून सखाराम थोडा गप्प बसला. त्याच्या चेहऱ्यावरील बदल शिरोळे यांच्या नजरेतून सुटला नव्हता. मग सखारामनं पुन्हा विचारलं,

“त्याला नाही आणलं?”

“तो एका कंपनीत एम.डी. आहे. त्याला म्हटलं होतं, ‘चाल सोबत. यानिमित्ताने तरी गावाकडे जाता येईल.’”

“आला असता त चांगलं झालं असतं. भेट झाली असती.” सखाराम म्हणाला.

“त्याचं शेड्युल फार बिझी असतं, म्हणून आला नाही.”

“अस्सं! बरं, तू फ्रेश हो. मी ऑफिसला जाऊन येतो.”

“ओके, तू जाऊन ये. आम्ही जरा आराम करतो. मग दुपारी सांगतो तुला, काय करायचं ते.”

सखारामला ऑफिसला जायला थोडा उशीर झाला होता. ‘साहेब नेहमी वेळेच्या आधी येतात. आज कसे काय उशिरा आले?’ शिपायाने मनाशीच प्रश्न केला. तरीही विचारले,

“साहेब, आज उशीर झाला?”

“हो, मी यायला निघालो, तेव्हाच पुण्याचा मित्र आला.”

“अस्सं, आम्ही सगळी तयारी करून ठेवली हाये.” शिपायानं सांगितलं.

सखारामनं काही न बोलता नेहमीप्रमाणे मस्टरवर सही केली. नेहमीच्या जागेवर येऊन बसला. टेबलवरील शेवटच्या फायली पूर्ण केल्या. तातडीच्या पत्रांवर सह्या करून राहिलेल्या कामाचा आढावा घेतला. त्याच्या नोंदी केल्या. जे जे राहिलं त्या त्या गोष्टी आठवत एकेक फाईल व्यवस्थित लावून ठेवत होता. त्यावेळी त्याला वेगळंच वाटत होतं, काही सुचत नव्हतं.

सखारामशी संबंधित असलेल्या शाखांचा कार्यभार, नोंदवह्या, सरकारी शिक्के, कपाटाच्या किल्ल्या, बाकी राहिलेल्या प्रकरणांची संख्या, न्यायालयीन प्रकरणे आणि काही रक्कम व महत्त्वाची कागदपत्रे, अशा काही गोष्टींचा मजकूर टाईप करून क्लर्कनं चार्ज रिपोर्ट तयार केला. नंतर श्री. मंगेश मोरे यांच्याकडे कार्यभार सोपविण्याबाबत जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात आली.

सखारामनं दुपारी तीन वाजता 'कार्यभार दिला' आणि मोरे यांनी 'कार्यभार स्वीकारला', अशा लेखी कबुलीपत्रावर दोघांनी सह्या केल्या. त्यावेळी सही करताना 'सरकारी कार्यालयाचा अडतीस वर्षांचा प्रवास एका क्षणात संपतो आहे,' असं मनात आल्यानं सखारामला छाती जड झाल्यासारखं वाटत होतं. मनात सगळा अंधार तयार होऊन समोर धूसर दिसत होतं. त्याला काही भान उरलं नव्हतं. तो समोर शून्य नजरेने पाहात होता. कार्यालयातील सिनियर क्लर्कनं साक्षीदार म्हणून सही केल्यानंतर कार्यभार दिल्या-घेतल्याची प्रोसेस पूर्ण झाली होती.

‘आता ही जागा आपली नाही. इथे आपलं काही राहिलं नाही. जे खाजगी ते इथे ठेवता येणार नाही.’ सखारामनं जरासा विचार केला. त्यानं त्याच्या टेबलावरच्या काचेखाली ‘करुणा आणि मनःशांतीची आठवण’ करून देणारा ‘नमो अमिताभ’चा लॅमिनेट केलेला एक कार्डसाईज फोटो ठेवला होता. जेव्हा-जेव्हा त्याचा टेबल बदलायचा, त्या-त्या वेळी त्याला कोणी तरी भेट दिलेला तो फोटो त्या नव्या टेबलवर ठेवायचा. आता त्याला कोणताच टेबल नव्हता, म्हणून त्यानं क्षणभर त्याकडे पाहिलं. रोज दिवसभर जेव्हा-जेव्हा मनात पोकळी निर्माण व्हायची तेव्हा तेव्हा त्याचं लक्ष त्या फोटोकडे जायचं. मग बरं वाटायचं. तो फोटो घरी नेण्यासाठी त्याने बॅगमध्ये ठेवला. वैयक्तिक डायरी आणि मिळालेल्या पुरस्काराचे दोन मेमेंटोही ठेवले. ‘बाकी आपलं काहीच नसतं इथे. आपण गेलो की मागे जे उरतं ते दुसऱ्याचं होतं.’ असं मनात आणून बॅग लावारिससारखी बाजूला ठेवली.

ऑफिसमध्ये आल्यापासून ‘लवकर कार्यक्रम संपून पाच वाजेपर्यंत घरी जाता आलं पाहिजे,’ सखारामला याची चुटपुट लागून होती. मात्र दुपारी चार वाजता प्रांत अधिकारी आले. मग सर्व कर्मचारी, मंडळ अधिकारी, तलाठी, लिपिक सर्व मंडळी मिटिंग हॉलमध्ये जमली. सत्काराचा कार्यक्रम सुरू झाला. प्रांत अधिकारी यांच्या हस्ते शाल, श्रीफळ आणि बुके देऊन सत्कार करण्यात आला.

“सखाराम जाधव साहेब पदाने नायब तहसीलदार होते, हे खरे. पण आमच्यासाठी ते मार्गदर्शक मित्र होते. पदाचा अधिकार किंवा रुबाब कधी त्यांनी दाखवला नाही. कोणतेही काम असले, तरी समजून

सांगायचे. कधीकधी आमच्या निष्काळजीपणाबाबत फक्त समज द्यायचे नाही, तर नैतिकतेची जाणीव करून द्यायचे. त्यावेळी आमची लाज उघड व्हायची. त्याचं कधी वाईट वाटलं नव्हतं. कारण त्यांचं बोलणं खरं असायचं. त्या बोलण्यात वजन असायचं. आमची चूक झाली, तरी त्यांची भीती वाटायची नाही. इतकं ते सांभाळून घेऊन काम पूर्ण करून घ्यायचे." मंडळ अधिकारी यांनी मनोगत व्यक्त करून शुभेच्छा दिल्या.

"दीड-दोन वर्षांआधी सखाराम जाधव इथे रुजू झाले. त्यावेळी त्यांचं स्वागत करताना आणि ते इथून जाणार आहेत, म्हणून आत्ता त्यांच्याविषयी बोलताना, दोन्ही वेळच्या भावनांमध्ये मला खूप फरक जाणवतो आहे.

जाधव आले होते, तेव्हा त्यांचं नाव ऐकून होतो. तरीही 'काम व्यवस्थित करतील की नाही? सहकार्य चांगलं मिळेल की नाही?' अशी शंका यायची. कारण रिटायर्डमेंटचे काही महिने राहिले, की 'एक बेफिकिरीची मानसिकता तयार होते. आता काय थोडेच दिवस राहिले,' या विचाराने बरेच सहकारी मित्र जबाबदारीकडे दुर्लक्ष करतात. मात्र जाधव यांच्या बाबतीत तसं कधी वाटलंच नव्हतं.

जाधव यांचं काम इतकं छान असायचं, की वरिष्ठ अधिकाऱ्याकडून कधी मला दोन शब्द ऐकायची वेळ आली नाही. त्यामुळे असे सहकारी मित्र कधी सोडून जाऊच नयेत, असं वाटतं; पण नियम मोडता येत

नाही. ते आपण स्वीकारले पाहिजे.” तहसीलदार यांनी सखारामला निरामय आरोग्याच्या शुभेच्छा देऊन त्यांचं भाषण संपवलं.

सखाराम त्याचं मनोगत व्यक्त करण्यासाठी उभा राहिला. काही वेळ काय बोलावं, त्याला काही सुचलंच नव्हतं. वाकड्या-तिकड्या रेषांनी बनलेल्या त्याच्या आयुष्यातील घटनांचा पट त्याच्या डोळ्यांसमोर उभा राहिला होता. ‘काय सांगावं? काय सांगू नये?’ याची वजाबाकी केली. कोणं किती फसवलं, लुबाडलं, त्यामुळे काय नुकसान झाली, नोकरीत काय त्रास झाला, हे वजा करून तो म्हणाला, “मी चांगला की वाईट, हे मला सांगता येणार नाही, पण मी माझ्या जगण्याचे काही तत्त्व ठरवून ठेवले होते.

तसं तर आपण कीही ठरवू शकत नाही. संस्कार आणि नीतीनियम आपल्यावर प्रभाव टाकतात. तो प्रभाव सगळ्यांवर सारखा पडत नाही. माझ्यावर माझ्या वडिलांचा प्रभाव पडलेला असेल, म्हणून मला माणसांविषयी लोभ वाटतो.

माणसं चांगले आसता. त्यांच्या चांगुलपणासाठी आपण चांगलं राहिलो, की दयाभाव तेथे निर्माण होतो. मग मनाला शांती लाभते, असं मला वाटायचं, म्हणून बहुतेक माझ्या टेबलावर ‘नमो अमिताभ’चा फोटो होता. मले कधी पैसे आणि संपत्तीची हाव सुटलीच नव्हती. राहायला मोठं घर, दोन वेळेस चांगलं खायला मिळालं, यातच मी समाधानी होतो.

माझ्या मुलानं चांगल्या मर्कानं एम.बी.ए. केलं. आज ना उद्या त्याले नोकरी लागीनच. त्याच्याकडून बळजबरीच्या अपेक्षा केल्या नही. मुलीने परस्पर लग्न केलं. जावई पण अजून पाहिला नाही. 'तो तिचा निर्णय होता.' ती इंजिनियर हाये. एका कंपनीत भरपूर पगाराची नोकरी हाये. यात मी समाधान मानले. कारण पुढे तिचं तिला जगायचं हाये त तिच्या मनासारखं होऊ द्याचं, असं मी ठरवलं होतं."

सखाराम सांगत होता; पण त्याच्या बोलण्यात गहिवर जाणवत होता. चेहऱ्यावर आनंद दिसत नव्हता. त्याच्या मुलांबाबत सहकाऱ्यांना कीव वाटली होती. सर्वांकडे पाहून सखाराम पुन्हा बोलला,

"आणखी काय सांगणार! एवढंच की, जीवनाबद्दल मला कोणतीही तक्रार नाही. आपण सर्वांनी मला सांभाळून घेतलं, माझ्यावर प्रेम केलं. त्याबद्दल सर्वांचा ऋणी आहे."

सखारामचं बोलणं संपल्यानंतर प्रांत अधिकाऱ्यांनी अध्यक्षीय भाषण केलं.

"सखाराम जाधव म्हणजे कर्तव्यनिष्ठ व्यक्ती आहे. चांगला अधिकारी कसा असावा, हे तहसीलदार यांच्या बोलण्यातून आपल्या लक्षात आलेच असेल. मीही सखारामचं काम पाहिलं आहे. विविध अहवाल तयार करून वेळेवर पाठवत असत. त्यांना आठवण करून देण्याची वेळ कधी आलेली नव्हती. वेगवेगळ्या बैठकांमध्ये कामाचा आढावा घेताना ज्या सूचना दिल्या जायच्या, त्याची अंमलबजावणी त्यांनी केलेली असायची. कार्यालयाची तपासणी करताना त्यांच्या कामाचा

उरक आणि चोखपणा लक्षात यायचा. ते विशेष मोहिमा राबविण्यात उत्साही असत. ताबडतोब कार्यवाही करत. त्यामुळे एक आदर्श अधिकारी म्हणून त्यांची प्रतिमा उजळ आहे. त्यांना मिळालेले पुरस्कार योग्यच आहेत. त्यांचं भावी आयुष्य सुख-समृद्धीचं जावो आणि त्यांना उत्तम आरोग्य लाभो, ही प्रभूचरणी प्रार्थना करतो."

शेवटी आभारप्रदर्शनानंतर टाळ्यांच्या गजरात कार्यक्रम संपला. चहा-फराळ झाला. रिलीव्ह ऑर्डर दिल्यानंतर सखारामनं घड्याळाकडे पाहिलं. पाच वाजले होते. तो घरी जायला घाई करत होता. तसं सांगताही येत नव्हतं. 'शेवटचा दिवस आणि जाण्याची घाई' नको कोणाला वाटायला. मग शांत व्हायचा. ऑफिसचे सहकारी त्याला भेटून निरोप देत होते.

"साहेब, तुम्हाला पुढील वाटचालीस मनापासून शुभेच्छा!" एक जण म्हणाला.

"काही लागलं तर फोन करा बरं, साहेब." दुसरा बोलला.

एकेकाच्या हातात हात घेऊन सखाराम तेथून निघण्याची घाई करून तहसीलदारांना म्हणाला,

"बरं साहेब, येतो मी. माझी गरज पडली तर केव्हाही फोन करा. येईल मी." "थांबा जाधव, घरची गाडी बोलविली आहे. घरचा ड्रायव्हर तुम्हाला सोडून देईल."

"नको साहेब, कशाला त्रास घेता?"

“तसं काही नाही जाधव. एक-दीड वर्ष तुम्ही एस.टी.ने ये-जा केली. आज मी तुम्हाला माझ्या गाडीने सोडतो. मला आनंद आहे त्यात.”

बोलत असतानाच आवारात तहसीलदारांची खाजगी गाडी आली. सखाराम गाडीत बसल्यानंतर त्याने सहकाऱ्यांकडे एक नजर टाकून खिडकीतून हात बाहेर काढला. सर्वांनी टाटा-बाय-बाय करून हात दाखविले. त्याचे सगळे लक्ष घराकडे लागून होते.

शिरोळे यांनी घड्याळाकडे पाहिलं. साडेपाच वाजले होते. सखाराम आलेला नव्हता, म्हणून त्यांनी फोन लावला.

“अरे सखा, घरी येशील की तिकडेच मुक्कामी आहे?”

“आलोच. थोड्या वेळात.”

“लवकर ये. आम्ही सगळे तयारी करून बसलो आहे.”

“हो, रस्त्यानंच हाये. आलोच.”

शिरोळे यांनी फोन कट केला आणि लगेच सुमेधला लावला.

“हां काका, बोला?”

“सुमेध, झाली का बेटा तयारी?”

“हो काका. पप्पा आले आहेत का?”

“येता आहे. थोड्याच वेळात.”

“आले की या. सहा वाजून गेले आहे.”

“हो, लवकर येतो आम्ही.”

दोघांचे बोलणे झाले. शिरोळे हॉलमध्ये टीव्हीवरील बातम्या पाहात होते, पण त्यांचं लक्ष सखारामकडे लागून होतं. सरू आणि सौ. शिरोळे तयारी करून किचनमध्ये बसल्या होत्या. सुरूची अजूनही तिच्या रूममध्ये तयारी करत होती. सरूनं गॅसवर चहा ठेवला होता.

घराच्या गेटसमोर गाडी थांबली. सखाराम खाली उतरला. हातातील बॅग गळ्यात लटकावली. खिशातून पाचशे रुपयांची नोट काढून ड्रायव्हरला म्हणाला,

“हे घे मित्रा.”

“नको साहेब. राहू द्या.”

“अरे, असू दे. तुला भेट.”

“नको साहेब. ते माझे साहेब, तसे तुम्ही.”

“तू असं म्हणतो न? मग घे. आज विशेष दिवस आहे. माझ्याकडून पार्टी करून घेशील.”

“राहू द्या साहेब. जातो मी. आलेच तिकडे, तर आठवण ठेवा गरिबाची.”

“बघ, तू पैसे नही घेतले त मले वाईट वाटेल.”

शेवटी ड्रायव्हरनं पैसे घेऊन गाडी वळवली आणि परत निघून गेला. सखारामनं गेट उघडलं. गेटचा आवाज आल्यानंतर शिरोळे यांनी खिडकीतून बाहेर पाहिलं. सखाराम पाहून दरवाजा उघडला आणि विचारले,

“अरे, इतका वेळ का बरं?”

“प्रांत अधिकाऱ्यांना बोलावले होते कार्यक्रमाला. ते उशिरा आले. म्हणून---”

“म्हटलं का बसला तिकडेच सहकाऱ्यांसोबत पार्टी करत?” शिरोळे हसून बोलले.

“पार्टी आणि तुले सोडून?” मग सखारामही हसला.

“बरं, जा. फ्रेश हो आणि तुझ्यासाठी छान ड्रेस आणला आहे. तो घालून ये.”

“का बरं, घरात घालून काय करायचं?”

“बाहेर जायचं आहे आपल्याला. आमची तयारी झाली आहे.”

“पण कुठे?” सखारामनं विचारलं.

“तुला काय करायचं आहे? आमच्यासोबत चाल. आम्ही काही वृद्धाश्रमात नेणार नाही तुला.”

सखाराम त्याच्या मास्टर बेडरूममध्ये गेला. सरू किचनमधून त्याच्याकडे आली. तिनेही नवी साडी घातलेली होती. तिला पाहून ‘काय चाललं?’ त्याला काही कळेना. मग त्यानं विचारलं,

“कुढी जायाचं हाये?”

“मलेबी माहिती नही. त्या ताईनं साडी दिली आन् तयारी कऱ्याले सांगलं, त केली तयारी.”

“हा गण्या पहिल्यापासून असाच हाये. सुमेध कुठे?”

“तो बाहेर गेला हाये.”

सखाराम फ्रेश होऊन आला, तोपर्यंत सरूनं बेडवर नवा ड्रेस काढून ठेवला होता. तो पाहून म्हणाला,

“अगं, हे काय! थ्री पीस?”

“हो, दादांनीच आणलं हाये. पोरांना कपडेबी आणले.”

सखाराम काही बोलला नाही. त्याने बॅगमधील सामान काढलं. सरूला जागेवर ठेवून द्यायला सांगितलं. कागद, पेन आणि पैसे बेडवर ठेवले. एक पाकीट घेतलं. ड्रॉवरमधून चेकबुक काढलं. त्याच्या पतपेढीनं जमा वर्गणी आणि शेअर्स मिळून बारा लाखांचा चेक दिला होता. तेवढी रक्कम त्या चेकवर लिहिली आणि नाव लिहिलं, ‘गणेश शामराव शिरोळे’. तेव्हा त्याला फार हलकं वाटलं होतं.

सखारामनं कपडे घातले. कोटाच्या खिशात ते पाकीट ठेवलं. हॉलमध्ये आला. त्याला पाहताच शिरोळे म्हणाले,

“वहिनी, पाहिला आपला हिरो?”

सगळे हसले; पण सुरूची हसली नव्हती. ती विचारात होती.

“कारे, काय गरज होती एवढं कऱ्याची?” सखाराम बोलला.

“फॉर्मलिटी असते रे ती कपडेलत्त्याची. त्यात काय विशेष आहे?”

“अरे, पण आपण काय परके हाये का? एवढं करत बसला तं.”

“चाल, उशीर होतो आहे.”

“कुठी जायाचं, ते तं सांग. सुमेध कुठे हाये? त्याला तं येऊ दे.”

“सगळं सिक्रेट आहे. चाल तू.”

“तुह्य तं नेहमी सरप्राइजच असतं. लवकर कधी सांगतच नही. थांब जरा.”

“आता काय राहिलं?”

सखारामनं खिशातून ब्राऊन कलरचं बंद पाकीट काढलं. शिरोळे यांच्या समोर केलं.

“हे घे, ठेव.”

“काय आहे हे?” पाकीट हातात न घेता शिरोळे यांनी विचारलं.

“तू आधी हे घे. मंग सांगतो.”

“आधी तू सांग, मग मी घेतो.” शिरोळे म्हणाले.

“घेशील तेव्हा तं सांगीन नं?”

“नाही, आधी सांग. मग घेईल.” शिरोळे पाकीट घेत नव्हते.

“घे नं यार. आयुष्यभर चटके सहन करत गेलो रे. बायकोशिवाय त्या जखमांवर फुक मारणारं कोणी नव्हतं. शेवटी तू भेटला आणि---”

सखारामचा कंठ दाटून आला होता. त्याचे डोळे पाण्याने डबडबले होते. हुंदका आवरत होता. मग सगळ्यांचे डोळे पाणावले होते. शिरोळे सोफ्यावरून उठून सखारामला मिठी मारत म्हणाले,

“मला माहीत आहे. तू फार स्वाभिमानी आहे. आणि त्या पाकिटात काय असेल, तेही माहीत आहे. ते राहू दे तुझ्याकडे. पेन्शन येईपर्यंत तुझा खर्च भागेल त्यात.”

“नही गणा, मह्यासाठी नही म्हणत मी. सुमेधसाठी म्हणतो.”

“झालं ना त्याचं सगळं. तू कशाला चिंता करतो.” शिरोळे यांनी धीर दिला.

“तेच म्हणतो मी. दोन-अडीच वर्ष झाले, त्याचा सगळा खर्च तू केला आहे. त्यामुळे तो खूप चांगल्या मर्कानं पास झाला.”

“अरे, तुझा मुलगा काय आणि माझा मुलगा काय? काय फरक पडतो?”

“तसं नही गणा, सुमेधनं एम.बी.ए. करण्याचा निर्णय घेतला होता, तेव्हा माझ्याकडे पैसे नव्हते. त्याच वेळी सुरुच्या शेवटच्या वर्षाची फी भरायची होती.”

“अरे, झालं नं सगळं ठीक? मग आता तो विचार करू नको.”

“तू ऐकून तं घेशीन. मी मह्या इचार करत नाही. त्याला सांगलं होतं. शिरोळे काका तुले पैसे लावतीन खरं, पण नोकरीले लागला की त्यांचे पैसे परत कऱ्याचे.”

“मग तू कशाला चिंता करतो? तो देईल नं माझे पैसे.” शिरोळे म्हणाले.

“गणा, मले मही चिंता नही. त्याची हाये. त्याले नोकरी लागली असती तं तुह्यासमोर सांगलं आस्तं की पगार झाल्यावर काकांचे पैसे द्यायचे.”

सखारामचं बोलणं ऐकून शिरोळे मनातल्या मनात हसून म्हणाले,

“देईल ना मग तो. तू काही काळजी करू नको.”

“सुमेधला त्या गोष्टीचा ताण येऊ नये, म्हणून म्हणतो. मह्यासाठी नही. त्याच्यासाठी हे ठेव. नाहीतर एक बाप म्हणून माझं मन मला खात राहील.” पुन्हा सखारामला गहिवरून आलं.

“ठीक आहे. दे ते पाकीट. त्यात काय आहे, ते मी पाहिलं नाही आणि तू सांगितलं नाही. चाल आता.”

शिरोळे यांनी पाकीट घेतलं आणि सौ. शिरोळे यांना वर सुटकेसमध्ये ठेवायला सांगितलं. सुरुची तयारी करून खाली आली. सरूनं पाणी आणलं. दोघे मित्र पाणी पिऊन शांत झाले. नंतर सखारामनं सुरूचीला विचारलं,

“सुरु बेटा, तब्बेत ठीक नही का? तू इतकी गुमसुम का बरं बसली एवढी?”

“काही नाही. असंच.” तिनं सांगितलं.

“चाल आता, उशीर होतो आहे.” शिरोळे म्हणाले.

कोणी काहीच बोलले नव्हते. गेटला कुलूप लावून गाडीत बसले. ‘कुठी जायचं आहे?’सखाराम आणि सरू यांच्या मनात प्रश्न कायम होता.

संध्याकाळचे सात वाजले होते. गाडी एका लॉनसमोर थांबली होती. गाडीतून सगळे उतरल्यानंतर शिरोळे म्हणाले,

“या, चाला----”

“अरे, इकडे कुठी आणलं तू? मले वाटलं बाहेर जेवायला जायचं हाये का?”

“ये चाल, सांगतो तुला.”

समोरचा लॉन लाईटिंगनं सजला होता. आकर्षक वाटत होता. आजूबाजूला सखाराम आणि सरू, तसेच सखाराम, सरू आणि त्यांची मुलं, यांचे पोस्टर लावले होते. आजूबाजूला ओळखीची माणसं

दिसत होती. कोणी तरी जवळ येऊन शुभेच्छा देत होते. ते पाहून सखारामच्या लक्षात आलं होतं. तरी त्यानं आश्चर्यानं विचारलं,

“अरे, हे काय?”

“हो, हे असंच आहे.”

“साला, लय बदमाश हाये तू. माणसाचा जीव जायला येतो, तरी सांगत नही.” सखाराम म्हणाला.

“त्याशिवाय मजा येत नही रे. चला, स्टेजवर.”

सखाराम शिरोळे सांगेल तसे त्याच्या हो’ला हो’ लावून सोबत चालत होता. सुमेधने सगळी तयारी करून ठेवली होती.

ते पाच जण स्टेजवर गेले. सुमेध वाटच पाहात होता. ते जाताना सूत्रसंचालकानं टाळ्यांच्या गजरात प्रेक्षकांना स्वागत करायला सांगितलं. जोरदार टाळ्यांचा आवाज झाला. त्या आवाजात सखाराम मनोमन खुश झाला. स्वतःचे भान हरपून गेला.

शिरोळे पती-पत्नी आणि सखारामची फॅमिली स्टेजवर बसली होती. समोरच्या टीपॉयवर केक होता. सूत्रसंचालकानं सखारामच्या कुटुंबाचा परिचय करून दिला. नंतर—

"रुतबा तो कुर्सी का होता है जनाब,

इंसान की पहचान उसके किरदार से होती है।”

असा एक शेर सादर केला. प्रेक्षकांनी टाळ्या वाजवल्या. नंतर केक कापला.


मैत्रीचा मान
सखारामचा सन्मान
हार्दिक अभिनंदन
सखाराम जाधव
निवृत्तीनंतर नवीन प्रवासासाठी
शुभेच्छा!
सन्मान कृतज्ञतेचा मैत्रीचा!
Happy Retirement
Sakharam
मैत्री अशीच जपूया आयुष्यभर...
रक्ताच्या नात्यापेक्षा
जपलेली मैत्री मोठी असते.

"ईमानदारी की राह पर चलने वाले लोग,
विदा तो होते हैं, भुलाए नहीं जाते।”

पुन्हा एक शेर सादर करून जोरदार टाळ्या वाजवायला सांगितल्या. त्या आवाजात सखाराम आणि त्याच्या मुलांनी आई-वडिलांना केक खाऊ घातला. मग शिरोळे पती-पत्नीनं केक भरविला. सगळं वातावरण उत्साहानं न्हाऊन निघालं होतं. सखारामला राहून-राहून गहिवरून येत होतं.

शिरोळे यांच्या मैत्रीबाबत सूत्रसंचालकानं एक शेर सादर केला,

"दोस्त वही है जो ख़ामोशी भी पढ़ ले,
हर दर्द बिना कहे समझ ले।”

पुन्हा टाळ्या वाजल्या; पण कमी आवाज आला.

“इतक्या सुंदर क्षणी आपण जोरदार टाळ्यांच्या आवाजात खऱ्या मैत्रीला सलाम करू या.”

मग टाळ्यांचा चांगला आवाज झाला. सूत्रसंचालकानं शिरोळे यांना मनोगत व्यक्त करायला सांगितलं. शिरोळे उठले. हातात माइक घेऊन बोलायला लागले. त्यांच्या डोळ्यासमोर बालपणापासूनच्या मैत्रीचा पट येत गेला. त्यांचा कंठ दाटून आला होता. त्यांनी एक आवंढा गिळला. मग हळूच एकेक धागा उकलत गेले.

“मित्रहो, सखाराम माझा बालमित्र आहे. म्हणून मी त्याचे गुणगान करणार नाही. एवढंच सांगेन, आजच्या काळात अशी माणसं शोधूनही सापडत नाहीत; पण मला तो मित्र म्हणून लाभला, हे माझं भाग्य आहे.

बारावीनंतर माझ्यापेक्षा त्याला कमी गुण होते; पण पुढे शिकायला माझ्याकडे पैसे नव्हते. हे कळताच त्याने स्वतःच्या ॲडमिशनसोबत माझंही ॲडमिशन करून दिलं. पुढे त्याला सरकारी नोकरी लागली, तरी माझा हात त्याने कधी सोडला नाही. पगार कमी असूनही मला एम.बी.ए. करण्यासाठी पैसे पुरवले आणि आयुष्यात उभं राहायला बळ दिलं.

आज मी जे काही आहे, त्यात सखारामचा मोठा वाटा आहे. खाली पडलेल्या माणसाला हात देणारी माणसं फार कमी असतात. सखाराम तसाच माणूस आहे. त्याचे ऋण फेडता येणार नाहीत; पण कृतज्ञतेची ही छोटी भावना व्यक्त करण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित केला.

सुमेध, सुरूची आणि या प्रेमळ कुटुंबाचे मनःपूर्वक आभार. सखाराम आणि सरूला निरोगी, आनंदी आणि दीर्घ आयुष्याच्या शुभेच्छा देऊन माझे बोलणे संपवतो.”

शिरोळे यांचे बोलणे झाल्यानंतर सखारामला त्याचे मनोगत व्यक्त करायला सांगितले,

"सफ़र में साथ चलने वाले बहुत मिल जाते हैं,

मगर उम्र भर साथ निभाने वाले दोस्त कम मिलते हैं।”

“मित्रहो, अशा मैत्रीसाठी अजून एकदा टाळ्या होऊन जाऊ द्या.”

‘काय बोलावं?’ सखारामला काही क्षण सुचलंच नाही. त्या प्रेमळ वातावरणानं तो भारावून गेला होता. समोर बसलेल्या सर्वांकडे एकदा पाहून तो म्हणाला,

“हा गणेश शिरोळे माझ्या गावचा, माझा बालमित्र. शाळेपासून सुरू झालेली आमची मैत्री आयुष्यभर टिकली. मित्र तर अनेक होतात; पण संकटात पाठीशी उभा राहणारा मित्र नशिबानेच मिळतो. माझ्यासाठी गणा तसाच आहे. तो उपकार विसरला नही. त्यापेक्षा त्याला मैत्रीची जाणीव आहे, हेच खूप भाग्याचं हाये.

आयुष्यात अनेक चढ-उतार आले. कधी संसाराचा भार जड वाटला, कधी मुलांच्या भविष्याची चिंता होती. अशा वेळी आयुच्याच्या शेवटी त्याने मला एकटं पडू दिलं नही. माझ्यासारख्या बुडणाऱ्या जहाजाला किनारा दाखवणारा तो माझ्या कुटुंबाचा कप्तानच ठरला.

माझ्या कुटुंबानेही मला नेहमी समजून घेतलं, साथ दिली, म्हणूनच आज मी इथे उभा आहे. आपण सर्वांनी प्रेमापोटी या कार्यक्रमाला उपस्थित राहून माझा सन्मान केला, त्याबद्दल मनःपूर्वक आभार. एवढंच.”

सुमेधला त्याचे मनोगत व्यक्त करायला सांगितले. तो उभा राहून हातात माइक घेतला. समोर बसलेल्या सगळ्या लोकांकडे त्याने एक नजर फिरवली. त्याच्या मनात लहानपणापासून पाहिलेल्या बापाच्या अनेक प्रतिमा आणि वेगवेगळी रुपे त्याला आठवत होती. चांगल्या-वाईट प्रतिमा तो विसरून गेला होता आणि शिरोळे काकांशी असलेल्या मैत्रीचे मोठेपण मनात साठवत होता. आजची मैत्री ही सोशल मिडियापुरती मर्यादित आहे. तशी त्या दोघांची नाही; म्हणून ते दोघेही त्याला महान वाटत होते. मग तो म्हणाला,

“माय डॅडी इज ग्रेट. माझ्या वडिलांनी आयुष्यभर कोणी आपल्यासाठी काय केलं आणि काय केलं नाही, याचा हिशोब कधी ठेवला नाही. त्यांनी फक्त माणुसकी जपली. त्या प्रवासात शिरोळे काकांसारखा मित्र त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहिला, याचा मला खूप अभिमान वाटतो.

आजच्या कार्यक्रमाची कल्पनाही शिरोळे काकांचीच होती. साधारण आठ दिवसांपूर्वी त्यांनी मला फोन करून सांगितलं,

“सुमेध, हे सगळं पप्पांपासून गुप्त ठेवायचं. त्यांच्या निवृत्तीच्या दिवशी आपण त्यांचा छोटासा सत्कार करू आणि त्यांना आनंदाचा धक्का देऊ.”

त्यानंतर त्यांनी इथल्या मित्रांच्या मदतीने सगळी तयारी केली. खरंच, अशा मैत्रीचं उदाहरण आजकाल क्वचितच पाहायला मिळतं.

मला माझे वडील लाभले, तसंच शिरोळे काकांसारखा माणूसही लाभला, हे माझं भाग्य आहे. त्या दोघांनाही मनापासून प्रणाम करून मी माझे दोन शब्द संपवतो.”

सुमेधनंतर सुरूचीला बोलायला सांगितले. तिने सुमेधच्या हातातील माइक घेऊन म्हटले,

“माझे पप्पाच माझे खरे हिरो आहेत.” — आणि तिला एकदम रडू कोसळलं. तिला शब्द फुटेना. तिचे हात, ओठ व शरीर थरथरत होते.

सौ. शिरोळे जागेवरून उठल्या. तिच्या हातातील माइक घेऊन टीपॉयवर ठेवला. हात धरून तिला जागेवर बसवलं. पाण्याच्या

बाटलीचं झाकण काढून प्यायला पाणी दिलं. ती पाणी पिऊन जरा शांत झाली; पण तिच्याकडे पाहून सखारामचा जीव खालीवर होत होता. तिच्याकडे धडधडत्या हृदयानं पाहात होता.

कार्यक्रम संपल्यानंतर सर्वांना जेवणाची सूचना दिली. संकेत पाटील पहिल्या पंक्तीत जेवण करून निघून गेला. मात्र शंभर-दीडशे लोकांच्या त्या गर्दीत सखारामचं त्याच्याकडे लक्ष होतं. तो जाताना भेटून गेला नाही, याचं सखारामला वाईट वाटलं होतं. भोळेने मात्र त्याच्याजवळ येऊन त्याला शुभेच्छा दिल्या आणि जेवणाला बसला. तो लोकांच्या गर्दीत संकेतला शोधत होता,पण कुठेच दिसला नव्हता.

रात्री अकरा वाजता कार्यक्रम संपला. घरी आल्यानंतर सर्व जण हॉलमध्ये बसले. सुरूची मात्र सरळ वर जाऊन तिच्या रूममध्ये गेली. जाताना सखारामनं तिच्याकडे पाहिलं. त्याला तिच्या वागण्याचं कोडं काही सुटेना. सरूनं पाणी आणून सर्वांना दिलं आणि 'ट्रे' टीपॉयवर ठेवला. ती सुमेधजवळ जाऊन बसली. समोर श्री. व सौ. शिरोळे बसले होते. त्यांच्या गप्पा सुरू झाल्या होत्या. सखारामचे लक्ष सुरुचीकडेच लागून होतं. ती काही सांगत नसल्याने त्याला तो एक ताण आलेला होता.

सरू : कार्यक्रम छान झाला.

सखाराम : गणा, तू आणि वहिनी आले तं खूप छान झालं.

सौ. शिरोळे : यांचं कधीचंच चाललं होतं; पण मध्येच काही ना काही येत होतं. वेळच मिळत नव्हता.

सरू : यांचंही असंच---. सतत दौरे, नही तं काही ना काही मिटिंगा राहात.

श्री. शिरोळे : म्हणून म्हटलं, बायकांचा जन्म चांगला. धावपळ नाही की दगदग नाही.

सौ. शिरोळे : तसं काही नसतं हो. आम्ही घरात असलो, तरी कामं असतातच ना.

सखाराम : सरू, अगं सुरुले काय झालं? मी आल्यापासून पाहतो आहे, तिची तब्येत काही ठीक दिसत नाही.

तू काही बोल्ली की नही तिच्याशी?

सरू : तिले इचारलं, तं ती काही सांगतबी नही.

सौ. शिरोळे : ती मुलीची जात. अजून तिला फार समजत नाही. ते घरच्यांना कसं सांगीन?

सरू : का बरं, काय झालं?

श्री. शिरोळे : तिने लग्न केलं, एवढंच तुम्हाला माहित आहे.

हे ऐकून सखारामला आणखी टेन्शन आलं आणि तिचं लग्न झाल्याचं सुमेधला आश्चर्य वाटलं. तो सगळ्यांकडे वेगळ्याच नजरेने पाहू लागला होता,

सुमेध : कधी झालं तिचं लग्न? कसं झालं? कुठे झालं? कोणीच सांगितलं नाही?

सखाराम : गणा, आणखी काही वाईट घडलं का तिच्यासोबत?

श्री. शिरोळे : मागच्या महिन्यात आली होती ती आमच्याकडे. तेव्हा तिने तिची सगळी हकीकत सांगितली.

सौ. शिरोळे : तुम्ही लोकांना वाईट वाटू नये, म्हणून तिने सगळं लपवून ठेवलं होतं.

श्री. शिरोळे : ती म्हणत होती, माझ्या चुकीची शिक्षा घरच्यांना मिळायला नको, म्हणून ---

सखाराम : अरे, पण असं लपवून चालतं का? त्याने काही प्रश्न सोडवता येता का?

सरू : मग लग्न केलं तं केलं. संसारपाणी त नीट केला पाह्यजे नं. का ते बी करत नही ती?

श्री. शिरोळे : सहा-एक महिने सुरुवातीला चांगले राहिले होते ते. नंतर त्यांच्यात वादविवाद होत गेले.

सरू : आजकालच्या पोरांचं काय खरंच राह्यलं नही. पोरींनं का बरं अशा बेकार पोरानंच्या नादी लाग्याचं?

सखाराम : अगं, कोणाला दोष देऊन काय फायदा? आपण व्यवस्थित पाह्यजे नं?

सुमेध : काय काका? काही मेजर प्रॉब्लेम आहे का?

श्री. शिरोळे : ते दोघेही एकाच कंपनीत जॉब करत. एक फ्लॅट घेऊन राहत. आता काही दिवस झाले, तो तिला

सोडून गेला आहे.

सरू : त्याले शोधून त पोलिसांच्या ताब्यात द्याले पाहिजे.

सखाराम : अगं बाई, त्याने काही साध्य होईल का? ते दोघं ज्याच्या-त्याच्या ठिकाणी बरोबर असतील.

सरू : तुम्हाले तर सगळे सारखेच दिसता.

सौ. शिरोळे : ताई, आता राग धरून किंवा आपापसामध्ये वाद घालून काही फायदा होणार नाही.

सरू : ताई, असं काय बिघडलं एवढं?

सौ. शिरोळे : तिला दिवस गेले आहे. तिसरा महिना सुरू आहे.

हे ऐकून सरूला खूप राग आला होता, पण तिने गिळला. सखारामचे ठोके वाढले. सुमेध सगळ्यांकडे डोळे थिजल्यासारखे पाहात राहिला. सखारामची वाचाच गेली. ते तिघंही पुतळे बनले होते जसे.

सरू : मंग गर्भ पाडून टाका आन तिचं दुसरं लग्न करून द्या.

सखाराम : अगं, काय विचार करतेस तू आसा? भ्रूणहत्या पाप आहे. आपण ते कशाला कऱ्याचं?

सरू : मंग लोकांनी इचारलं तर काय सांगसान?

सखाराम : आपल्याला लोक महत्त्वाचे आहे की आपली मुलगी? हा त विचार कर.

श्री. शिरोळे : हे बघ सखा, आम्ही नाही म्हटलं, तरी दूरची माणसं आहोत. अशा नाजूक परिस्थितीत आम्ही निर्णय नाही घेऊ शकत.

सखाराम गोंधळून गेला. त्याचे सर्व लक्ष सुरुचीकडे होते. सरूच्या मनातील राग वाढत गेला होता. सुमेध काही न बोलता उठून वर गेला. 'सुरुनं जीवाचं काही बरं-वाईट केलं तर? आजकाल अनेक मुलं-मुली करतात असं. तीच थोडी एकटी आहे?' विचार करून त्याने तिच्या रुमच्या खिडकीतून डोकावून पाहिलं. ती झोपलेली होती. मात्र बराच वेळ तिची हालचाल दिसत नव्हती. त्याच्या हृदयाची ठोके वाढली होती. तिला आवाज देऊन उठवण्याचा विचारही केला होता. मग जेव्हा ती एका कडेवरून दुसऱ्या कडेवर झाली, तेव्हा त्याला बरं वाटलं. तेव्हा तो त्याच्या रूममध्ये जाऊन झोपला.

सौ. शिरोळे : तुम्ही आई-वडील म्हणून एक निर्णय घ्या. काय करायचं ते बघा?

श्री. शिरोळे : ती आता इकडे यायचं नाहीच म्हणत होती; पण तिला सगळं समजावून सांगून घेऊन आलो.

सखाराम : फार चांगलं केलं यार तुम्ही, तिला घेऊन आले घरी.

सरू : मी त म्हणते, तिले मोकळी करून टाका आन दुसरा पोरगा पाहा.

सखाराम : तसं नही. ती समजदार हाये, तिच्या स्वतःच्या पायावर उभी आहे. तिचे निर्णय तिले घेऊ दे न.

सरू : ती समजदार आणि हुशार असती, त तिनं आसं कशाले केलं आसतं मंग? आपल्याले समाजात राहानं पडतं. तोंड दाखवायले जागा त पाह्यजे?

'पसंद किए जाने की इच्छा कमजोरो की होती है,' हे सखारामला आठवलं आणि 'लोक काही म्हणो. जन्माला घातलेल्या मुलांना रिलॅक्स ठेवणं आपलं काम आहे,' या मताशी चिटकून राहिला.

सखाराम : "ओ बाई, लोकं असं म्हणणार नही की सरुची मुलगी फालतू निघाली. ते म्हणतील नं की

सखारामची पोरगी पळून गेली. नाव त मह्य जाईल नं? मग जाऊ दे. मले काही फरक पडत नही.

श्री. शिरोळे : वहिनी, ही पिढी तंत्रज्ञान, इंटरनेट आणि समाजमाध्यमांसोबत वाढली आहे. लग्न आणि नातेसंबंध याबद्दल त्यांचे विचार वेगळे आहे.

सौ. शिरोळे : आपणच एक मत केलं नाही, तर ती आणखी गोंधळून जाईल. तिला आधाराची गरज आहे.

श्री. शिरोळे : ही बदलणारी पिढी आहे. तिला जास्त वेळ स्वतःला बांधून घेणं आवडत नाही.

सखाराम : सरू, हे बघ. तू फक्त पाहत राहा. प्रश्न तिच्या अस्तित्वाचा आणि जगण्याचा आहे.

श्री. शिरोळे : हो वहिनी, आपण काय आज आहे, उद्या नाही. या मुलांना तर पुढे दीर्घकाळ जगायचं आहे. आणि ते जर स्वतःच्या

पायावर उभे राहिले, तर त्यांना काही चिंताच राहणार नाही. तुम्ही उगीच काळजी करू नका. सखा म्हणतो, ते काही वाईट नाही. मुलीचा विचार करा.

सरू एकटी पडल्याने तिघांच्या बोलण्याचा विचार करत गप्प बसली.

सखाराम : मंग, आता काय करायचं?

श्री. शिरोळे : ती आता तो फ्लॅट आणि ती कंपनी सोडून देणार आहे.

सखाराम : मंग पुढे काय करीन?

श्री. शिरोळे : तिला दुसऱ्या कंपनीची ऑफर आलेली आहे. तेथे जॉईन झाली की ती आताची कंपनी सोडून देईल आणि नवीन फ्लॅट पाहील, असं ती सांगत होती.

सखाराम : बरं, आता बराच वेळ झाला हाये. झोपा. सकाळी बघू, काय कऱ्याचं ते.

सरू : सुमेध नोकरीले लागला की राहातीन आपस दोघं बहीण-भाऊ.

श्री. शिरोळे : त्याची काही चिंता करू नका तुम्ही. सगळं ठीक होईल.

सखाराम : चाला, झोपा आता. लय वेळ झाला.

उशिरा झोपल्याने सकाळी उठायलाही उशीरच झाला होता. त्यामुळे चहा-नाश्ताही उशिराच झाला. सुरुचीचं रात्रीचं प्रकरण प्रत्येकाच्या डोक्यात होतं; मात्र कोणीच विषय काढत नव्हतं.

सखाराम : सरू, स्वयंपाकाचं बघा, काय कऱ्याचं ते.

सरू : तुम्ही सांगा, काय कऱ्याचं?

सखाराम : वरण-बट्टी कर. सोबत काही गोड करशीन.

श्री. शिरोळे : आम्ही निघणार आहे. आज संध्याकाळी.

सखाराम : आलाच हाये त थांबून जा. दोन-चार दिवस.

श्री. शिरोळे : नको, कामं पडली आहेत. सुरुला सुटीही नाही. सकाळी तिला ऑफिसला जावं लागेल.

सरू : सुमेध राहील मग. तुम्ही जा.

सखाराम : सुमेधचं काय कऱ्याचं गणा? ते पाहा. किती दिवस आसा रिकामा ठेवशीन त्याले?

श्री. शिरोळे : अरे वा! तुझी तर कमाल आहे. सगळं ठीक होईल नं. तू भलताच टेन्शन घेत राहातो.

सखाराम : अरे, गंमत नाही. त्याच्या करिअरचा प्रश्न आहे.

श्री. शिरोळे : ते माझ्यावर सोपव. चाल, गावाकडे जाऊन येऊ. तोपर्यंत स्वयंपाक होईल.

सखाराम आणि शिरोळे त्यांच्या गावाकडे जुन्या मित्रमंडळींना भेटायला गेले. सुमेधही बाहेर गेला. सुरुची संध्याकाळी जाण्याच्या तयारीला लागली. सरू आणि सौ. शिरोळे स्वयंपाकाला लागल्या.

सरू : ताई, आपण कितीबी सांगा, माणसं आयतच नही आपलं.

सौ. शिरोळे : तुम्ही काही टेन्शन घेऊ नका.

सरू : पोरीनं आसं केलं. नातेवाईकांना कळलं त ते काय म्हणतील?

सौ. शिरोळे : लोकांचा विचार सोडून द्या. मुलीचं पाहा. ती स्वतःच्या पायावर उभी आहे. ती काही तुम्हाला भार वाटणार नाही.

सरू : असं काही झालं की, लय पंचाईत होते वं ताई.

सौ. शिरोळे : लोकांचा विचार केला तर जगणंच कठीण होते.

सरू : हाव नं ताई, पोरीनं केलंच तसं.

सौ. शिरोळे : जे व्हायचं ते झालं आता. तो विचार सोडून द्या. लोकांचा जितका विचार कराल, तितका तुमचा ताण वाढत जाईल.

लोकं घडीभर बोलतात, विसरून जातात. आपण काही ताण घ्यायचा नाही.

सरू : बाईच्या हातात तरी काय आसतं? सगळेच त्याह्यच्या मनानं करता.

सौ. शिरोळे : तुम्हाला सांगू का? आपण कितीही चांगले वागा, लोकं वाईटावरच असतात. मग आपलं आपण पाहायचं. मुलगी आपली आहे. आपण नाही सांभाळणार तर कोण सांभाळेल?

सरू : काय पाहा ताई, मी कधीची म्हणत होती. पोरानकडे लक्ष द्या. आता झाला नं घोळ?

सौ. शिरोळे : ती आमची मुलगी आहे, असं समजा आणि चिंता सोडा.

सरूच्या डोळ्यात पाणी आलं. सौ. शिरोळे यांच्या नजरेनं टिपलं. त्यांना फार वाईट वाटलं. त्यांनी काही न बोलता भाजी कापायला घेतली. मग सरूनं बनवलेल्या बट्या तळण्याआधी समोरचा मोबाईल घेऊन सखारामला फोन केला.

सरू : कितीक वेळ लागेल आजून?

सखाराम : रस्त्यानंच हाये. आलोच थोड्या वेळात.

श्री. शिरोळे : अरे, ठेवलाही फोन?

सखाराम : हो. बायको बोलतच नही जास्त.

श्री. शिरोळे : अच्छा! म्हणजे तूच बोलू देत नसशील?

सखाराम : आसंबी ते जास्त बोलतच नही.

शिरोळे : इतका सिरीयस नको होऊ रे, गंमत केली तुझी. बिचाऱ्या वहिनीला कशाला दोष देतो?

सखाराम : पोरीचा ताण आला रे, त्यात सुमेधचा अजून काही ठिकाणा नही. मंग काय करू सांग?

श्री. शिरोळे : तू आता काय करणार पुढे?

सखाराम : काय कऱ्याचं? पेन्शन घेणं आन आला दिवस घालवणं. दुसरं काय करणार?

शिरोळे : ते नाही म्हणत मी. मुलाचं काय ते सांग?

सखाराम : ते आता लहान नही राहिले. त्याह्यचं ते पाहतीन.

शिरोळे :. सुरुच्या बाबतीत काय विचार केला तू?

रस्त्यावरचा समोरचा खड्डा चुकवताना ड्रायव्हरनं ब्रेक दाबला; तरी गाडी खड्ड्यावर आदळताच जोराचा दणका लागल्याने सखाराम चूप बसला. दोघंही समोर, काही इकडे-तिकडे पाहू लागले. गाडी वेगाने चालली होती. सुमेध गावातून फिरून घरी आला होता. त्याला किचनमध्ये सुरु दिसली नव्हती. मग तो वर गेला. ती सामानाची आवराआवर करत होती.

सुमेध : सुरु, एवढं झालं आणि तू मला काहीच सांगितलं नाही?

सुरुची : कसं सांगणार? तुझं फायनल इयर होतं. तू डिस्टर्ब झाला असता, म्हणून---

सुमेध : अशा गोष्टी सांगितल्या पाहिजे. वेळीच मार्ग काढता येतो.

सुरुची : आईला सांगितलं होतं, पण ती रागवायलाच लागली होती. बरेच दिवस बोलली नव्हती. पप्पा तरी अधूनमधून फोन करायचे.

सुमेध : आईचं एवढं मनावर कशाला घ्यायचं? आधीच ती कमी शिकलेली. जुन्या विचारांची. ती आपल्याला

समजून घेत नाही, तर आपणच तिला समजून घ्यायचं.

सुरुची : अरे, ती तिचंच चालू देते. मग मी बोलणंच बंद केलं होतं.

सुमेध : आता काय करायचं ठरवलं मग?

सुरुची : नोकरी करेल. एकटी राहील.

सुमेध : एवढ्या मोठ्या शहरात एकटी कशी काय राहशील?

बाहेर गेटचा आवाज आला. सखाराम आणि शिरोळे आल्याचे सुमेधने वरच्या गच्चीवरून पाहिलं. ते हॉलमध्ये येऊन बसले. नंतर सुमेधही खाली येऊन बसला.---

दुपारी जेवायला चार वाजले होते. दुसऱ्या दिवशी सकाळी ऑफिस असल्याने शिरोळे परतीच्या बेतात होते. त्यांना जायची घाईही झाली होती. ते सखारामच्या लक्षात आलं होतं.

सखाराम : गणा, आरामशीर जा. सकाळपर्यंत पोहचता येईल.

शिरोळे : लवकर पोहचलो की ऑफिसला जायची घाई होणार नाही.

सखाराम : थोडा आराम कर. मग जायाचंच हाये.

शिरोळे : अरे, मला थोडी गाडी चालवायची आहे. झोपूनच जाणार ना मी.

सुमेधनं त्यांच्या सर्व बॅगा गाडीत ठेवल्या होत्या. त्याची आणि सुरुचीची बॅग ठेवताना सरूनं पाहिलं होतं. 'म्हणजे मुलंही परत चालले?' तिला वाटलं होतं; पण ती काहीच बोलली नव्हती. सुरुची तयारी करून खाली आली.

शिरोळे : सखा, तुला आता काही कुठले कारण सांगता येणार नाही. ना ऑफिस, ना मिटिंग. कधी येशील पुण्याला सांग?

सखाराम : सुमेध नोकरीला लागला की येईल. तोपर्यंत इकडचे काही कामं आटोपून घेतो.

शिरोळे : ते काय कारण थोडी झालं. ये पुढील आठवड्यात.

सखाराम : पाहीन न.

सौ. शिरोळे : ताई, आता नक्की यायचं बरं. मुलं पुण्यात आणि तुम्ही दोघं काय करणार इकडे?

सरू : हो, नक्की येऊ. सुरुचं काय ते पाहू न आधी.

सखाराम : सुरु बेटा, तू एवढं मोठं पाऊल उचललं. मग आता पुढे काय कऱ्याचं ठरवलं?

सुरुची : रोहणचा स्वभाव पाहिला, तर तो काही परत येणार नाही. मी कंपनी बदलून टाकेल.

सरू : ते त काही विशेष नही. नोकरी कुठीबी करशीन. पण त्या बाळाचं काय?

सुरुची : जन्म देईल त्याला.

सरू : अंsss! बिना बापाचं लेकरू म्हणतील नं लोकं. मंग---?

सखाराम : अगं, येडी हाये का तू? तिनं का पोट आणलं हाये का? रीतसर कोर्ट मॅरेज केलं हाये.

सरू : असे ना का मंग. लोकं त त्याच्या बापाचा इचार करतीन नं?

शिरोळे : वहिणी, तुम्ही असा विचार नका करू हो. ती आणखी डिस्टर्ब होईल.

सखाराम : हे बघ सरू. लोकांचा इचार करून मुलीले दुःखाच्या खाईत लोटायचं नही.

सुमेध : आई, तू सगळ्यांचं काय म्हणणं आहे, ते तर समजून घे. आपण सगळे पुण्यात राहू. मोठ्या शहरात कोणी कोणाला ओळखत नाही. कोणाला कोणाकडे पाहायला वेळ नसतो.

शिरोळे : सखा, चाल आता, निघतो आम्ही. लवकर पोहचायचं आहे.

शिरोळे उठले. सुमेध त्यांचा निर्विकार चेहरा न्याहाळून पाहात होता. 'जे ठरलं होतं, ते त्यांनी अजून काहीच केलं नाही. विसरले असतील,' तो विचारात पडला. 'सांगावं की नाही सांगावं?' कोड्यात पडला; तरी काहीच बोलला नव्हता.

शिरोळे हॉलमधून बाहेर पडले. सोबत सखाराम आणि त्यांच्यामागे सगळे होते. ड्रायव्हरनं गेटसमोर गाडी उभी केली होती. सगळे गाडीजवळ जाऊन उभे राहिले होते. शिरोळे यांनी सखारामच्या खांद्यावर हात ठेवला. सखारामच्या काहीच ध्यानीमनी नव्हते. तो सुरुचीच्या विचारात होता. सुमेधच्या नोकरीपेक्षा त्याला मुलीच्या प्रश्नांची उत्तरे शोधायची होती. त्यामुळे तो फक्त फिजिकली तेथे उपस्थित होता.

शिरोळे : बरं सखा, काळजी घे. चिंता करू नको. मी आहे.

सखाराम : गणाsss, मित्रा, सुमेध स्वतःच्या पायावर उभा राहील, अशा मार्गाले लाव.

शिरोळे : अरे, वेडा आहे का तू? दिसत नाही का? पाहा बरं, तो स्वतःच्या पायावर उभा आहे की नाही. आणि आता मार्गाला पण लागेल.

शिरोळे यांनी गंमत केली. सगळे हसून त्या दोघांकडे पाहायला लागले. सखारामचा चेहरा केविलवाणा झाला होता. सुमेध शिरोळे यांच्याकडे उत्सुकतेने पाहात होता.

सखाराम : अरे, आपण म्हातारे झालो, तरी तुही सवय गेलीच नही आजून? मरताना तरी गंमत नको करजो. लाचार बाप म्हणून सांगतो तुले.

सखारामचा कंठ दाटून आल्याचं पाहून शिरोळे यांनी त्याच्याजवळ येऊन खांद्यावर हात ठेवला आणि खिशातून एक पाकीट काढून त्याच्या समोर केलं.

शिरोळे : एक घे.

सखाराम : अरे, रागावला का? मह्य पाकीट मलेच देतो? राहू दे. तुझ्यासाठी हाये ते.

शिरोळे : चांगलं पाहा. तुझं पाकीट नाही ते.

सखारामनं पाकीट निरखून पाहिलं. त्याचा कलर वेगळा होता. 'त्यात काय असेल? पैसेच असतील. त्याचा प्रश्न आणि त्याचंच उत्तर...'

शिरोळे : पाहतो काय? घे. त्यात काय आहे, ते तर बघ.

सखारामनं ते पाकीट घेऊन हळूच फोडलं. त्यात एक कागद होता. तो त्यानं कुतूहलानं बाहेर काढला. त्यावरचे काहीसे अस्पष्ट

असलेले एकेक अक्षर तो वाचत होता. त्याचे ओठ थरथरत होते. डोळे पाण्यानं डबडबले होते. एकेका वाक्यावर एकेक आसू पडत होता.

सुमेधच्या डोक्यात प्रकाश पडला. तो शिरोळे यांच्या आनंदी चेहऱ्याकडे पाहात होता. त्याचेही डोळे पाणावले होते. पत्र वाचून झालं. त्या पत्रासह सखारामनं दोन्ही हात जोडले. कृतज्ञ डोळ्यांनी त्याने शिरोळेकडे पाहून मिठी मारली.

सखाराम : गणा, लय उपकार झाले गड्या तुहे.

शिरोळे : उपकार कसले? सुमेधचे कष्ट आहेत ते. फार लकी आहे. तू हुशार मुलांचा बाप आहे.

सखाराम : पण तुह्यामुळेच नोकरी लागली त्याले.

शिरोळे : मी काहीच केलं नाही. मार्गदर्शन केलं फक्त. खरे कष्ट त्याचे आहेत.

सखाराम : पण तू आधार दिला नसता त काही झालं नसतं यार.

शिरोळे : अरे, मी त्याच्या कॅम्पस इंटरव्ह्यूला आलो होतो. तेव्हाच त्याची पारख केली होती. तुझी परिस्थिती कळली होती. म्हणून मी त्याला काही गोष्टी सांगितल्या. त्याने ऐकलं आणि तसंच केलं. त्याने ऐकलं नसतं, तर हा दिवस आला नसता. उद्या त्याचा पहिला दिवस आहे, कामावर हजर होण्याचा; म्हणून लवकर जायचं आहे. मग सांग आता जाणं जरुरीचं आहे की नाही. मुलांसाठीच असतं रे सारं.

सखाराम : खूप खूप आभार रे मित्रा तुझे. तुझे गुडमॉर्निंग मेसेज खरंच गुड झाले रे---

शिरोळे यांनी खिशातून दुसरं पाकीट काढून सखारामसमोर केलं.

शिरोळे : आता हे एक गुडविल घे.

सखाराम : आता कोणतंच पाकीट नको. तेच पाकीट लय झालं.

शिरोळे : अरे, घे. ठेव. आता काहीच टेन्शन घेऊ नको. सगळं ठीक झालं.

सखाराम : राहू दे. हे पाकीट मी तुले दिलं होतं. दिलेलं काही परत घ्यायचं नसतं.

शिरोळे : ठेव रे. सांगतो तसं कर. दोन बिघे शेती घे. मस्त फार्महाऊस तयार कर. दोन वर्षांनी रिटायर्ड झालो की, मी येणारच आहे गावाकडे. मग आपण जवळपासच राहू.

'हो'-'नाही' करता करता शिरोळे यांनी सखारामच्या खिशात पाकीट ठेवलं आणि त्याचे पैसे त्याला परत केले होते. सखारामला त्यापेक्षा सुमेधच्या जॉइनिंग लेटरची झेरॉक्स खूप लाखमोलाची वाटली होती.

सखाराम : सुमेध, अरे एवढं सगळं झालं आन् आम्हाले कधी सांगलं नही तू?

सुमेध : पप्पा, काका म्हटले होते, काहीच सांगायचं नही. घरी जाऊन सरप्राईज देऊ.

सखाराम : बदमास हाये साले तुम्ही सगळे. नुसता जीव घेता माणसाचा.

शिरोळे : सुमेध, तुला माहीत आहे का? असं काही सिक्रेट ठेवलं की, तो रडायला येईपर्यंत ताणायचं. मग त्याचा चेहरा पाहण्यासारखा झाला की गंमत यायची मस्त.



सखाराम : आजूनबी तुही सवय गेली नही म्हणा---

सखाराम हसला. सगळ्यांना रहस्य कळल्याने सगळेच हसले. मग गाडीत बसले.

सखाराम : सुरु, काळजी घे बेटा. कंपनी बदलवली की फोन कर. मंग आम्ही येतो.

सुरुची : हो पप्पा. काळजी करू नका. तुमच्या तब्बेतीला जपा.

सखाराम : माझं काय बेटा. पिकलं पान हाये. ते गळेलच. तू चांगली राहा”

गाडी सुरू झाली. तिला गहिवरून आलं. सखारामचे डोळे पाणावले होते. ती नजर चोरून त्याच्या चेहऱ्याकडे पाहात होती. गाडी हळूहळू पुढे निघाली. आलेल्या मार्गाला परत निरोप घेऊन गेली. सखाराम आणि सरू बराच वेळ त्या गाडीकडे पाहात राहिले. ती रडायला लागली.

सखारामनं स्वतःचे डोळे पुसत सरूच्या खांद्याला धरून घरात नेलं. सोफ्यावर बसवलं. तो समोरच्या सोफाचेअरवर बसला. ती फरशीकडे शून्य नजरेनं पाहात होती. तो म्हणाला,

"सरू, अगं, चिमणीचे पिलं मोठे झाले की, तिच्याजवळ थोडी राह्यता. त्याह्यचं एक वेगळं जग निर्माण होतं."

ती काही बोलली नाही. मोबाईलची रिंग वाजली. सखारामनं फोन घेतला.

"बोला भोळे भाऊसाहेब. काय म्हणता?"

"गेले का पाहुणे?"

"हो, आत्ताच गेले."

"या मग आपल्या ठिकाणावर."

"बरं, आलोच."

"आता कुढी चाल्ले? काही जायाचं नही." सरू म्हणाली.

"आता आलो मी." सखारामनं तिच्या उत्तराची वाट न पाहता गाडी घेऊन नेहमीच्या ढाब्यावर गेला. भोळेनं अगोदरच पार्सल आणून ठेवलं होतं.

सखाराम : अरे, आज काय विशेष? तू त आधीच येऊन बसला?

भोळे : सहज. मूड झाला. म्हटलं, एकटं बसण्यापेक्षा जाधव साहेबानाही बोलावून घेऊ.

सखाराम : बरं झालं. पाहुणे गेल्यावर बोर वाटत होतं.

भोळे : साहेब, तो संकेत पाटील फार चालबाज आन् धोकेबाज वाटतो. पैसे देतो म्हणतो आन् द्यायचं नावच घेत नही.

भोळे : साहेब, मले खूप अर्जंट काम हाये. मुलाची फी भऱ्याची हाये. तीन-चार लाख रुपये लागतीन.

सखाराम : तुम्ही तेवढी मदत करा. संकेत पाटीलनं दिले की परत करतो.

सखाराम : साध्य त काहीच नही गड्या.

भोळे : रिटायर्डमेंटचे पैसे भेटले आस्तीन न?

सखाराम : अजून काही भेटले नही. भेटले तरी लोकाह्यचे द्यायचे बाकी हाये.

भोळे : साहेब, तुम्ही मले द्या. मुलाची इंजिनियरिंगला एडमिशन घ्याचं हाये.

सखाराम : बघू न, कसं जमतं ते.

भोळेचा धूर्तपणा सखारामच्या लक्षात आला होता. हातचा पैसा सोडायचा नाही, हे त्याने ठरविले होते. पार्टी संपली होती. बराच वेळ

झाला होता. ‘आयुष्यभर लोकांसाठी धावत राहिलो. काहींनी साथ दिली, काहींनी वापर केला, पण एक गोष्ट नक्की कळली. पैसा पुन्हा कमावता येतो; पण मुलांच्या आयुष्याचा पाया योग्य वेळीच घालावा लागतो. जिवलग मित्राने वेळीच साथ दिली. मुलगा स्वतःच्या पायावर उभा राहिला, तेच खूप झालं होतं. संकेत पाटीलचं काय, ते नंतर पाहता येईल. आधी मुलाचं पाहिलं पाहिजे. त्यांच्यासाठी कोणत्याही नियमापेक्षा बाप महत्त्वाचा असतो. संकेतसारखे काही कायद्यापेक्षा मोठे असू शकत नही’------

सखाराम विचार करत झोपून गेला. बाहेर रातकिड्यांचा आवाज येत होता...

प्रा. मनोहर सुरवाडे यांची

ई साहित्यवरील इतर पुस्तके

कव्हरवर क्लिक करताच ई पुस्तके उघडतील.

छापील पुस्तके विक्रीसाठी उपलब्ध आहेत. –

संपर्क- ९९७०११७४३९